महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकाशन

मासिक

# उद्योजक

उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र

वर्ष ३४ वे

सप्टेंबर 2024

₹ 75/-




नीती आयोगाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मांडली भूमिका

## विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र वचनबद्ध




महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रासाठी 'ऐतिहासिक' करार

## छत्रपती संभाजीनगरमध्ये टोयोटा किर्लोस्करची २० हजार कोटींची गुंतवणूक, १६ हजार रोजगार

# सर्वोत्कृष्टतेसाठी प्रशिक्षण

**उद्योजकता विकास क्षेत्रात ३४ वर्षापासून कार्यरत संस्था**

**ध्येय (Mission)**

**जागतिक पातळीवर उद्योजकीय चैतन्य निर्मिती**

**दृष्टिकोन (Vission)**

ग्राहकांचे समाधान केंद्रस्थानी ठेवून, संघटना व व्यक्ती यांच्या उद्योजकीय व व्यवस्थापकीय क्षमतेत वृद्धी होण्यासाठी, नविनतम तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे नैतिक मूल्यांची जोपासना करत साह्यभूत ठरणे. कर्मचाऱ्यांचे हित व आकांक्षा जोपासत संस्था आत्मनिर्भर व विश्वात उत्कृष्ट संस्था म्हणून संबोधली जावी.

## • ध्येय धोरणे •

१) होतकरू व नवउद्योजकांचा शोध घेवून त्यांना प्रोत्साहन देणे तसेच प्रशिक्षणाद्वारे यशस्वी उद्योजक घडविणे.
२) राज्यात उद्योजकतेचा प्रचार व प्रसार करणे. ३) उद्योजकतेच्या क्षेत्रात संशोधन करणे.
४) उद्योजकतेशी निगडीत सल्ला सेवा, ट्रेनिंग सेंटर, तांत्रिक वर्कशॉप, इंडस्ट्रियल क्लिनिक, निर्मिती केंद्र सुरू करणे.
५) उद्योजकतेच्या क्षेत्रातील माहिती / ज्ञानाचे आदान-प्रदान. ६) संस्थाना प्रशिक्षण गरजांविषयी सहकार्य करणे.
७) उद्योजकतेशी निगडीत नियतकालिके/प्रकाशने प्रकाशित करणे.

### संस्थेचे प्रमुख उपक्रम

१) उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (EDP)
२) स्वयंरोजगार विकास प्रशिक्षण कार्यक्रम (DPSE)
३) व्यवसाय प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यक्रम (VTP)
४) उद्योजकता परिचय कार्यक्रम (EAP)
५) व्याख्याते प्रशिक्षण कार्यक्रम (FDP)
६) प्रेरक प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम (TTP)
७) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमा अंर्तगत व्यवसाय व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम (PMEG)
८) व्यवस्थापन विकास कार्यक्रम/संस्था विकास कार्यक्रम
९) उद्योजक मासिक
१०) माहिती तंत्रज्ञानावर आधारित उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम

### उपलब्ध प्रशिक्षणाच्या पायाभूत सुविधा

१) सुसज्ज प्रशिक्षण हॉल
२) प्रशिक्षणाच्या अत्याधुनिक सुविधा.
३) सुसज्ज असे निवासी वस्तीगृह.
४) माहितीने परिपूर्ण असे ग्रंथालय.
५) उपहारागृहाची सुविधा.
६) इंटरनेट, व्हिडोओ कॉन्फरन्सींग सारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध.
७) स्वतःचे वेब पोर्टल कार्यान्वीत.
८) तज्ज्ञ मनुष्यबळ व प्रशिक्षीत प्रेरक प्रशिक्षकांचा समूह.
९) ११ विशेष कक्ष (सेंटर), ८ विभागीय कार्यालये व प्रत्येक जिल्ह्यात प्रेरक प्रशिक्षकाची उपलब्धता.
१०) उद्योजकतेच्या क्षेत्रांतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी समन्वय.

प्रशिक्षणाच्या गरज पूर्तीसाठी संपर्क साधा.

MCED

मा. कार्यकारी संचालक
**महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र**
अ-३८, एम.आय.डी.सी. रेल्वे स्टेशन औरंगाबाद-४३१ ००५.

Email : executivedirectormced3@gmail.com
udyojakmagazine2@gmail.com
Portal : www.mced.co.in

उद्योजकीय मन घडविणारे मासिक
उद्योजक

**Visit us @ http://www.mced.co.in**

उद्योजक

*September-2024, VOL.XXXIV, ISSUE IX*



मुख्य संपादक
**बी. टी. यशवंते**

व्यवस्थापकीय संपादक
**संतोष बोर्डे**

विभाग प्रमुख, उद्योजक मासिक
**संतोष बोर्डे**

मुखपृष्ठ
**संतुक गोलेगावकर**

**पत्रव्यवहार**
मुख्य संपादक, उद्योजक,
अ-38, एम.आय.डी.सी.,
रेल्वे स्टेशन परिसर,
छत्रपती संभाजीनगर - 431 005.
☎ 2321223, 2321224
फॅक्स : (0240) 2341719

**सल्लागार मंडळ**
**डॉ. भा. र. साबडे**
संचालक, आयएसबीआय, पुणे
**डॉ. यु. म. पठाण**
ज्येष्ठ साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.
**श्री. राम भोगले**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर
**श्री. रा. रं. बोराडे**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.
**संपादक**
दै. लोकमत, छत्रपती संभाजीनगर
**श्री. विवेक देशपांडे**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर
**श्री. सुधीर सेवेकर**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर
**अध्यक्ष,** मसिआ, छत्रपती संभाजीनगर
**विभागप्रमुख,** जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
**श्री. सुरेश वाघ,** नाशिक



उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन
अंतर्गत कार्यरत संस्था
MCED
महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र
यांचे प्रकाशन

**E-mail :**
udyojakmagazine1@gmail.com
udyojakadvt@gmail.com

**Portal :**
www.mced.co.in


**कोणत्याही महिन्यापासून 'उद्योजक'चे वर्गणीदार होता येईल.**

# औद्योगिक गुंतवणुकीचा ऐतिहासिक क्षण



सर्वदूर पावसाच्या सरी कोसळत असताना राज्यातील औद्योगिक क्षेत्रातही गुंतवणुकीचा अक्षरशः पाऊस पडत आहे. राज्यातील पायाभूत सुविधा, उद्योगस्नेही धोरण, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता आणि गुंतवणूकदारांना निमंत्रित करण्यासाठी सरकारच्या पाठपुराव्यामुळे जगभरातील उद्योगसमूह नवीन गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राला पसंती देत आहेत. औद्योगिक गुंतवणुकीच्या दृष्टीने जुलै आणि ऑगस्ट महिना अत्यंत महत्त्वाचा ठरला.

जपानची आघाडीची वाहन निर्मिती करणारी कंपनी टोयोटा किर्लोस्करने छत्रपती संभाजीनगर येथील ऑरिक सिटीमध्ये २० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार केला. या प्रकल्पात इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्सचे उत्पादन होणार आहे. सुमारे ८५० एकरांवरील प्रकल्पातून वर्षाला ४ लाख कार्सची निर्मिती होणार असून, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अशा १६ हजार रोजगारांची निर्मिती होईल. या गुंतवणुकीमुळे देशात ऑटोमोबाइल क्षेत्रात महाराष्ट्राचा वरचष्मा परत सिद्ध झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रकल्पामुळे भारताच्या ई कार्स निर्मिती उद्योगातही क्रांती येईल असे म्हटले, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कराराचे वर्णन 'ऐतिहासिक' असे केले. ऑरिक सिटीमध्ये एका अँकर प्रोजेक्टची कमतरता होती. टोयोटामुळे ती दूर झाली आहे.

जुलैच्या अखेरीस राज्यातील विविध भागांत ८१ हजार १३७ कोटी रुपये गुंतवणुकीच्या विशाल आणि अतिविशाल अशा विविध प्रकल्पांना उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीत मंजुरी देण्यात आली. यात उच्च तंत्रज्ञानावर आधारित लिथियम बॅटरी, इलेक्ट्रिक व्हेइकल, सेमीकंडक्टर चिप, फळांचा पल्प निर्मितीसारख्या प्रकल्पांचा समावेश आहे. यातून सुमारे २० हजार जणांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे. यात जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी इलेव्हन लि., आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स, आवाडा इलेक्ट्रो कंपनी, हिंदुस्थान कोका कोला बेव्हरेज आणि परनॉर्ड रिकार्ड इंडिया यांचा समावेश आहे. लुब्रिझॉल इंडिया प्रा. लि.ने नवीन सिंथेटिक ऑर्गेनिक रासायनिक उत्पादन सुविधा स्थापन करण्याच्या प्रकल्पासाठी २ हजार कोटींच्या गुंतवणुकीचा निर्णय घेतला आहे. यातून ९०० रोजगार निर्माण होतील. लुब्रिझॉलचा हा प्रकल्प भारतातील सर्वात मोठा, तर जगातील दुसरा सर्वात मोठा प्रकल्प असेल. गडचिरोली येथील सुरजागड इस्पात स्टील प्रकल्पाचे भूमिपूजन नुकतेच करण्यात आले. या प्रकल्पातून ८ दशलक्ष टन तर लॉईड्स प्रकल्पातून ४ दशलक्ष टन पोलाद उत्पादन होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यावर महाराष्ट्रात ३० टक्के पोलाद उत्पादन एकट्या गडचिरोलीतून होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिनानिमित्त लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात औद्योगिक प्रगतीविषयी भाष्य केले. भारतातील अफाट संसाधने आणि कुशल मनुष्यबळाचा फायदा घेऊन देशाचे जागतिक उत्पादन केंद्रात रूपांतर करण्याची कल्पना त्यांनी मांडली. 'वोकल फॉर लोकल' आणि 'एक जिल्हा एक उत्पादन' या संकल्पनेवरही भर दिला. राज्य सरकारांनी गुंतवणुकीला आकर्षित करण्यासाठी आपल्या धोरणांमध्ये स्पष्टता आणली पाहिजे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री शिंदे यांनी स्वातंत्र्य दिनाच्या भाषणात राज्य सरकारने गुंतवणूकदार, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये आत्मविश्वास निर्माण केल्याचे सांगितले. या विश्वासामुळे गुंतवणुकीचा ओघ वाढला असून २ वर्षांत ५ लाख कोटींपेक्षा जास्त गुंतवणुकीचे करार झाले. थेट परकीय गुंतवणुकीत राज्य देशात पहिल्या क्रमांकावर आहे. त्या माध्यमातून २.५ लाख रोजगारनिर्मिती झाल्याचे नमूद केले.

२०१४ मध्ये केंद्रातील एनडीए सरकारच्या पहिल्या टर्मच्या सुरुवातीला भारत जगातील अर्थव्यवस्थांमध्ये १० व्या स्थानावर होता. दुसऱ्या टर्ममध्ये ५ व्या स्थानावर आला. तिसऱ्या टर्ममध्ये २०२८ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्ससह (५ लाख कोटी डॉलर्स) भारत जगातील टॉप ३ अर्थव्यवस्थांमध्ये करण्याचे केंद्र शासनाचे उद्दिष्ट आहे. ते पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचा वाटा देणार आहे. देशात महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सर्वात मजबूत असून देशाच्या एकूण उत्पन्नात राज्याचा वाटा १४ टक्के आहे. पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांचे आवाहन त्या त्यादृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे.

उत्तम पायाभूत सुविधा, मुबलक नैसर्गिक संपदा, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता आणि दर्जेदार शैक्षणिक संस्थांच्या जाळ्यामुळे महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले राज्य ठरत आहे. काळाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रगतीशील राहून आपले पुरोगामीत्व सिद्ध करणाऱ्या महाराष्ट्राने शाश्वत विकासाच्या दिशेने आपली वाटचाल सुरू ठेवली आहे. महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे औद्योगिक राज्य म्हणून नावारूपाला आले आहे. अमृतकाळात ही ओळख अजून गडद होणार आहे. राज्यातील नवीन गुंतवणुकीतून हे स्पष्ट दिसतंय.

**दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से.**
**विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन तथा**
**अध्यक्ष, सुकाणू समिती, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी)**


Edited & Published by Santosh Borde printed at M/s. Printwell International Pvt. Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar for Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), A-38, MIDC Area, Near Railway Station, Chhatrapati Sambhajinagar. Not responsible for unprinted articles. Chief Editor : B. T. Yeshwante

# उद्योजक

## सप्टेंबर 2024

## अंतरंग





- भारत ठरतोय जगाचे प्रमुख उत्पादन केंद्र / प्रतिनिधी ..............................................०५
- विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र वचनबद्ध / प्रिया गंध्रे ...............................०७
- छ.संभाजीनगरमध्ये टोयोटा किर्लोस्करची २० हजार कोटींची गुंतवणूक, १६ हजार रोजगार / डॉ. आरतीश्यामल जोशी.. ०९
- ५२ हजार कोटींची गुंतवणूक आर्थिक क्रांती घडविणार / प्रतिनिधी .................................११
- राज्यात ८१ हजार कोटींच्या ७ गुंतवणूक प्रकल्पांना मंजुरी / प्रतिनिधी............................१३
- लुब्रिझॉल इंडियाची छत्रपती संभाजीनगरात २००० कोटींची गुंतवणूक / प्रतिनिधी .................१४
- सुरजागड इस्पात पोलाद भूमिपूजन / प्रतिनिधी...................................................१५
- जपानने महाराष्ट्राच्या उद्योग, पायाभूत सुविधा क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी / प्रतिनिधी.........................१६





- धोरण रोजगारनिर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे / संतोष बोर्डे...............................१७
- अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना : आर्थिक स्वावलंबनास बळ / प्रतिनिधी .......२०
- औद्योगिक समूह विकास योजना / प्रतिनिधी....................................................२१
- महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी सरकार कटिबद्ध / प्रतिनिधी ............................२३
- रबर उद्योगातील संधी / सुदाम थोटे...........................................................२५
- संस्था परिचय : इंडियन रबर इन्स्टिट्यूट - संधींतही लवचिकता / प्रतिनिधी....................२७
- सीजीसीआरआय - काचेच्या विश्वात चमकदार करिअर, उद्योजकतेला वाव / प्रतिनिधी.........२९
- बचत गटांसाठी यशस्विनी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म / प्रतिनिधी......................................३१





- अध्ययन, अर्जन आणि अर्पण : चांगलं जीवन जगण्यासाठी प्रेरक गुरुमंत्र / प्रतिनिधी...........३२
- पर्यटन क्षेत्रात १ लाख कोटींची गुंतवणूक, १८ लाख रोजगार / प्रिया गंध्रे........................३३
- डिजिटल तंत्रज्ञानात भारताची आगेकूच / हेमंत देसाई..............................................३४
- सामाजिक उद्योजकता आणि शाश्वत विकास / डॉ. वि. ल. धारूरकर...............................३५
- दस्तऐवजाची विश्वासार्हता वाढवणारा व्यवसाय / प्रतिनिधी........................................३७
- रंगीत कापसाची शेती / श्याम हेडाऊ...........................................................३९
- मशरूम उत्पादनाद्वारे अर्थार्जनाचा मार्ग / धनश्री हुडेकर............................................४१



- हॉटेल व्यवसायातून गवसला प्रगतीचा रुचकर मार्ग / सौरभ सदावर्ते..............................४३
- पशुआहाराची कौतुकास्पद झेप / डॉ. आरतीश्यामल जोशी.........................................४५
- नोकरदार ते उद्योगरत्न / निशिगंधा कणकवलीकर...............................................४७
- नितू क्रिएशन्सची कलाकुसर सातासमुद्रापार / प्रतिनिधी..........................................४९
- जीवन विम्याने दाखवला समृद्धीचा मार्ग / डॉ. उमेश कणकवलीकर...............................५०
- अभियांत्रिकी ज्ञान आणि उद्योजकीय भान आवश्यक / प्रसाद जोग..............................५२
- नमुना प्रकल्प अहवाल / संजय सिधये ..........................................................५५





याशिवाय संपादकीय, शीर्षासन, प्रश्नपेटी इत्यादी...



स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहनात पंतप्रधान मोदी, मुख्यमंत्री शिंदे यांचे प्रतिपादन

# भारत ठरतोय जगाचे प्रमुख उत्पादन केंद्र

**सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, शिक्षण, आरोग्य, वाहतूक आणि कृषी क्षेत्रात एक नवी आधुनिक व्यवस्था तयार होत आहे. डिझाइन इन इंडियाचे आवाहन स्वीकारून डिझाईन फॉर द वर्ल्डचे स्वप्न घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे. गेल्या काही वर्षात एफडीआय आणि एमएसएमईना मोठे बळ मिळाले असून, भारत जगाचे उत्पादन केंद्र ठरत असल्याचे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले, तर राज्यातील उद्योगस्नेही धोरणांमुळे गुंतवणूकदारांचा विश्वास वाढल्याने महाराष्ट्रात गुंतवणुकीचा वेग वाढल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहनानंतर पंतप्रधान मोदी दिल्लीतील लालकिल्ल्याहून तर मुख्यमंत्री शिंदे मुंबईतील विधानभवन परिसरातून बोलत होते. - प्रतिनिधी**

भारताचा ७८ वा स्वातंत्र्यदिन देशभरात उत्साहात साजरा करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लालकिल्ल्यावरून केलेल्या भाषणात, भारताच्या विकासाला आकार देणे, नवोन्मेषाला चालना देणे आणि विविध क्षेत्रांमध्ये देशाला जागतिक नेता म्हणून स्थापित करण्याच्या उद्देशाने भविष्यकालीन उद्दिष्टांची मालिका रेखाटली. विविध विषयांना स्पर्श करताना देशातील औद्योगिक विश्वाचाही आढावा घेतला. त्यातील भविष्यातील संधी सांगितल्या.

### 'वोकल फॉर लोकल' हा आर्थिक विकासाचा नवा मंत्र

पंतप्रधान मोदी म्हणाले, समाजातील दलित, पीडित, शोषित, आदिवासी बंधू- भगिनी, झोपडीमध्ये राहून स्वतःची गुजराण करणारे माझे लोक मूलभूत सुविधांपासुन वंचित होते. शासनाच्या योजनांचा लाभ समाजातल्या प्रत्येकाला मिळाला पाहिजे याहेतून 'व्होकल फॉर लोकल' चा मंत्र दिला. आज तो अर्थशास्त्रासाठी नवा मंत्र ठरला आहे. प्रत्येक जिल्हा आपल्या उत्पादनाचा अभिमान बाळगू लागला आहे. 'एक जिल्हा एक उत्पादन'मुळे असे वातावरण निर्माण झाले आहे. एक जिल्हा एक उत्पादन मधल्या उत्पादनांची निर्यात कशी करता येईल या दिशेने सर्व जिल्हे विचार करू लागले आहेत.

### संरक्षण क्षेत्रात भारत आत्मनिर्भर

मोदी पुढे म्हणाले, एके काळी आपल्या देशात खेळण्यांची आयात होत असे; पण आज देशात खेळण्यांचे उत्पादन होत आहे आणि खेळणी निर्यातही होत आहेत. आज देशातील खेळणी जगभर पोहोचत आहेत. खेळणी निर्यात होऊ लागली आहे. आपण आज मोबाइल फोनही जगभर निर्यात करू लागलो आहोत. ही भारताची ताकद आहे. आपण सेमीकंडक्टर उपकरणांच्या क्षेत्रात काम सुरू केले. जगात वेगाने ५ जी पोहोचवण्यात आपण आघाडीवर आहोत. आपण ६ जी वर काम करत आहोत आणि मला खात्री आहे, यातही आपण जगात नाव मिळवू. संरक्षण बजेट जाते कुठे, तर ते परदेशातून होणाऱ्या आयातीवर खर्च होते; पण आम्ही ठरवले आहे की, संरक्षण क्षेत्रात आपण आत्मनिर्भर बनू. आज संरक्षण उत्पादन क्षेत्रात भारत पुढे जात आहे. हळूहळू या क्षेत्रातही आपण प्रगती करत आहोत.



### योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू
### - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि येथील नागरिकांच्या कल्याणासाठी राज्य शासन वचनबद्ध आहे. शेतकरी, शेतमजूर, महिला, विद्यार्थी या सर्व घटकांच्या विकासासाठी विविध योजनांच्या माध्यमातून विकासाला चालना देण्याचे काम होत आहे. विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य शासनाने राबविलेल्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. स्वातंत्र्यदिनानिमित्त मंत्रालय येथे मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.



### जगभरातील उद्योग भारतात येण्यास उत्सुक

पंतप्रधान म्हणाले, जगाला अत्याधुनिक उपाय देण्याची क्षमता आमच्यात आहे. आज प्रत्येक उपकरणामध्ये आपण वेगाने पुढे चाललो आहोत. एफडीआय, एमएसएमईना मोठे बळ मिळाले आहे. त्यामुळे आपण जगाचे उत्पादन केंद्र बनलो आहोत. आपण जनभागीदारी सुरू केली आहे, जेणेकरून आपण कौशल्य विकासचे उद्दिष्ट साध्य करू. आज जगातील मोठ मोठ्या कंपन्या भारतात गुंतवणूक करू इच्छित आहेत. आपल्यासाठी ही सुवर्णसंधी आहे. मी राज्य सरकारांना आवाहन करतो, प्रत्येक राज्यसरकारने गुंतवणूक आकर्षित करण्याची योजना बनवावी. प्रत्येक राज्य निरोगी स्पर्धेत उतरेल. धोरणे बनवेल. जागतिक मागणीच्या अनुषंगाने ते आपली धोरणे निश्चित करतील. जे गुंतवणूकदार येत आहेत, ते कधीच मागे फिरणार नाहीत.

### गेमिंग विश्वात मोठी संधी

भाषणात मोदी म्हणाले, डिझाईन इन इंडिया हे आवाहन घेऊन आपल्याला पुढे जावे लागेल. डिझाईन इन इंडिया आणि डिझाईन फॉर वर्ल्ड हे स्वप्न बाळगून पुढे जायचे आहे. गेमिंग विश्वाची खूप मोठी बाजारपेठ उभी आहे. आपण गेमिंगच्या क्षेत्रात मोठी प्रतिभा घेऊन जाऊ शकतो. जगातील प्रत्येक मुलाला भारतात बनलेल्या खेळांप्रति आकर्षित करू शकतो. भारतातील मुले, भारतातील युवक भारतातील आयटी व्यावसायिक, कृत्रिम बुद्धिमत्तेतील व्यावसायिक यांनी गेमिंगच्या विश्वाचे नेतृत्व करावे. गेमिंगच्या विश्वात आपली उत्पादने पोहोचायला हवीत. ॲनिमेशन विश्वात आपण आपला दबदबा निर्माण करू शकतो. त्या दिशेने आपण काम करायला हवे.

### ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे आगेकूच

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, गेल्या दोन वर्षात राज्य शासनाने भरीव कामगिरी केली आहे. विदेशी गुंतवणूक, समाजातील दुर्बल, गोरगरिबांसाठी आखलेल्या नावीन्यपूर्ण योजना या माध्यमातून नागरिकांप्रति असणारी बांधीलकी दाखवून दिली आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ५ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था बनवून जगातली तिसरी अर्थव्यवस्था होण्यासाठी आगेकूच सुरू आहे. त्यामध्ये आपल्या राज्याचा वाटा मोठा असणार आहे. राज्याची वाटचाल त्या दिशेने सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

### दोन वर्षात ५ लाख कोटीची गुंतवणूक

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, राज्यातील गुंतवणूकदार, उद्योजक किंवा सर्वसामान्य नागरिक यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम राज्य शासनाने केले आहे. कृषी, शिक्षण, ऊर्जा निर्मिती, माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, पर्यटन, आरोग्य सुविधा, कौशल्य विकास, पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा या क्षेत्रांमध्ये आपण आमूलाग्र क्रांती आणत आहोत. राज्यात १५ दशलक्ष रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट्य आपण ठेवले आहे. राज्याची लॉजिस्टिक पॉलिसी जाहीर केली आहे. यातून येत्या पाच वर्षात ३० हजार कोटींचा महसूल राज्य शासनाला मिळणार आहे. गुंतवणूकदारांचा विश्वास वाढल्याने राज्यात गुंतवणुकीचा वेग वाढला आहे. गेल्या दोन वर्षात ५ लाख कोटींपेक्षा जास्त गुंतवणुकीसाठी करार झाले आहेत. थेट परकीय गुंतवणुकीत तर आपण देशात प्रथम आहोत. त्या माध्यमातून २.५ लाख रोजगारनिर्मिती आपण केली आहे. देशाच्या एकूण उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १४ टक्के आहे. उद्योगात आणि सेवा क्षेत्रात आपले राज्य क्रमांक एकवर आहे. विदेशी पर्यटकांची पसंतीही महाराष्ट्र असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी आवर्जून नमूद केले.

### दहा लाख कोटींचे पायाभूत सुविधा प्रकल्प

मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात सुमारे १० लाख कोटींची पायाभूत सुविधांची कामे सुरू आहेत. समृद्धी महामार्गासारखा गेम चेंजर असणाऱ्या प्रकल्पाचा शेवटचा टप्पा पूर्ण होऊन नागपूर ते मुंबई पूर्ण वाहतूक लवकरच सुरू होणार आहे. पायाभूत सुविधांसोबतच गोरगरीब, दुर्बल, वंचित यांना विकासाच्या प्रक्रियेत समाविष्ट करून घेतले जात आहे. राज्य शासनाच्या सात पथदर्शी योजनांनी राज्याच्या सामाजिक क्षेत्रात क्रांती आणली असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातल्या तळागाळातल्या व्यक्तीचे उत्पन्न वाढावं, शहर आणि ग्रामीण भाग असा भेद न करता सर्वांगीण विकासाचा प्रयत्न राज्य शासन करीत आहे. त्यादृष्टीने पावले टाकल्याचेही त्यांनी सांगितले.




**निती आयोगाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मांडली भूमिका**

# विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीसाठी महाराष्ट्र वचनबद्ध

**महाराष्ट्र शासनाने गरीब, शेतकरी, महिला सक्षमीकरण आणि युवक कल्याणासोबत सर्वांगीण विकासाची धोरणे बनवली आहेत. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत गेल्या २ वर्षात राज्याने ५ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार केले असून, त्यातून सुमारे ३ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. देशाच्या ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलरचा वाटा देणार आहे. विकसित भारत-२०४७ ही संकल्पना साकार करण्यासाठी राज्य वचनबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.**

**- प्रिया गंध्रे**

नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन येथे अशोक मंडपात २७ जुलै रोजी आयोजित नीति आयोगाच्या नवव्या नियामक परिषदेत मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद पार पडली. परिषदेत विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल यांच्यासह आयोगाचे पदसिद्ध सदस्य, केंद्रीय मंत्री आणि नीति आयोगाचे उपाध्यक्ष उपस्थित होते. याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे यांनी शालेय शिक्षण, पिण्याचे पाणी, ऊर्जा, आरोग्य, पायाभूत सुविधा, जमीन आणि मालमत्तांची सुलभ नोंदणी यात राज्य अग्रेसर असल्याचे सांगितले. राज्याने निती आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रांसफॉर्मेशनची स्थापना झाल्याची माहिती दिली.

**एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था :** २०१४ मध्ये भारत जगातील अर्थव्यवस्थांमध्ये १० व्या स्थानावर होता. आता देश ५ व्या स्थानावर आला आहे. २०२८ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर्ससह भारत जगातील टॉप ३ अर्थव्यवस्थांमध्ये सामील करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मानस आहे. पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र १ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्थेचा वाटा देणार आहे. राज्याचा विकास वृद्धी दर ८.७ टक्के आहे. राज्याला १ ट्रिलियन डॉलर्सचे उद्दिष्ट गाठण्यासाठी १५ टक्के वृद्धी दर गाठावा लागेल. त्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्र राज्य कृषी माल निर्यात धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र पहिले राज्य आहे. तसेच राज्याने एक जिल्हा एक उत्पादन उपक्रमात ७२ उत्पादनांची निवड केल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**उद्योगात घौडदौड :** मागील दोन वर्षांत दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक मंचामध्ये महाराष्ट्राने ५ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार केले. त्यातून सुमारे ३ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. ३६ जिल्ह्यांमध्ये ७२ उत्पादनांची ओडीओपीअंतर्गत निवड केली आहे. औद्योगिक उत्पादनात १८ टक्के योगदान देणाऱ्या ४६ लाख नोंदणीकृत युनिट्ससह, महाराष्ट्र एमएसएमईमध्ये आघाडीवर आहे. भारतात सर्वाधिक ३० टक्के एफडीआय राज्यात आकर्षित करण्यात आली असून आणि १८ हजार स्टार्टअप्सची यशस्वीपणे नोंदणी झाली आहे असेही ते म्हणाले.

**हाताला रोजगार :** राज्यातील युवा वर्गाला रोजगारक्षम बनविण्यासाठी शासनाने १८ ते ३५ वयोगटातील तरुणांना कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम तयार केले आहेत. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतर्गत, सरकार सुशिक्षित बेरोजगार तरुणांना शिकाऊ प्रशिक्षणासोबत १०,००० रुपयांपर्यंतचे स्टायपेंड देणार आहे. 'सक्षम युवा, समर्थ भारत' या संदेशाला वर्ष २०४७ पर्यंत घेऊन जाण्यासाठी राज्य शासन वचनबद्ध आहे. ऑलिम्पिक आणि इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील विशिष्ट खेळांमध्ये आपल्या देशाची कामगिरी वाढवण्यासाठी मिशन लक्ष्यवेध योजना सुरू करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

**पर्यटन राज्य बनविणार :** मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, अलीकडेच शिवनेरी, रायगड, प्रतापगड यासारख्या शिवकालीन १२ ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीसाठी नामांकन मिळाले आहे. या यादीत पंढरपूर वारी यात्रा, दहीहंडी आणि गणपती उत्सव यासारख्या सणांचा समावेश करण्यासाठी शासन प्रयत्नरत आहे. यासोबतच, राज्यात मोठ्या रस्ते प्रकल्पांमध्ये झपाट्याने सुधारणा होत आहे. कोकण कोस्टल रोड आणि कोकण ग्रीन फील्ड एक्स्प्रेसवे कोकणासाठी मैलाचा दगड ठरणार आहेत.

**अणुऊर्जेवर आधारित कांदा महाबँक :** शेतकऱ्यासांठी प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेला पूरक म्हणून नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सुरू केली आहे. यात अतिरिक्त ६ हजार प्रति शेतकरी देण्यात येत असून ९२ लाख शेतकऱ्यांना ५३०५ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट राज्याने देखील समोर ठेवले आहे. त्यासाठी राज्याने कृषी अन्न निर्यात धोरण तयार केले आहे. राज्याने १० लाख टन कांदा साठवण्यासाठी अणुऊर्जेवर आधारित 'कांदा महाबँक' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. कांदाच्या किमती स्थिरीकरण निधी योजनेंतर्गत बफर स्टॉकसाठी कांदा खरेदी करण्यासंदर्भातील किंमत धोरणावर विचार करण्याची विनंती त्यांनी पंतप्रधानांना केली.

**फलोत्पादनात राज्य आघाडीवर :** महाराष्ट्र नेहमीच फलोत्पादनाच्या क्षेत्रात आघाडीवर राहिले असून, राज्याचा निर्यातीचा वाटा ५ टक्के आहे. तथापि, आता प्रगत तंत्रज्ञान आणि धोरणात्मक उपायांचा वापर करून त्याचा हिस्सा ३०-३५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. राज्याने शेतकरी उत्पादक संस्थांसाठी मूल्यवर्धित पुरवठा साखळी तयार करणे, विकसित करणे आणि त्यांना संबंधित सरकारी योजनांशी जोडणे आणि प्रोत्साहनाद्वारे सेंद्रिय शेतीला समर्थन देण्याबाबतचा ठराव लागू केल्याचे यावेळी नमूद केले. पुढील पाच वर्षांत २५ लाख हेक्टर जमीन नैसर्गिक शेतीखाली आणण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती अभियान राबवणार असल्याची त्यांनी माहिती दिली.

**महिला सक्षमीकरणासाठी निर्णय :** शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक पावले उचलली आहेत. राज्यात नमो महिला सक्षमीकरण योजना लागू झाली असून 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' ही महत्त्वाकांक्षी योजना सुरू करण्यात आली आहे. राज्यातील सुमारे अडीच कोटी महिलांना थेट त्यांच्या बँक खात्यात दरमहा दीड हजार रुपये म्हणजेच वार्षिक १८ हजार रुपयांचा लाभ मिळणार आहे. महिलांसाठी इतर कल्याणकारी योजनांमध्ये वर्षाला ३ सिलिंडर मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना, लेक लाडकी योजना यांचा समावेश तर मुलींना केजी ते पीजी मोफत शिक्षण देण्याचा निर्णयाबद्दलची माहिती त्यांनी आपल्या भाषणात दिली.

**आरोग्य यंत्रणा मजबूत करणार :** महाराष्ट्र आरोग्य विमा योजनेत अग्रगण्य राज्य आहे. महाराष्ट्राने सर्व नागरिकांना महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेतंर्गत समाविष्ट करण्यासाठी व्याप्ती ५ लाख रुपये वाढविण्यात आली आहे. दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी दिव्यांग मंत्रालयाची स्थापना करणारे तसेच ट्रान्सजेंडर धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याची ते म्हणाले.

**ऑनलाइन सेवा :** सर्व ग्रामीण आणि शहरी जमिनीच्या अधिकारांचे डिजिटलायझेशन झाले असून, ऑनलाइन पद्धतीने ग्रामीण भागातील २६२ कोटी आणि ७० लाख शहरी भागांमध्ये भूमी अभिलेख नागरिकांना उपलब्ध करून देण्याबाबतची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली

**३९० किलोमीटरचे मेट्रो मार्ग :** महाराष्ट्र शासन ज्येष्ठ नागरिकांसाठी गृहनिर्माणासाठी नवीन धोरण सुरू करणार आहे. राज्याच्या विकास योजनांमध्ये पारदर्शकता आणि गती आणण्यासाठी सर्व नगरविकास योजना पूर्णपणे जीआयएस आधारित बनविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. क्लस्टर डेव्हलपमेंटद्वारे एमएमआर क्षेत्रातील तसेच महाराष्ट्राच्या इतर भागांमध्ये जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींसाठी मोठ्या प्रमाणावर पुनर्विकास योजना सुरू केल्या आहेत. मुंबईतील झोपडपट्ट्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याचे उद्दिष्ट असून, दोन लाखांहून अधिक घरे बांधण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मुंबई महानगर क्षेत्रात सव्वा लाख कोटींहून अधिक खर्चाच्या सुमारे ३९० किलोमीटर मेट्रो मार्गांचे बांधकाम, पुणे आणि नागपूर येथे मेट्रो मार्गाचे कामही वेगाने सुरू आहे. राज्य शासन एक संतुलित आणि सर्वसमावेशक आर्थिक विकास मॉडेल तयार करण्यासाठी जिल्हा-स्तरीय धोरणांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

**हरित हायड्रोजन धोरण :** हरित हायड्रोजन धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या धोरणांतर्गत अंदाजे २ लाख ११ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, हे ९१० केटीपीए ग्रीन हायड्रोजन तयार करेल असे ते म्हणाले. 'हर घर जल'हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, महाराष्ट्राने २०१९ मधील ३३ टक्के वरून ८६.२२ टक्के प्रगती केली असून,१.२६ कोटी कुटुंबांना नळ कनेक्शनसह समाविष्ट आहे. राज्यात ११ हजार ३४७ पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या असून ३१ हजार ८८१ योजनांची अंमलबजावणी सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

*(या लेखाच्या लेखिका मुक्त पत्रकार असून विविध विषयांवर लिखाण करतात. त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ९१६८०६७००६ हा आहे.)*




महाराष्ट्राच्या औद्योगिक क्षेत्रासाठी 'ऐतिहासिक' करार

# छत्रपती संभाजीनगरमध्ये टोयोटा किर्लोस्करची २० हजार कोटींची गुंतवणूक, १६ हजार रोजगार

**जपानची जगप्रसिद्ध वाहन निर्मिती करणारी कंपनी टोयोटा किर्लोस्करने छत्रपती संभाजीनगर येथील ऑरिक सिटीमध्ये २० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. या प्रकल्पात इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्सचे उत्पादन होणार आहे. सुमारे ८५० एकरावरील प्रकल्पातून वर्षाला ४ लाख कार्सची निर्मिती अपेक्षित आहे. यातून ८ हजार प्रत्यक्ष आणि ८ हजार अप्रत्यक्ष अशी १६ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे. तीन वर्षात उत्पादन सुरू होण्याचा अंदाज आहे. या प्रकल्पामुळे ऑरिकमध्ये मेगा प्रोजेक्टची प्रतिक्षा संपली आहे, तर या निमित्ताने देशात ऑटोमोबाइल क्षेत्रात महाराष्ट्राचा वरचष्मा कायम असल्याचे यातून स्पष्ट झाले.**

**- डॉ. आरतीश्यामल जोशी**

राज्यातील उद्योगस्नेही वातावरण, उद्योगापूरक धोरणे आणि कुशल मनुष्यबळाच्या उपलब्धतेमुळे देश-विदेशातून महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी ओघ वाढतोय. देशातील पहिले ग्रीनफिल्ड औद्योगिक शहर ऑरिकमध्ये गुंतवणुकीला पसंती मिळत आहे. गेल्या काही दिवसांत ऑरिकमध्ये एथर एनर्जी, लुब्रिझॉल इंडिया प्रा. लि., जेएसडब्ल्यू ग्रीन मोबिलिटी लि. यासारख्या उद्योगांनी मोठी गुंतवणूक केली. त्यातील काही उद्योगांना भूखंडही देण्यात आले. या मालिकेत आता टोयोटा किर्लोस्करच्या रूपाने ऑटोमोबाइल क्षेत्रातील सर्वात मोठी गुंतवणूक राज्यात दाखल झाली आहे. हा प्रकल्प मराठवाड्याचे औद्योगिक चित्र बदलून टाकणार असून यामुळे विभागाच्या अर्थकारणाला चालना मिळणार आहे.

### सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या

टोयोटा किर्लोस्कर छत्रपती संभाजीनगर येथील ऑरिक सिटीमध्ये तब्बल २० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्स निर्मितीच्या ग्रीनफिल्ड प्रकल्प उभारणार आहे. ३१ जुलै २०२४ रोजी मुंबईच्या सह्याद्री अतिथीगृह येथे राज्य शासनाचा उद्योग विभाग आणि टोयोटा किर्लोस्करमध्ये या प्रकल्पासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, टोयोटा किर्लोस्कर मोटर्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मसाकाझू योशिमुरा सान आणि उपाध्यक्षा मानसी टाटा, गीतांजली किर्लोस्कर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसी सीईओ विपिन शर्मा आदी उपस्थित होते.

### वर्षाकाठी ४ लाख वाहनांची निर्मिती

टोयोटा किर्लोस्करच्या छत्रपती संभाजीनगर प्रकल्पातून इलेक्ट्रिक आणि हायब्रीड कार्सचे उत्पादन होणार आहे. यातून सुमारे ८ हजार थेट आणि अप्रत्यक्ष ८ हजार अशी १६ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे. वर्षाला ४ लाख कार्सची निर्मिती होणे अपेक्षित आहे. प्रकल्पासाठी ८५० एकर जागा देण्यात आली आहे. प्रकल्पासाठी लागणारे सुटे भाग व अन्य सेवा देण्यासाठी परिसरात एक नवीन इकोसिस्टीम तयार होईल. यातून अजून रोजगारनिर्मिती होऊ शकते.



### मोटार निर्मिती उद्योगात क्रांती आणणारा प्रकल्प

**- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, छत्रपती संभाजीनगर येथे टोयोटा किर्लोस्करच्या प्रकल्पामुळे मराठवाड्याला मोठा फायदा तर




होईलच शिवाय भारताच्या ई कार्स निर्मिती उद्योगातही क्रांती येईल. राज्य शासनदेखील इलेक्ट्रिक वाहनांना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देत असून सार्वजनिक वाहतूक यंत्रणेतदेखील वाहनांचा वापर वाढवला आहे. गृहनिर्माण संस्थांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंग केंद्र उभारण्यासाठी कायद्यात आवश्यक ते बदल केले आहेत. राज्यात सर्वोत्तम दळणवळण, कुशल मनुष्यबळ, पायाभूत सुविधा आणि जागा उपलब्ध आहे. टोयोटाचे आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान आणि आमचे कुशल मनुष्यबळ याची चांगली सांगड होईल. राज्यात शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, गृहनिर्माण अशा सुविधा मुबलक उपलब्ध असून कोणत्याही उद्योगाच्या कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना आनंदाने राहता येईल असे वातावरण आहे. राज्य विदेशी गुंतवणुकीत अग्रेसर असून गेल्या दोन वर्षात दावोस येथे झालेल्या ६० दशलक्ष डॉलर्सच्या करारांची ८० टक्के अंमलबजावणी झाली आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. मुख्यमंत्री शिंदे यांनी भाषणाची सुरुवात जपानी भाषेत नमस्कार म्हणजे 'कोनीचिवा' असे संबोधून केली, तर आभारदेखील 'एरीगेटो गोझामासू' अशा शब्दात मानले.



### टोयोटा आल्याने अपूर्णता संपली

**- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उपममुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या कराराचे वर्णन 'ऐतिहासिक'अशा शब्दात केले. फडणवीस म्हणाले, या प्रकल्पासाठी गेल्या काही महिन्यांपासून बोलणी सुरू होती. राज्य शासन आणि टोयोटा दोघेही ही बोलणी प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कठोर मेहनत घेत होते. स्पर्धा कठीण होती. टोयोटाला अन्य राज्यातूनही ऑफर दिल्या जात होत्या. मात्र, आम्ही पहिल्या दिवसापासून सांगत होतो की, महाराष्ट्र कंपनीला अशा ऑफर देईल की त्यांना नाही म्हणताच येणार नाही. या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. राज्यात अनेक ऑटोमोबाइल उद्योग आहेत; पण टोयोटा नसल्याने ते अपूर्ण होते. आता राज्यात टोयोटा आल्याने हे सेक्टर पूर्ण झाले आहे. हा प्रकल्प छत्रपती संभाजीनगरमध्ये येत आहे. राज्याचे औद्योगिक भविष्य छत्रपती संभाजीनगरमध्येच आहे. समृद्धी महामार्ग आणि डीएमआयसी ऑरिकमुळे भविष्यातील अजून मोठ्या प्रमाणात येथे गुंतवणूक आकर्षित होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या गुंतवणुकीमुळे मराठवाड्यात रोजगारनिर्मिती तर होणारच आहे; पण आर्थिक प्रगतीही साध्य होणार आहे. राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर करण्याकडे वाटचाल सुरू केली आहे. हा करार अर्थव्यवस्था वाढीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यास महत्त्वपूर्ण ठरणार आहे. राज्यात देशातील सर्वात मोठे वाढवण बंदर तर जालन्यात ड्रायपोर्ट होत आहे. त्याचा गुंतवणुकीला फायदा होईल, असेही ते म्हणाले.



### अडीच दशकाचे संबंध दृढ होणार

**- मसाकाझू योशीमुरा, व्यवस्थापकीय संचालक, टोयोटा किर्लोस्कर**

टोयोटा किर्लोस्कर मोटर्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मसाकाझू योशिमुरा सान म्हणाले, भारत आणि महाराष्ट्राच्या समग्र विकासात टोयोटादेखील एक भागीदार बनू इच्छिते. देशाशी गेल्या अडीच दशकापासून आमचे संबंध असून ते या प्रकल्पाच्या अजून वाढीस लागतील असेही म्हणाले. मानसी टाटा यांनीदेखील यावेळी राज्य शासनाचे या प्रकल्पासाठी सहकार्य मिळाल्याबद्दल आभार मानले. प्रारंभी प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी या प्रकल्पामागची भूमिका स्पष्ट केली. उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे यांनी सूत्रसंचालन केले.

*(या लेखाच्या लेखिका उद्योजक मासिकामध्ये कनिष्ठ प्रकल्प अधिकारी (से.पू.) म्हणून कार्यरत असून त्यांना मराठी आणि इंग्रजी प्रसारमाध्यमात कामाचा सतरा वर्षांचा अनुभव आहे.)*



**छत्रपती संभाजीनगरात उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उद्योजकांचा सत्कार**

# ५२ हजार कोटींची गुंतवणूक आर्थिक क्रांती घडविणार

**अथर एनर्जी, जेएसडब्ल्यू, टोयोटा किर्लोस्कर आणि लुब्रिझॉल या उद्योगसमूहांनी तब्बल ५२ हजार कोटींच्या औद्योगिक गुंतवणुकीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील औद्योगिक वसाहतीची निवड केली आहे. ही गुंतवणूक मराठवाड्याच्या शाश्वत विकासाची आर्थिक क्रांती घडवेल, असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले. राज्यात लवकरच आणखी एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.**

**- प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगरच्या ऑरिक सिटीमध्ये लुब्रिझॉल, अथर एनर्जी, टोयोटा-किर्लोस्कर आणि जेएसडब्ल्यू मोबिलिटी या ४ कंपन्यांनी सुमारे ५२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. या गुंतवणुकीमुळे उद्योजकांची संघटना मसिआच्या वतीने उद्योगमंत्री सामंत यांचा तर सामंत यांच्या हस्ते गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. १२ ऑगस्ट रोजी झालेल्या कार्यक्रमात सामंत बोलत होते.

## पूरक उद्योग विकासाला चालना

उदय सामंत म्हणाले, मराठवाड्यामध्ये झालेल्या या गुंतवणुकीमुळे मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाबरोबर शाश्वत विकास होणार आहे. ही गुंतवणूक विभागात आर्थिक क्रांती घडवणारी ठरेल. लघुउद्योगास प्रोत्साहन मिळेल. तसेच प्रशिक्षण देणाऱ्या संस्था निर्माण होतील. तरुणांना रोजगार उपलब्ध होऊन पूरक उद्योग विकासाला चालना मिळेल. उद्योगासाठी उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य असून त्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील आहोत. उद्योग उभारताना शेतकऱ्यांना अडचण येणार नाही याची काळजी शासन घेत आहे. राज्याच्या या धोरणांमुळे आगामी काळात राज्यात एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

## व्हेंडर साखळी तयार करा

शहरातील नवीन गुंतवणुकीमुळे येथील सुमारे १५ हजार तरूणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. या कंपन्यांना ज्या प्रकारचे कुशल मनुष्यबळ हवे आहे, तशा प्रकारचे कौशल्य विकासाचे ट्रेनिंग युवकांना देण्याचे कंपन्यांना सांगितले आहे. तसेच कंपन्यांना ज्या प्रकारचे स्पेअर पार्ट लागतील, त्यासाठी आवश्यक तशी इको सिस्टीम येथे आहे. मात्र लघु उद्योजकांशी संवाद साधून येथेच व्हेंडर साखळी विकसित करण्याच्या सूचनाही कंपन्यांना दिल्याचे सामंत म्हणाले.

## लवकरच १ लाख कोटीची गुंतवणूक

या प्रसंगी आयोजित एका पत्रकार परिषदेत सांमत यांनी लवकरच राज्यात आणखी १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असल्याची माहिती दिली. ही गुंतवणूक महाराष्ट्राच्या वेगवेगळया प्रांतात होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

## पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी वळविणार

कोकणात वाहून जाणाऱ्या पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी नदीजोड प्रकल्पाद्वारे मराठवाड्यात आणून तीन वर्षात येथील पाणी प्रश्न कायमचा सोडविला जाणार असल्याचे राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले. यासाठी केंद्र आणि राज्य सरकार निधी कमी पडू देणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी सावे यांनी सावंत यांच्याकडे क्रिकेटच्या स्टेडियमसाठी एमआयडीसीची जागा देण्याची मागणी केली केली. याबाबत लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन सामंत यांनी दिले.



### मान्यवरांची उपस्थिती

चिकलठाणा एमआयडीसीतील मसिआ रत्नप्रभा बाळासाहेब पवार सभागृहात झालेल्या कार्यक्रमाला राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, राज्यसभेचे खासदार डॉ. भागवत कराड, खासदार संदिपान भुमरे, आमदार संजय शिरसाठ, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मलिकनेर, मसिआचे अध्यक्ष चेतन राऊत, एथर एनर्जी कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष सुब्रतो कुमार मित्रा, टोयोटा किर्लोस्कर उद्योगसमूहाचे उपव्यवस्थापकीय संचालक स्वप्नेश मारू, जेएसडब्ल्यू उद्योगसमूहाचे प्रकल्प व्यवस्थापक बीभू नंदा आणि लुब्रिझॉलचे प्रतिनिधी नितीन मेनगी यांच्यासह मराठवाड्यातील विविध उद्योगसमूहाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### उद्योगातील नोकऱ्यांमध्ये स्थानिकांना प्राधान्य

जिल्हाधिकारी कार्यालयात बिडकीन औद्योगिक प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नासंदर्भात आयोजित बैठकीत सामंत म्हणाले, शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या म्हणून तेथे इतक्या मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येऊ शकली. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याकडे शासनाची भूमिका आहे. उद्योगांमध्ये स्थानिकांना नोकरीत प्राधान्य देण्याची शासनाचे धोरण आहे. शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी दिली जाईल. शैक्षणिक पात्रता नसेल तर आवश्यक कुशल मनुष्यबळासाठी कंपनीमार्फत कौशल्य प्रशिक्षण देऊन स्थानिकांना नोकरीत सामावून घेतले जाईल. छत्रपती संभाजीनगरच्या बिडकीन एमआयडीसीसाठी जमिनी दिलेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा आर्थिक मोबदला देण्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेऊ, असे सामंत म्हणाले. ■■



*मा.श्री. दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से. विकास आयुक्त (उद्योग) तथा अध्यक्ष, सुकाणू परिषद, एमसीईडी यांच्या शुभहस्ते उद्योजक मासिकाच्या ऑगस्ट २०२४ अंकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी डावीकडून श्री. संजय बावस्कर, अंकेक्षण अधिकारी, श्री.संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक, उद्योजक मासिक, श्री.बी.टी.यशवंते, कार्यकारी संचालक, एमसीईडी तथा उद्योग सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर, श्री.सदाशिव सुरवसे, उद्योग सहसंचालक, उद्योग संचालनालय श्री.विवेक तोंडरे, समन्वय विभाग प्रमुख व श्री.दत्तात्रय थावरे, विभागीय अधिकारी, एमसीईडी, छत्रपती संभाजीनगर दिसत आहेत.*




**ईव्ही, लिथियम बॅटरी, सेमीकंडक्टर प्रकल्पांचा समावेश, २० हजार रोजगार**

# राज्यात ८१ हजार कोटींच्या ७ गुंतवणूक प्रकल्पांना मंजुरी

**राज्यात गुंतवणूकदारांचा ओघ वाढत असून ८१ हजार १३७ कोटी रुपये गुंतवणुकीच्या विशाल आणि अतिविशाल अशा सात प्रकल्पांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीत मंजुरी देण्यात आली. यामध्ये उच्च तंत्रज्ञानावर आधारित लिथियम बॅटरी, इलेक्ट्रिक व्हेइकल, सेमीकंडक्टर चिप, फळांचा पल्प निर्मिती प्रकल्पांचा समावेश असून कोकणसह मराठवाडा, विदर्भ या भागात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे राज्यात सुमारे २० हजार जणांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होणार आहे.**

**- प्रतिनिधी**

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे ३० जुलै रोजी झालेल्या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आय. एस. चहल, प्रधान सचिव विकास खारगे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले की, राज्यात उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी औद्योगिक धोरणानुसार सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत विविध प्रोत्साहने जाहीर करण्यात आलेली आहेत. आजच्या बैठकीत उच्च तंत्रज्ञानावर आधारित लिथियम आयन सेल/बॅटरी, इलेक्ट्रिक व्हेइकल, सेमीकंडक्टर चिप्स, सोलर पीव्ही मॉड्यूल्स आणि इलेक्ट्रोलायझर, फळाचा पल्प आणि रस यावर आधारित उत्पादन प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पांची माहिती अशी -

**जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी इलेव्हन लि. :** जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी इलेव्हन लि. यांचा लिथियम बॅटरी निर्मितीचा अतिविशाल प्रकल्पासाठी गुंतवणूक हा प्रकल्प नागपूर भागात होणार आहे. प्रकल्पामध्ये एकूण २५ हजार कोटी एवढी गुंतवणूक होणार आहे. ५००० पेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे. जेएसडब्ल्यू ग्रीन मोबिलिटी लि. कंपनी इलेक्ट्रिक आणि हायब्रीड वाहन निर्मितीचा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होणारा राज्यातील पहिलाच अतिविशाल प्रकल्प आहे. हा प्रकल्प छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. या प्रकल्पामध्ये एकूण २७ हजार २०० कोटी एवढी गुंतवणूक होणार असून, ५२०० पेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे. या प्रकल्पामध्ये वार्षिक ५ लाख इलेक्ट्रिक प्रवासी कार व १ लाख व्यावसायिक कार निर्मितीचे नियोजन आहे.

**आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स :** आरआरपी इलेक्ट्रॉनिक्स कंपनीमार्फत सेमीकंडक्टर चिप्स निर्मितीचा एकात्मिक प्रकल्प तळोजा/पनवेल, जि. रायगड/पुणे/उर्वरित महाराष्ट्रामध्ये उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्रातला हा पहिलाच सेमीकंडक्टर निर्मिती करणारा प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये प्रथम टप्प्यात रुपये १२ हजार कोटी एवढी गुंतवणूक होणार. ४००० पेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये एवढीच गुंतवणूक होणार आहे. महापे, नवी मुंबई येथे प्रकल्पाचे काम सुरू झाले असून, प्रायोगिक तत्त्वावर सप्टेंबर २०२४ पर्यंत सुरू होणार आहे.

**आवाडा इलेक्ट्रो कंपनी :** आवाडा इलेक्ट्रो कंपनीचा सोलर पीव्ही मॉड्यूल्स आणि इलेक्ट्रोलायझरचा एकात्मिक प्रकल्प अतिरिक्त एमआयडीसी, बुटीबोरी जि. नागपूर आणि एमआयडीसी भोकरपाडा, ता. पनवेल, जि. रायगड या परिसरात उभारण्यात येणार आहे. कंपनीमार्फत नवीकरणीय ऊर्जा स्रोताचा उच्च तंत्रज्ञानावर आधारित राज्यात प्रकल्प स्थापित होणार आहे. प्रकल्पामध्ये एकूण १३ हजार ६४७ कोटी एवढी गुंतवणूक होणार असून, याद्वारे ८००० पेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे.

**हिंदुस्थान कोकाकोला बेव्हरेज :** हिंदुस्थान कोकाकोला बेव्हरेज मार्फत फळाचा पल्प आणि रस यावर आधारित उत्पादन निर्मितीचा विशाल प्रकल्प रत्नागिरी येथे होणार आहे. १५०० कोटी एवढी गुंतवणूक होणार आहे.

**परनॉर्ड रिकार्ड इंडिया :** परनॉर्ड रिकार्ड इंडिया प्रा.लिमिटेड मार्फत मद्यार्क निर्मितीचा विशाल प्रकल्प अतिरिक्त बुटीबोरी एमआयडीसी, नागपूर येथे स्थापन करण्याचे नियोजित आहे. प्रकल्पामध्ये रु. १७८५ कोटी एवढी गुंतवणूक होणार आहे.




## सिंथेटिक ऑर्गेनिक रासायनिक उत्पादन सुविधा स्थापन करणार, ९०० रोजगार

# लुब्रिझॉल इंडियाची छत्रपती संभाजीनगरात २००० कोटीची गुंतवणूक

**लुब्रिझॉल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एलआयपीएल) या ऑटोमोटिव्ह आणि औद्योगिक वंगणासाठीच्या मिश्रित प्रणाली क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीद्वारे छत्रपती संभाजीनगरच्या बिडकीन औद्योगिक क्षेत्रात आधुनिक वंगण आणि इंधन मिश्रित उत्पादन प्रकल्प उभारला जाणार आहे. सुमारे २००० कोटी रुपये गुंतवणुकीच्या या प्रकल्पामुळे मराठवाड्याच्या विकासाला हातभार लागण्याबरोबरच ९०० जणांना रोजगार उपलब्ध होणार आहे.**

**- प्रतिनिधी**

उद्योग विभाग आणि लुब्रिझॉल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडमध्ये ३० जुलै रोजी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे आणि लुब्रिझॉल इंडिया मीडल ईस्ट आणि आफ्रिकेच्या व्यवस्थापकीय संचालक भावना बिंद्रा यांनी करारावर स्वाक्षरी केली. एमआयटीएल (ऑरिक) चे व्यवस्थापकीय संचालक पी. डी. मलिकनेर, लुब्रिझॉल ॲडिटिव्हचे अध्यक्ष फ्लाविओ क्लिगर आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी मंत्री सामंत यांच्या हस्ते बिडकीन परिसरातील १२० एकर जागेचे वाटप पत्र लुब्रिझॉल कंपनीस सुपूर्द करण्यात आले.

### मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाला हातभार

उद्योगमंत्री सामंत म्हणाले, लुब्रिझॉल समूहाने 'मेक इन इंडिया' कार्यक्रमांतर्गत आपली गुंतवणूक वाढवण्याची आणि उत्पादन क्षमता वाढवण्याची योजना आखली आहे. यामुळे छत्रपती संभाजीनगर आणि मराठवाड्याच्या औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीस हातभार लागेल. त्याचबरोबर रोजगार देखील निर्माण होतील. उद्योग विभाग कंपनीला पूर्ण सहकार्य करेल.

### दोन टप्प्यात गुंतवणूक, ९०० रोजगार

लुब्रिझॉल इंडिया प्रा. लि. ऑरिक बिडकीन येथे नवीन सिंथेटिक ऑर्गेनिक रासायनिक उत्पादन सुविधा स्थापन करणार आहे. कंपनी दोन टप्प्यांमध्ये सुमारे दोन हजार कोटींची गुंतवणूक करणार असून यामुळे पुढील काही वर्षांत सुमारे ९०० रोजगार उपलब्ध होईल. प्रस्तावित गुंतवणुकीअंतर्गत ऑरिक बिडकीन येथे १२० एकर जागेत आधुनिक वंगण आणि इंधन मिश्रित उत्पादन प्रकल्प स्थापन केला जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. लुब्रिझॉलचा हा प्रकल्प भारतातील सर्वात मोठा, तर जगातील दुसरा सर्वात मोठा प्रकल्प असेल अशी माहिती लुब्रिझॉल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या भावना बिंद्रा यांनी यावेळी दिली.



भविष्यात राज्यातील ३० टक्के पोलाद उत्पादन गडचिरोलीतून

# सुरजागड इस्पात पोलाद भूमिपूजन

**गडचिरोली येथील निर्माणाधीन सुरजागड पोलाद प्रकल्पातून ८ दशलक्ष टन, तर लॉईड्स प्रकल्पातून ४ दशलक्ष टन पोलाद उत्पादन होणार आहे. हे प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यावर महाराष्ट्रात ३० टक्के पोलाद उत्पादन एकट्या गडचिरोलीतून होणार आहे. त्यामुळे येथे उद्योग व रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होत आहेत. येथील सामान्य माणूस समृद्धीकडे जात असल्याचे चित्र लवकरच पाहायला मिळेल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

**- प्रतिनिधी**



### गडचिरोली विकासाचे केंद्र बनणार

**- उपमुख्यमंत्री अजित पवार**

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, गडचिरोली जिल्ह्यातील हजारो कोटींची खनिज संपत्ती येथील आदिवासी समाजाला आर्थिक सुबत्ता देऊन जाईल. त्यानिमित्त जिल्ह्यात येणाऱ्या हजारो कोटी गुंतवणुकीचा येथील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. राज्य शासनातर्फे शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे काम करण्यात येत आहे. या अनुषंगाने वीजबिलात माफी, धानाला बोनस, दर्जेदार शिक्षण, पाच लाख रुपयांपर्यंत आरोग्य विमा अशा विविध सवलतीच्या योजनांसोबतच आता महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेतून दरमहा १५०० रुपये मदत पात्र महिलांना देण्याची योजना शासन राबवत असल्याचे ते म्हणाले. गडचिरोली हे महाराष्ट्राच्या विकासाचे केंद्र बनेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

सुरजागड इस्पात स्टील प्रकल्पाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १७ जुलै रोजी वडाळापेठ, अहेरी येथे करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. धर्मरावबाबा आत्राम, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, लॉईड्स मेटलचे प्रमुख प्रभाकरन, सुरजागड इस्पात कंपनीचे प्रमुख सुनील जोशी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

**गडचिरोलीत पायाभूत सुविधांचा विकास :** उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, गडचिरोली जिल्ह्यात सुरू होणाऱ्या उद्योगात ८० टक्के रोजगार स्थानिकांना उपलब्ध करून देण्याच्या अटी घालण्यात आल्या आहेत. त्याचा स्थानिक नागरिकांना फायदा होणार आहे. गडचिरोली जिल्ह्यातील जल, जमीन, जंगल हे वैभव टिकवूनच येथे उद्योगधंदे सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. यासोबतच आदिवासींचे दैवत असलेल्या ठाकूर देवाजवळ कोणत्याही प्रकारचे उत्खनन होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. चामोर्शीत सुद्धा ३५,००० कोटींची गुंतवणूक होत असून त्यातून २०,००० इतकी रोजगारनिर्मिती होणार आहे. गडचिरोली जिल्ह्यात विमानतळ, रेल्वेचे काम प्रगतीपथावर आहे. यासोबतच येथे शिक्षण हब तयार करण्यात येत आहे. येथील मेडिकल कॉलेजला मंजुरी मिळाली आहे. १७० कोटींचे इनोव्हेशन सेंटर तयार होत आहे. शासनाने उच्च व तंत्र शिक्षण घेणाऱ्या मुलींना शंभर टक्के फी सवलत तर मुलांना ५० टक्के सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. गडचिरोली जिल्हा उद्योग व्यवसायाच्या दृष्टीने समृद्धी महामार्गाने मुंबईपर्यंत जोडण्यात येणार आहे. यासोबतच चामोर्शी ते काकीनाडा बंदरापर्यंत मालवाहतुकीसाठी जलमार्ग तयार करण्यासाठी अभ्यास समिती नेमण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कंपनीत नियुक्त १६ सुरक्षारक्षकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. याशिवाय स्टील प्लांटतर्फे रुग्णवाहिका व विद्यार्थ्यांना शालेय पुस्तके वितरित करण्यात आले. कार्यक्रमाला उद्योग क्षेत्रातील मान्यवर, संबंधित अधिकारी तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

■■



### गडचिरोली होणार उद्योगनगरी, विकासाचे केंद्र बनणार

**- उद्योगमंत्री उदय सामंत**

उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, दावोस कराराच्या अंमलबजावणीचे उदाहरण म्हणजे हा भूमिपूजन कार्यक्रम आहे. येथे अजून ३५ हजार कोटींचे प्रकल्प सुरू होणार आहेत. तसेच मोठ-मोठ्या कंपन्या येथे उद्योग सुरू करण्यासाठी इच्छुक असल्याने एकंदरीत उद्योगनगरी असे गडचिरोलीचे नामकरण होणार असल्याचे ते म्हणाले. नुकत्याच झालेल्या जिल्हा गुंतवणूक परिषदेअंतर्गत नागपूर विभागात तब्बल ५ हजार कोटींचे उद्योग येणार असून पुढील एक ते दोन महिन्यांत गडचिरोली जिल्ह्यात दीड लाख कोटींचे प्रकल्प येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



### प्रकल्पातून ७ हजार रोजगार

**- आमदार धर्मरावबाबा आत्राम**

डॉ. धर्मरावबाबा आत्राम म्हणाले, अहेरी विधानसभा क्षेत्रात शिक्षण, सिंचन आणि रोजगारनिर्मितीचे लक्ष पूर्ण करून क्रांती घडवून आणायची आहे. हा प्रकल्प १० हजार कोटी रुपयांचा असून यातून ७००० पेक्षा अधिक स्थानिकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. संपूर्ण प्रकल्प २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले.



## जपानचे नवनियुक्त कॉन्सुलेट जनरल यागी कोजी यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

# जपानने महाराष्ट्राच्या उद्योग, पायाभूत सुविधा क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी

**महाराष्ट्र हे उद्योगस्नेही आणि गुंतवणुकीसाठी पहिल्या पसंतीचे राज्य आहे. अनेक जपानी कंपन्या राज्यात चांगल्या पद्धतीने काम करत आहेत. भविष्यात देखील जपानने राज्यात उद्योग आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात गुंतवणूक वाढवावी, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.**

**- प्रतिनिधी**

जपानचे नवनियुक्त कॉन्सुलेट जनरल यागी कोजी यांनी ३१ जुलै रोजी मुख्यमंत्र्यांची वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ.आय एस चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, जपानी शिष्टमंडळातील प्रतिनिधी शिमाडा मेगूमी उपस्थित होते.

### महाराष्ट्र पहिल्या पसंतीचे राज्य

सुरुवातीला मुख्यमंत्र्यांनी कोजी यांनी पदभार स्वीकारल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. याच दिवशी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी टोयोटा किर्लोस्कर सोबत करार करण्यात आला आणि कोजी यांनी महाराष्ट्राला भेट दिली हा चांगला योगायोग असल्याचे सांगीतले. मुख्यमंत्री, भारत आणि जपान हे आशिया खंडातील महत्त्वाचे देश असून दोन्ही देशात खूप जुने आणि मजबूत संबंध आहेत. महाराष्ट्र हे भारतातील गुंतवणुकीसाठी उद्योगांच्या पहिल्या पसंतीचे राज्य आहे. जपानी कंपन्यांनी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली असून राज्याच्या आणि मुंबईच्या पायाभूत सुविधा विकासात देखील मोठे सहकार्य दिले आहे. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक आणि देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेली मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन ही याची उदाहरणे आहेत. आमच्या सरकारच्या माध्यमातून एमटीएचएल अपेक्षित वेळच्या आत पूर्ण करण्यात येऊन जनतेसाठी खुला करण्यात आला, तर बुलेट ट्रेनच्या कामाला सुद्धा मोठा वेग देण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले. जपानी कंपन्यांसाठी पुणे जिल्ह्यातील सुपे येथे विशेष इंडस्ट्रियल पार्क विकसित करण्यात येणार असून भविष्यात देखील राज्यात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्या कंपन्यांना सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### महाराष्ट्राच्या विकासात जपानचा सहभाग

कॉन्सुलेट जनरल यागी कोजी म्हणाले, भारत आणि जपान यांचे संबंध अधिक मजबूत व्हावेत, ही आमची भूमिका आहे. टोयोटा किर्लोस्कर कंपनीने राज्यात केलेला गुंतवणुकीचा करार हा महाराष्ट्रातील उद्योगस्नेही वातावरणाचे द्योतक आहे. एमटीएचएल आणि बुलेट ट्रेनसारख्या प्रकल्पाच्या माध्यमातून जपान महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात जपान सहभागी आहे, याचा आनंद आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात जपानचा सहभाग असलेले प्रकल्प वेगाने मार्गी लागले आहेत, अशा शब्दात त्यांनी मुख्यमंत्र्यांचे कौतुक केले. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी बांबूपासून तयार केलेल्या विविध वस्तू भेट देऊन कोजी यांचे स्वागत केले.



## मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

# धोरण रोजगारनिर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

**''नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा'', असे नेहमी सांगितले जाते. मात्र, मार्गदर्शन व गुंतवणुकीसाठी पैशांचा अभाव असल्याने अनेकांचे उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही. ते सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपी मोलाची भूमिका बजावत आहे. मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) या योजनेस मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेजी व मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारने या योजनेत सुधारणा करण्याबाबतचा निर्णय नुकताच घेतलेला आहे. या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख, तर सेवा व कृषिपूरक प्रकल्पांसाठी २० लाख रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य केले जाते. योजनेचे लक्षांक सहापटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५४१ कोटींची तरतूद करण्यात आली असून, याचा लाभ सुमारे ३०,००० घटकांना होणार आहे. या सुधारित तरतुदींचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे. या योजनेस मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे, तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वयंरोजगार उभारण्यासाठी आजच मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमाचा (सीएमईजीपी) लाभ घ्या व उद्योजक बनण्याचे स्वप्न साकार करा.**

**- संतोष बोर्डे**



**मा.श्री. उदय सामंत**
उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नावीन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे.

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रांत उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशीलतेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' ही योजना दिनांक १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे.

**मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP)**

**Chief Minister Employment Generation Programme**

**स्वयंरोजगारास देई आधार, हेच आपले सरकार!**

**उद्देश :** राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशीलतेला वाव मिळून राज्यात

स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे.

**दिनांक ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयामधील तरतूद :**

**पात्रता अटी :** राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती/जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक) ५ वर्षांची अट शिथिल.

- रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रु.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास.

- अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/महामंडळांच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

**प्रकल्प मर्यादा किंमत :** उत्पादन व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु. ५० लाख व सेवा/कृषिपूरक उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रु. १० लाख.

**योजना अंमलबजावणी यंत्रणा :** अ) शहरी भागासाठी : जिल्हा उद्योग केंद्र ब) ग्रामीण भागांसाठी : जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

**पात्र मालकी घटक :** वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले स्वयंसहाय्यता गट.

**प्रकल्प खर्च उभारणी व राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य (मार्जिन मनी-अनुदान) :**

**बँक/वित्तीय संस्था यांचा सहभाग :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत स्वयंगुंतवणूक व राज्य शासनाचे (अनुदान स्वरूपातील) आर्थिक सहाय्य या व्यतिरिक्त आवश्यक ६० ते ७५ टक्के कर्ज पुरवठा बँकांमार्फत उपलब्ध होईल. राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेड्युल्ड बँका, खाजगी बँका, सुधारित तरतुदींनुसार काही जिल्ह्यांतील मध्यवर्ती सहकारी बँका, इत्यादीमार्फत बँक कर्ज उपलब्ध होईल.

**लाभार्थी निवड :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेची संपूर्ण ऑनलाइन पद्धतीने अंमलबजावणी होईल. यासाठी विशेष सीएमईजीपी पोर्टल अर्जदारांसाठी उपलब्ध असेल. अर्जदारांनी अर्ज केल्यानंतर जिल्हा स्तरावरील स्थापित कार्यबल समितीच्या छाननीअंती मान्यता दिलेले प्रस्ताव संबंधित बँकांना शिफारस करण्यात येतील. बँकांमार्फत प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासून प्रकल्प मंजुरी व कर्ज मंजुरीबाबत बँक निर्णय घेईल. बँक मंजुरीच्या अनुषंगाने मंजुर प्रकल्प किमतीस पात्र असणारे अनुदान संबंधित कर्ज खात्यात राज्य शासनाच्या तरतुदीतून वितरित होईल. राज्य शासनाचे अनुदान ३ वर्षे कालावधीसाठी लॉक इन राहील. प्रकल्प यशस्वीरीत्या अंमलबजावणी झाल्याची खात्री लावल्यानंतर राज्य शासनाचे अनुदान वितरित होईल. संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाइन असल्याने अर्जदारांना कार्यालयात भेटी देण्याची आवश्यकता नाही.

**प्रशिक्षण :** योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजुर झालेल्या अर्जदारांसाठी निःशुल्क निवासी स्वरूपाचे उद्योजकीय प्रशिक्षण शासनमान्य संस्थांच्या सहयोगाने आयोजित करण्यात येईल. सदर प्रशिक्षण, उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पांसाठी २ आठवडे व सेवा, कृषिपूरक उद्योग, व्यवसायांसाठी १ आठवडा मुदतीचे असेल. कर्ज वितरणापूर्वी सदर प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.

सदर प्रशिक्षणात उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकसित होणारे, क्षमतावृद्धी व आत्मविश्वास वाढविणारे, विविध विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन, उद्योग भेटी, यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन इ. प्रमुख बाबींचा समावेश असेल.

**(अ) सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे :**

- जन्म दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/वयाचा पुरावा; - शैक्षणिक पात्रतेसंबंधीची कागदपत्रे/प्रमाणपत्रे; - आधार कार्ड; - नियोजित उद्योग/व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (साध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल; - जातीचे प्रमाणपत्र (एस.सी./एस.टी.प्रवर्गासाठी); - विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक); - वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना; - स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking)

**(ब) संगणकीय प्रणालीवर (CMEGP PORTAL) आवश्यक माहिती नोंदविल्यास प्रकल्प संकीर्ण अहवाल तयार होईल. त्याची प्रत उपरोक्त कागदपत्रांसोबत अर्जासमवेत सादर करावी.**

**मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम - अर्ज व प्रकल्प उभारणींतर्गत टप्पे :**

जिल्हा स्तरावर CMEGP पोर्टलवर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे ऑनलाइन अर्ज सादर.

- महाव्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावांची छाननी, प्राथमिक पात्र प्रस्तावांची यादी.

- जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रस्तावांची अंतिम निवड व विविध बँकांना कार्यक्षेत्रनिहाय कर्ज प्रस्तावांची शिफारस.

- बँकस्तरावर प्रस्तावाची आवश्यक ती शहानिशा कर्ज प्रस्ताव मंजुरीबाबत बँकेकडून अंतिम निर्णय.

प्रस्तावास बँक मंजुरी असल्यास बँकेकडून सादर शासनाच्या अनुदान (मार्जिन मनी) प्रस्तावाची उद्योग संचालनालयाकडून छाननी व मंजुरी. उद्योग संचालनालयाच्या मान्यतेनंतर नोडल बँकेद्वारा संबंधित बँकेस अनुदान वितरण निर्देश. अर्जदारांनी स्वतःची ५ ते १० टक्के रक्कम उपलब्ध केल्यावर व आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मंजुर रकमेचे पूर्ण कर्ज वितरण.

- प्रकल्प उभारणी व कार्यान्वयन

- ३ वर्षे प्रकल्प यशस्वीपणे अंमलबजावणी झाल्यानंतर शासनाच्या अनुदानाचे अर्जदाराच्या कर्ज खात्यात समायोजन (Settlement of Claim).

**सुधारित शासन निर्णय ११/११/२०२२ :** मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समितीने केलेल्या शिफारशीनुसार, मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेबाबत दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**मुद्दा क्र.१ (ब) पात्र मालकी घटक :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट.

**सुधारित तरतूद :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी,

भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट यांचेसह एकल मालकी कंपनी (ओपीसी) व मर्यादित दायित्व संस्था (एलएलपी).

**मुद्दा क्र. २ (२.१)** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**मुद्दा क्र. २ (२.२) प्रकल्प खर्चाचे वर्गीकरण :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल. घटकाचा प्रवर्ग/प्रभाग - अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल.

**घटकाचा प्रवर्ग/प्रभाग :**

| घटकाचा प्रवर्ग/प्रभाग | घटकाची स्वगुंत-वणूक | देय अनुदान (मार्जिन मनी) | | बँक कर्ज | |
|---|---|---|---|---|---|
| घटकाचा प्रभाग | --- | शहरी | ग्रामीण | शहरी | ग्रामीण |
| अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक | ५% | २५% | ३५% | ७०% | ६०% |
| उर्वरित प्रवर्ग | १०% | १५% | २५% | ७५% | ६५% |

**मुद्दा क्र. ३ (३.२.१) वित्तीय संस्था (बँक) :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड (शेड्युल्ड बँक) या व्यतिरिक्त ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.



**मा.श्री. दीपेंद्र सिंह कुशवाह,**
विकास आयुक्त (उद्योग)

**मुद्दा क्र. ३ (३.२.२) :** योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत तरतूद.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी योजनेअंतर्गत विशेष आयटी व समन्वय कक्षासाठीचा खर्च तसेच जिल्हा, विभागीय व मुख्यालय स्तरावर प्रवास खर्च, पुरस्कार, कार्यशाळा/शिबीर/प्रदर्शन, स्टेशनरी, संगणक व प्रिंटर दुरुस्ती इ. तसेच उद्योग संचालनलायच्या अधिनस्त कार्यालयात सीएमईजीपी योजनेच्या विविक्षित कामासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करून घेण्याकरिता अनुषंगिक खर्च इत्यादी आवश्यक सर्व बाबींकरिता स्वतंत्र उद्दिष्टनिहाय उद्दिष्ट शिर्षांची स्वतंत्र सूची निर्माण करण्यात येईल.

**उद्योग विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सूक्ष्म, लघु घटकांसाठी इतर महत्त्वपूर्ण योजना/उपक्रम :**

१) प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम, २) सुधारित बीज भांडवल योजना, ३) जिल्हा उद्योग केंद्र योजना, ४) महाराष्ट्र राज्य सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ५) केंद्र शासनाची सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ६) महिला उद्योजकता प्रोत्साहन योजना, ७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती/जमाती उद्योजकता प्रोत्साहन योजना, ८) निवासी/अनिवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम, ९) काथ्या प्रोत्साहन योजना, १०) औद्योगिक अविकसित भागातील उद्योगांना प्रोत्साहन देणारी सामूहिक प्रोत्साहन योजना -२०१९. ११) माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान पूरक सेवा तसेच उद्योगक्षेत्रनिहाय/संवर्गनिहाय इतर योजना. १२) उद्योगांच्या अडीअडचणी तसेच आवश्यक परवाने/दाखले ऑनलाइन उपलब्ध होण्यासाठी मैत्री कक्ष सुविधा उपक्रम.

मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी (CMEGP) योजनेचे लक्षांक पाचपटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५५० कोटींची तरतूद करण्यात आली असून याचा लाभ सुमारे २५,००० घटकांना होणार आहे.

**अधिक माहिती व संपर्कासाठी :**

**राज्यस्तरीय संनियंत्रण :**

**विकास आयुक्त (उद्योग),** उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

**राज्यस्तरीय समन्वय : हेल्पलाइन नंबर :** २२ २२०२ ३९१२.

**महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र** (संबंधित जिल्हा)

**जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी** (संबंधित जिल्हा)

**संकेतस्थळ** - www.maha-cmegp.gov.in
www.di.maharashtra.gov.in

*(या लेखाचे लेखक 'उद्योजक' मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक व 'उद्योजक' विभाग प्रमुख म्हणून एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहेत. त्यांचा ई-मेल udyojakmagazine2@gmail.com असून भ्रमणध्वनी ९४०३०७८७७९ आहे.)*



**अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना**

# आर्थिक स्वावलंबनास बळ

**देशातील सर्वाधिक महिला स्टार्टअप्स असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण करण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे. महिला स्टार्टअपच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीला चालना मिळून बेरोजगारी कमी करण्यास मदत होऊ शकेल.** **- प्रतिनिधी**

महिला नेतृत्वातील स्टार्टअप, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थीनीमधून उदयास येणारे स्टार्टअप यांना सुरूवातीपासून प्रोत्साहित करण्याकरिता राज्यात सुरू असणाऱ्या इन्क्युबेशन केंद्राच्या माध्यमातून मार्गदर्शन करून त्यांना स्टार्टअप सुरू करण्यास अर्थसहाय्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना' राबविण्यात येत आहे.

महिला नेतृत्वातील स्टार्टअपना आवश्यकतेप्रमाणे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिल्यास त्यांना संजिवनी मिळेल, अन्य महिलांनादेखील रोजगार उपलब्ध होईल. याबाबींचा विचार करून राज्यातील महिला नेतृत्वातील स्टार्टअप्सना प्रारंभिक टप्प्यावरच पाठबळ देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

महिला नेतृत्वातील स्टार्टअपमुळे स्थानिक गरजेवर आधारित व स्थानिक कच्चा माल उपलब्धतेवर आधारित स्टार्टअप विकसित होईल. स्टार्टअप विकासाद्वारे महिलामध्ये आत्मनिर्भरता वाढवून त्यांचा स्टार्टअपच्या विकासाच्या माध्यमातून उद्योगाचा व्यासायिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होणार आहे. शहरी व ग्रामीण पातळीपर्यंत स्टार्टअप परिसंस्थेच्या विकासामध्ये वाढ होण्यासही मदत होणार आहे.

देशातील सर्वाधिक महिला स्टार्टअप्स असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख निर्माण करण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरणार आहे. महिला स्टार्टअपच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीला चालना मिळून बेरोजगारी कमी करण्यास मदत होऊ शकेल. योजनेतील एकूण तरतूदीच्या २५ टक्के इतकी रक्कम शासनाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या मागासवर्गातील महिला, आर्थिकदृष्ट्या मागास वर्गातील महिलांकरीता राखीव ठेवण्यात येईल. राज्यातील महिला नेतृत्वातील प्रारंभिक टप्यातील स्टार्टअप्सना त्यांच्या उलाढालीनुसार किमान १ लाख ते कमाल २५ लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य करण्यात येणार आहे.


योजनेच्या लाभासाठी स्टार्टअप भारत सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाचा मान्यता प्राप्त महाराष्ट्र नोंदणीकृत महिला नेतृत्वातील असावा. स्टार्टअपमध्ये महिला संस्थापक किंवा सह संस्थापक यांचा किमान ५१ टक्के वाटा असावा. महिला नेतृत्वातील स्टार्टअप किमान एक वर्षापासून कार्यरत असावा. महिला नेतृत्वातील स्टार्टअपची वार्षिक उलाढाल १० लाख ते १० कोटी रुपयापर्यंत असावी. महिला नेतृत्वातील स्टार्टअप यांनी राज्य शासनाच्या कोणत्याही योजनेमधून अनुदान स्वरूपातील आर्थिक लाभ घेतलेला नसावा.

ही योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी यांना अंमलबजावणी संस्था म्हणून घोषीत करण्यात आली असून सोसायटीच्या www.msins.in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने निशुल्क अर्ज करता येईल. अर्ज करण्यासाठी कंपनीचा प्रस्ताव, कंपनी नोंदणी प्रमाणपत्रे, उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाचे मान्यता प्रमाणपत्र आदी कागदपत्रे आवश्यकता आहे. प्राप्त अर्जापैकी आश्वासक, नावीन्यपूर्ण व प्रभावी स्टार्टअप्सला प्राधान्य देण्यात येईल. प्राप्त अर्जापैकी रोजगारनिर्मिती करण्याऱ्या स्टार्टअप्सला विशेष प्राधान्य राहील.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची निवड प्रक्रियेकरीता आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय हे मुल्यांकन समिती गठीत करतील व या समितीमार्फत प्राप्त अर्जामधील निकषांनुसार पात्र ठरणाऱ्या स्टार्टअप्सचे सादरीकरण सत्र घेण्यात येईल व मूल्यांकन निकषांद्वारे स्टार्टअप्सची निवड करण्यात येईल. याकरीता स्टार्टअप क्षेत्रातील किंवा बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य संस्थेच्या सहकार्याने कार्यवाही करण्यात येईल. पात्र ठरणाऱ्या स्टार्टअप्स यांना देय ठरणारी रक्कम अनुदान स्वरूपात उपलब्ध करण्यात येईल.

राज्य शासनामार्फत सचिव, कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभाग यांचे अध्यक्षतेखाली 'सनियंत्रण व आढावा समिती' गठीत करण्यात आली असून या समितीद्वारे योजनेचा वेळोवेळी आढावा घेऊन आवश्यक त्या सुधारणा योजनेत करण्यात येतील. त्यामुळे ही योजना अधिक उपयुक्त ठरून राज्यातील महिलांना स्वावलंबी आणि रोजगार देणाऱ्या म्हणून त्यांची ओळख निर्माण करण्यात महत्त्वाची ठरणार आहे.

सचिन जाधव, सहायक आयुक्त, कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभाग, पुणे : महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीमार्फत महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा, स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज, स्टार्टअप सप्ताह यासारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करून स्टार्टअप परिसंस्थेला बळ देण्यात येत आहे. या योजनेच्या माहितीसाठी महिलांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१, रास्ता पेठ, पुणे येथे अथवा जवळच्या इन्क्युबेशन केंद्राशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.




## एकीचे बळ आणि प्रगती अटळ

# औद्योगिक समूह विकास योजना

**सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग म्हणजेच एमएसएमईमध्ये रोजगाराच्या मोठ्या संधी आहेत. देशाच्या एकूण उत्पादन क्षेत्रात एमएसएमईचा ४५ टक्के वाटा आहे. त्यामुळेच या क्षेत्राला चालना देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. औद्योगिक समूह विकास योजना त्याचाच एक भाग आहे. यात एका प्रवर्गातील किमान १० उद्योगांना एकत्र येऊन क्लस्टर स्थापन करता येते. त्यास प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या आकर्षक योजना आहेत. ग्रामीण, नक्षलग्रस्त आणि अविकसित भागात समूह विकास योजनेअंतर्गत उद्योग स्थापन करण्यासाठी विशेष सवलती आहेत. एकामेकास साह्य करून जीडीपीत वाटा, रोजगारनिर्मिती आणि उद्योजक होण्याच्या स्वप्नपूर्तीसाठी ही योजना अत्यंत उपयोगी आहे.** - प्रतिनिधी



**मा.डॉ.हर्षदीप कांबळे**
प्रधान सचिव, उद्योग

सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांचे (MSMEs) देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान आहे. सदर क्षेत्राचा एकूण उत्पादन क्षेत्रातील वाटा सुमारे ४५ टक्के असून, निर्यातीतील वाटा ४०% व रोजगार संधी उपलब्धतेतील वाटा सुमारे ६९% इतका आहे. MSME क्षेत्राचे महत्त्व विचारात घेऊन केंद्र तसेच राज्य शासनाने सदर क्षेत्रास चालना देण्यासाठी सामूहिक विकास संकल्पनेवर आधारित औद्योगिक समूह विकास योजना कार्यक्रम जाहीर केले आहेत.

राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम - समूह विकास योजना व राज्य शासनाच्या महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना या दोन योजनांची अंमलबजावणी उद्योग संचालनालयामार्फत राज्यात केली जात आहे. सदर योजनांतून सूक्ष्म व लघु उपक्रमाच्या सर्वांगीण विकास व वाढीकरिता क्षमतावृद्धी कार्यक्रम अंमलबजावणीसाठी तसेच सामायिक सुविधा निर्मितीसाठी अनुदान देण्यात येते. सामायिक सुविधा केंद्रांतर्गत (सीएफसी) संशोधन व विकास केंद्र, पॅकेजिंग केंद्र चाचणी तसेच प्रशिक्षण केंद्र, सामायिक जलनिस्सारण केंद्र, सामायिक प्रक्रिया केंद्र इत्यादी बाबींचा समावेश होतो.

**अ. महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (एमएसआय-सीडीपी) :** सन २०१३-२०१४ मध्ये महाराष्ट्र राज्याची औद्योगिक समूह विकास योजना शासन निर्णय दिनांक २५.०२.२०१४ अन्वये

अंमलात आली असून सदर योजनेंतर्गत राज्यातील क, ड व ड+ क्षेत्र, विनाउद्योग जिल्हे, नक्षलग्रस्त क्षेत्र व या क्षेत्रातील समूह विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत असून दिनांक २४.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करण्यात आलेली आहेत.

**पात्रता :** अ) विशिष्ट भौगोलिक क्षेत्रावर कार्यरत एकाच प्रकारच्या उद्योग प्रवर्गातील किमान १० सूक्ष्म, लघु कार्यरत घटक.

ब) सामूहिक प्रोत्साहन योजनेनुसार क, ड, ड+ आणि विना उद्योग जिल्हे तसेच नक्षलग्रस्त क्षेत्रे या भागात असणारे औद्योगिक समूह.

### १. योजनेअंतर्गत सुविधा :

**i) क्षमता वृद्धी कार्यक्रम अंमलबजावणी :** क्षमता वृद्धी कार्यक्रमाकरिता मंजूर प्रकल्प किंमत मर्यादा रु. १०.०० लाख असून त्याअंतर्गत राज्य शासनाचे अनुदान ९०% व लाभार्थ्यांचा सहभाग १०% आहे.

**ii) सामायिक सुविधा केंद्र उभारणी :** सामायिक सुविधा केंद्र उभारणीसाठी राज्य शासनाची अनुदान मर्यादा रु. १०.०० कोटी किंवा मंजूर प्रकल्प किमतीच्या ७०% यापैकी जी कमी रक्कम असेल ती.

औद्योगिक समूहात १००% सूक्ष्म उद्योग घटक असणाऱ्या औद्योगिक समूहाकरिता राज्य शासनाचे अनुदान ८०% राहील.

औद्योगिक समूहात १००% अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील उद्योग घटक, १००% महिला प्रवर्गातील उद्योग घटक असणाऱ्या औद्योगिक समूहाकरिता राज्य शासनाचे अनुदान ९०% राहील.

सदर योजनेंतर्गत राज्यातील एकूण १७४ औद्योगिक समूह प्रकल्पांना क्षमतावृद्धी कार्यक्रमांतर्गत मंजुरी देण्यात आलेली असून त्यापैकी ७४ औद्योगिक समूह प्रकल्पांना सामायिक सुविधा केंद्र उभारणींतर्गत अंतिम मंजुरी देण्यात आलेली आहे. अंतिम मंजुरी प्राप्त एकूण ७४ प्रकल्पांपैकी ३८ औद्योगिक समूह प्रकल्पांचे सामायिक सुविधा केंद्रे कार्यान्वित झालेली आहेत.

### ब. केंद्र शासनाची सूक्ष्म, लघु उपक्रम - समूह विकास योजना (MSE-CDP) :

केंद्र शासनाच्या सूक्ष्म, लघु व मध्यम (MSME) मंत्रालयमामार्फत सूक्ष्म, लघु उपक्रमासाठी सुधारित सूक्ष्म, लघु उपक्रम - समूह विकास योजना (MSE-CDP) दिनांक १०.०२.२०१० रोजी घोषित केली असून दिनांक १६.१०.२०१९ रोजी सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत.

**पात्रता :** विशिष्ट भौगोलिक क्षेत्रावर कार्यरत एकाच प्रकारच्या, औद्योगिक प्रवर्गातील किमान २० सूक्ष्म, लघु कार्यरत घटक.

### १. सुधारित योजनेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

i) सामायिक सुविधा केंद्राची प्रकल्प किंमत मर्यादा रु. २० कोटी इतकी आहे. ज्यामध्ये केंद्र शासनाचा सहभाग ७०% ते ९० टक्के इतका राहील. ज्या औद्योगिक समूहामध्ये ५०% सूक्ष्म, महिला, ग्रामीण किंवा अनुसूचित जाती/जमातीचे उद्योग घटक असतील अशा औद्योगिक समूहांना केंद्र शासनाचे ९०% अनुदान मंजूर करण्यात येते.

ii) पायाभूत सुविधांच्या विकासासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रु. १० कोटी असून ज्यामध्ये केंद्र शासनाचा सहभाग ६०% राहील.

iii) क्षमतावृद्धी कार्यक्रमासाठीची प्रकल्प किंमत मर्यादा रु. १० लाख इतकी आहे. दिनांक २७.०७.२०१६ रोजीच्या सदर योजनेच्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार केंद्र शासनामार्फत निदानोपयोगी अभ्यास अहवाल व क्षमतावृद्धी कार्यक्रमाच्या अंमलबजावळणीसाठी यापुढे केंद्र शासनाचे अनुदान देण्यात येणार नाही; परंतु प्रकल्पाचा सविस्तरल प्रकल्प अहवाल मंजूर झाल्यानंतर रु. १०.०० लाख रक्कम विशेष हेतू वाहन संस्थेचे सहभाग वर्गणी म्हणून मान्य करण्यात येईल.

सदर योजनेंतर्गत राज्यातील एकूण ५४ औद्योगिक समूह प्रकल्पांना प्राथमिक मंजुरी देण्यात आलेली असून त्यापैकी २२ औद्योगिक समूह प्रकल्पांना सामायिक सुविधा केंद्र उभारणी अंतर्गत अंतिम व ०८ औद्योगिक समूह प्रकल्पांना तत्त्वतः मंजुरी देण्यात आलेली आहे. अंतिम मंजुरी प्राप्त एकूण २२ प्रकल्पांपैकी १७ औद्योगिक समूह प्रकल्पांचे सामायिक सुविधा केंद्रे कार्यान्वित झालेली आहेत.

राज्यात सूक्ष्म व लघु उपक्रमांसाठी राबविण्यात येत असलेल्या औद्योगिक समूह विकास कार्यक्रमांमुळे 'सामूहिक विकास' संकल्पना रुजविण्यास यश मिळत असून छोट्या उद्योजकांचा आत्मविश्वास व एकोपा दृढ होत आहे. सुमारे २५,००० छोट्या उद्योजकांना सदर योजनेतून लाभ मिळून ते अधिक स्पर्धाक्षम होत असून त्यांची उत्पादने जागतिक दर्जाची होण्यासाठी मदत होत आहे, स्थानिक ठिकाणी उच्च दर्जाच्या सुविधा सुलभतेने उपलब्ध होत असल्याने अनेक रोजगार/स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत.




## राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध योजना, महिलांनी लाभ घेण्याची गरज

# महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी सरकार कटिबद्ध



**महिला उद्योजकता ही आर्थिक प्रगतीचा महत्त्वाचा स्रोत मानली गेली आहे. त्यामुळे त्यांना औद्योगिक वाढीच्या मुख्य प्रवाहात आणणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठीच राज्याने महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी खास 'महिला उद्योजकता धोरण' तयार केले असून, असे धोरण असणारे महाराष्ट्र देशातले पहिले राज्य आहे. केंद्राच्याही महिलांना उद्योगाच्या उभारणीसाठी आकर्षक योजना आहेत. एक महिला उद्योजक झाली तर ती अनेक महिलांना रोजगार देऊ शकते, हाच त्यामागचा विचार आहे. अधिकाधिक महिलांना उद्योगाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. अशा प्रमुख १० योजनांविषयी हा विशेष लेख. - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकता महत्त्वाचा स्रोत मानली गेली आहे. महिला उद्योजक समाजामध्ये व्यवस्थापन संघटन व व्यवसायाशी संबंधित बाबींमध्ये निरनिराळे आयाम प्रस्तुत करीत आहेत. तथापि, महिलांनी परिचालीत केलेल्या उपक्रमांची सांख्या एकूण उपक्रमांच्या प्रमाणात फारच कमी आहे. महिला उद्योजकतेला चालना व प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य मंत्रिमंडळाने १४ डिसेंबर २०१७ ला 'महिला उद्योजकांसाठी औद्योगिक धोरण' मंजूर केले. महिला उद्योजकांसाठी धोरण असणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या धोरणानुसार महिला उद्योजकाची व्याख्या 'महिला उद्योजकांचा एक गट ज्याने या प्रकल्पासाठी १००% अर्थसहाय्य दिले आहे आणि किमान ५०% महिला कर्मचारी सेवेत घेतले आहेत' अशी आहे. धोरणानुसार महिला उद्योजकांना प्रकल्पाच्या भांडवलाच्या गुंतवणुकीच्या १५% ते ३५% च्या प्रमाणात ५% पर्यंतच्या व्याजदराच्या दराने १५ लाख ते १ कोटी रुपयांपर्यंतची आर्थिक मदत तर ७-८ रुपये ऐवजी १-३ रुपये प्रति यूनिट दराने वीज दिली जाते. धोरणाअंतर्गत मॉल, कमर्शियल कॉम्प्लेक्स किंवा मार्केट यार्डमधील काही स्टॉल्स किंवा काही भाग केवळ महिला व्यावसायिकांसाठी राखीव ठेवला जातो. तसेच, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) क्षेत्रातील महिला उद्योजकांसाठी जमीन आरक्षित असते. या धोरणाअंतर्गत महिला उद्योगाच्या उभारणीसाठी पुढील प्रकार पाडण्यात आले आहेत -

**१. एकल मालकी घटक :** महिला उद्योजकांचे १०० टक्के भाग भांडवल

**२. भागीदारी घटक :** भागीदारी घटक ज्यामध्ये १०० टक्के भाग भांडवल

**३. सहकारी क्षेत्र :** सहकार कायद्याअंतर्गत ज्या सहकारी संस्थांमध्ये १०० टक्के महिला उद्योजकांचा समावेश असलेली संस्था

**४. खाजगी किंवा सार्वजनिक मर्यादित घटक :** ज्या घटकामध्ये महिला उद्योजकांचे किमान १०० टक्के भाग भांडवल असेल अशी कंपनी उद्योगांच्या उपरोक्त नमूद घटकांत किमान ५० टक्के महिला कामगार असलेल्या उपक्रमांना योजनेअंतर्गत प्रोत्साहनासाठी पात्र समजले जातात. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास (MSME) अधिनियम २००६ अंतर्गत उत्पादनासाठी उद्योग आधार धारण करणारे, सामूहिक प्रोत्साहन योजना २०१३ तील पात्र उपक्रम प्रस्तुत विशेष प्रोत्साहन योजनेसाठी पात्र ठरतात. योजनेअंतर्गत पात्र घटकांना सामूहिक प्रोत्साहन योजना २०१३ चे निकष व अटी लागू राहतील. सामूहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत अतिरिक्त सवलती, भांडवली अनुदान, वीज दर अनुदान व व्याजदर अनुदानास पात्र ठरतात.

### केंद्र सरकारच्या योजना

**१. अन्नपूर्णा योजनाः** या योजनेअंतर्गत अन्न आणि कॅटरिंग उद्योगातील महिला उद्योजकांना लघु उद्योग स्थापन करण्यासाठी कर्ज दिले जाते. उपकरणे व भांडी खरेदी करणे, ट्रक उभारणे इत्यादीसाठी भांडवलाची आवश्यकता म्हणून याचा लाभ घेता येतो. या योजनेअंतर्गत स्त्रिया पॅक खाद्यपदार्थ आणि स्नॅक्सची विक्री करू शकतात. कर्जाची मर्यादा रु. ५०,००० आहे.

**२. मुद्रा योजनाः** भारत सरकारचा हा उपक्रम आहे. याचा उद्देश व्यवसायिक कर्ज देऊन देशातील महिलांची स्थिती सुधारणे आणि त्यांचे समर्थन करणे जेणेकरून त्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आणि स्वावलंबी राहू

शकतील हा आहे. कर्जाची मंजुरी घेतल्यानंतर त्यांना मुद्रा कार्ड दिली जातात. जी कर्जाच्या १०% रक्कम काढण्याच्या मर्यादेसह क्रेडिट कार्ड प्रमाणे काम करतात. व्यवसायाच्या प्रकार, विस्ताराची पातळी आणि कर्जाच्या उद्दीष्टांनुसार विविध प्रकारच्या योजना आहेत. शासनाने या योजनेंतर्गत कर्जाची मर्यादा रु. १० लाख रुपये ठेवली आहे.

**३. प्रधान मंत्री रोजगार युवा योजना :** पीएमआरवाय (PMRY) म्हणूनही ओळखली जाणारी ही योजना महिला उद्योजकांसाठी सामाजिक आणि आर्थिक दोन्ही दृष्टीने एक उत्तम योजना आहे. या योजनेचे उद्दिष्ट महिला उद्योजकांच्या माध्यमातून कौशल्य-आधारित, स्वयंरोजगार निर्माण करणे आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी वापरल्या जाणाऱ्या स्मार्ट माइंड्सवर लक्ष केंद्रित करून त्यांना स्वावलंबी करणे हे आहे. या योजनेत शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागांचा समावेश आहे. ही योजना उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील सर्व प्रकारच्या उपक्रमांना लागू आहे. वयोमर्यादा ३५ वर्षे आणि व्यवसायासाठी कर्जाची मर्यादा रु. ३ लाख तर सेवा आणि उद्योगासाठी रु. ५ लाख.

**४. उद्योगिनी योजनाः** हा कार्यक्रम महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवून स्वावलंबी होण्यास प्रोत्साहित करतो. महिलांना आत्मविकास करण्यात मदत करतो. ही योजना नवोदित महिला उद्योजकांना कर्ज उपलब्ध करून देते. ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न प्रतिवर्ष रुपये ४०,००० पेक्षा कमी आहे केवळ त्यांच्यासाठी ही योजना हे वैध आहे. कर्जाची मर्यादा रु. १ लाख रुपये आहे.

**५. प्रधानमंत्र्यांचा रोजगारनिर्मिती कार्यक्रम (पीएमईजीपी)-** खादी व ग्रामोद्योग आयोग (केव्हीआयसी) ही राष्ट्रीय स्तरावरील नोडल एजन्सी म्हणून कार्यरत आहे. राज्य स्तरावर ही योजना राज्य केव्हीआयसी संचालनालय, राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळे (केव्हीआयबी), जिल्हा उद्योग केंद्रे (डीआयसी) आणि बँकांच्या माध्यमातून राबविली जाते. अशा परिस्थितीत केव्हीआयसी लाभार्थी/उद्योजकांना थेट त्यांच्या बँक खात्यात वितरणासाठी नियुक्त केलेल्या बँकांच्या माध्यमातून सरकारी अनुदान पाठवते. उत्पादन क्षेत्रातील मान्यताप्राप्त प्रकल्प/युनिटसाठी कमाल रु. २५ लाख आणि व्यवसाय/सेवा क्षेत्रासाठी रु.१० लाख आहे. महिलांसाठी शहरी क्षेत्रांमध्ये २५ % व ग्रामीण क्षेत्रांमध्ये ३५% अनुदान मिळते. एकूण प्रकल्प खर्चाची उर्वरित रक्कम बँकांकडून मुदत कर्ज आणि कार्यरत भांडवलाच्या स्वरूपात पुरविली जाते. १८ वर्षांपेक्षा जास्त वयाची आठवी पास असलेली कोणतीही व्यक्ती अर्ज करू शक. उत्पादन क्षेत्रात १० लाख रुपयांपेक्षा जास्त आणि व्यवसाय/सेवा क्षेत्रात ५ रु. लाख पेक्षा जास्त किंमतीच्या प्रकल्पांसाठी अनुदान मिळू शकते. पीएमईजीपी अंतर्गत केवळ नवीन प्रकल्प मंजुरीसाठी विचारात घेतले जातात. बचत गट ((बीपीएलच्या सदस्यांसह ज्यांनी त्यांचा इतर कोणत्याही योजनेंतर्गत लाभ घेतला नसेल तर)), संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था; उत्पादन सहकारी संस्था आणि धर्मादाय विश्वस्त संस्था देखील पात्र आहेत.

**६. मायक्रो आणि स्मॉल एंटरप्राइजेस (सीजीटी एसएमई) संबंधित स्कीम क्रेडिट गॅरंटी ट्रस्ट फंड-** सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि लघु उद्योग विकास बँक (एसआयडीबीआय) मंत्रालयाने संयुक्तपणे मायक्रो आणि स्मॉल एंटरप्राइजेजसाठी क्रेडिट गॅरंटी योजना लागू करण्यासाठी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट फॉर मायक्रो आणि स्मॉल एंटरप्राइजेज (सीजीटीएमएसई) नावाने एक ट्रस्ट स्थापन केला आहे. सीजीटीएमएसईच्या कॉर्पसचे योगदान भारत सरकार आणि सिडबीने दिले आहे. बँकेला असलेल्या कर्जाच्या ७५% रकमेची हमी ट्रस्ट फंडद्वारे दिली जाते.एमएसईसाठी रू १०० लाखांच्या मर्यादेपर्यंतचे कर्ज उपलब्ध आहे. विद्यमान व नवीन उद्योग या योजनेत पात्र आहेत. पात्रता निकष पूर्ण करणारे उमेदवार बँका/वित्तीय संस्थांकडे जाऊ शकतात आणि या योजनेंतर्गत पात्र क्षेत्रीय ग्रामीण बँका निवडू शकतात. www.dcmsme.gov.in/schemes/sccrguarn.htm

**७. व्याज अनुदान पात्रता प्रमाणपत्र (आयएसईसी) (ISCE) -** खादी संस्थांनी हाती घेतलेल्या खादी कार्यक्रमासाठी व्याज अनुदान पात्रता प्रमाणपत्र (आयएसईसी) योजना ही एक महत्त्वाची यंत्रणा आहे. वर्षाकाठी ४% सवलतीच्या दराने पत संस्थांच्या आवश्यकतेनुसार कर्ज उपलब्ध करून दिले जाते. वास्तविक कर्ज दर आणि रेट ऑफ इंटरेस्ट यातील फरक केंद्रीय सरकारकडून कर्ज देणा-या बँकांना केव्हीआयसीमार्फत दिला जातो. केव्हीसी/राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळे (केव्हीआयबी) मध्ये नोंदणीकृत संस्था आयएसईसी योजनेंतर्गत अर्थसहाय्य मिळवू शकतात, ही योजना केवळ खादी व पॉलिव्हस्त्र् क्षेत्रालाच सहाय्य करते. खादी संस्था केव्हीआयसीने जारी केलेल्या आयएसईसी प्रमाणपत्रासह कार्यकारी भांडवलासाठी फायनान्स बँकेत अर्ज करू शकतात.

**८. झेडईडी प्रमाणपत्र योजनेतील एमएसएमईंना आर्थिक सहाय्य-** योजनेच्या उद्दीष्टांमध्ये उत्पादन प्रक्रियेत शून्य दोष आणि शून्य परिणाम पद्धती समाविष्ट करणे, निरंतर सुधार सुनिश्चित करणे आणि मेक इन इंडिया उपक्रमास पाठिंबा देणे हा आहे. झेडईडी प्रमाणपत्र योजना ही झेडईडी उत्पादनाच्या विषयी एमएसएमईमध्ये योग्य जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांना झेडईडीसाठी त्यांच्या एंटरप्राइझचे मूल्यांकन करण्यासाठी प्रोत्साहित करते.

**९. नावीन्य, ग्रामीण उद्योग आणि उद्योजकता योजना (ASPIRE)-** नवीन रोजगार निर्माण करणे आणि बेरोजगारी कमी करणे, भारतातील उद्योजकता संस्कृतीला चालना देणे, जिल्हा पातळीवर ग्रासरूट आर्थिक विकासास चालना देणे, सामाजिक गरजा पूर्ण करण्यासाठी नावीन्यपूर्ण व्यवसाय आणि नावीन्यास प्रोत्साहन देण्यासाठी एमएसएमई क्षेत्राच्या स्पर्धात्मकतेचे मजबुतीकरण करणे ही उद्दिष्टे घेऊन नावीन्य, ग्रमीण उद्योग व उद्योजकता योजना म्हणजेच अस्पायर सुरू करण्यात आली आहे.

**१० विपणन सहाय्य योजना-** परदेशात प्रदर्शन आयोजित करणे आणि आंतरराष्ट्रीय प्रदर्शन/व्यापार जत्रां मध्ये सहभाग, इतर संस्था/उद्योग संघटना/संस्था आयोजित केलेल्या प्रदर्शनांचे सह-प्रायोजित करणे, खरेदीदार-विक्रेत्यांची बैठक, गहन मोहीम आणि विपणन जाहिरात क्रियाकलापांचे आयोजन करण्यासाठी विपणन सहाय्य करते. याअंतर्गत आंतरराष्ट्रीय प्रदर्शन/व्यापार जत्रेत सहभागी होण्यासाठी जास्तीत जास्त निव्वळ अर्थसंकल्पीय आधार साधारणपणे रु. प्रति इव्हेंट ३० लाख (लॅटिन अमेरिकन देशांसाठी ४० लाख रुपये) अर्थसहाय्य मिळते. देशांतर्गत प्रदर्शन/व्यापार मेळाव्यासाठी जास्तीत जास्त रु. ४५ लाख रू मिळतात. एमएसएमई, उद्योग संघटना आणि एमएसएमई क्षेत्राशी संबंधित इतर संस्था अर्ज करण्यास पात्र आहेत. अर्ज/प्रस्ताव राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळाच्या जवळच्या कार्यालयाच्या शाखा व्यवस्थापकाकडे, अर्जाच्या समर्थनार्थ संपूर्ण तपशील आणि औचित्यासह सादर करावेत. ■■



बाजारपेठेत विविध प्रकारची उत्पादने

# रबर उद्योगातील संधी

**भारतातील रबर उत्पादनाची मागणी सातत्याने वाढत आहे. वाढती लोकसंख्या, अर्थव्यवस्थेतील प्रगती, जीवन स्तरावरील सुधारणा यामुळे रबर उत्पादनाची गरज वाढत आहे. टायर आणि नलिका हे रबर उद्योगातील प्रमुख उत्पादन क्षेत्र आहे. वाहन उत्पादनात वाढ होत असल्याने या उत्पादनाचीही मागणी वाढती आहे. रबर निर्यात भारतासाठी आज महत्त्वाची संधी समजली जाते. तसेच आधुनिक तंत्रज्ञानात रबर उद्योगाची ही भूमिका महत्त्वाची दिसून येते.**

**- सुदाम थोटे**

भारतातील रबर उद्योगाला महत्त्वाची भूमिका आहे. हा उद्योग अर्थव्यवस्थेत योगदान देतो आणि रोजगाराच्या संधी निर्माण करतो. रबराच्या कच्चा मालाचे उत्पादन आणि प्रक्रिया करून विविध प्रकारची उत्पादने तयार केली जातात. यात टायर, नलिका, रबर पट्ट्या, सील आणि इतर अनेक वस्तूंचा समावेश होतो.

**कच्चा माल :** भारतात रबराचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. केरळ, तामिळनाडू, कर्नाटक आणि उत्तर पूर्वेकडील राज्ये प्रमुख रबर उत्पादक आहेत. या राज्यांमध्ये रबराच्या झाडांची लागवड केली जाते आणि कच्चा रबर उत्पादित केला जातो.

कच्चा रबर आयात देखील केला जातो. भारताला आवश्यकतेनुसार कच्चा रबर आयात करावा लागतो. कच्चा रबर पुरवठा साखळी सुधारण्यासाठी अनेक आव्हाने आहेत. यात कच्चा माल उपलब्धता, किंमत स्थिरता आणि वाहतूक खर्च यांचा समावेश होतो. या आव्हानांवर मात करणे उद्योगासाठी महत्त्वाचे आहे.

**उत्पादन प्रक्रिया :** रबराचे उत्पादन जटिल प्रक्रियेतून होते. कच्चा रबर प्रथम प्रक्रिया केला जातो, ज्यात त्यातून अशुद्धता काढून टाकली जातात. त्यानंतर, रबराला आवश्यक गुणधर्म देण्यासाठी त्यात रसायने आणि इतर पदार्थ मिसळले जातात.

रबर उत्पादनाच्या मुख्य पद्धती म्हणजे थर्मोप्लास्टिक आणि थर्मोसेटिंग. थर्मोप्लास्टिक रबराला उष्णता दिली असता, त्याचा आकार बदलता येतो, तर थर्मोसेटिंग रबर एकदा सेट झाल्यावर त्याचा आकार बदलता येत नाही.

आधुनिक तंत्रज्ञान रबर उद्योगात महत्त्वाची भूमिका बजावते. कॉम्प्युटर-एडेड डिझाइन (CAD) आणि कॉम्प्युटर-एडेड मॅन्युफॅक्चरिंग (CAM) या तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन प्रक्रिया अधिक प्रभावी आणि कार्यक्षम बनवली जाते.

**बाजार दृष्टिकोन :** भारतातील रबर उत्पादनांची मागणी सातत्याने वाढत आहे. वाढती लोकसंख्या, अर्थव्यवस्थेतील प्रगती आणि जीवनस्तरातील सुधारणा यामुळे रबर उत्पादनांची गरज वाढत आहे. टायर आणि नलिका हे रबर उद्योगातील प्रमुख उत्पादन क्षेत्र आहेत. वाहन उत्पादनात वाढ होत असल्याने या उत्पादनांची मागणीही वाढत आहे.

रबर निर्यात भारतासाठी महत्त्वाची संधी आहे. देशात उत्पादित होणाऱ्या रबर उत्पादनांचा काही भाग निर्यात केला जातो. निर्यात बाजाराचा विस्तार करण्यासाठी गुणवत्ता आणि किंमत स्पर्धात्मकता महत्त्वाची आहे.

**भारतातील रबर उद्योगाची सद्यःस्थिती : भारत एक प्रमुख रबर उत्पादक देश आहे :** केरळ, तामिळनाडू, कर्नाटक आणि उत्तर-पूर्वेकडील राज्ये हे प्रमुख रबर उत्पादक राज्ये आहेत.

**निर्यात :** भारतात उत्पादित होणारे रबर उत्पादने जगभरात निर्यात केले जातात.

**आव्हाने :** कच्चा माल उपलब्धता, किंमत स्थिरता, वाढती स्पर्धा आणि पर्यावरणीय नियमन ही उद्योगासाठी प्रमुख आव्हाने आहेत.

**सद्यःस्थितीचे प्रमुख मुद्दे : वाढती मागणी :** वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि मध्यमवर्गीय लोकसंख्येतील वाढ यामुळे रबर उत्पादनांची मागणी वाढत आहे. विशेषतः ऑटोमोबाइल उद्योगातील वाढ या मागणीला चालना देत आहे.

**नवीन तंत्रज्ञान :** उद्योगात नवीन तंत्रज्ञानचा वापर वाढत आहे. कॉम्प्युटर-एडेड डिझाइन (CAD) आणि कॉम्प्युटर-एडेड मॅन्युफॅक्चरिंग (CAM) या तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन प्रक्रिया अधिक प्रभावी आणि कार्यक्षम बनवली जाते.

**पर्यावरणीय चिंता :** पर्यावरणीय चिंता वाढल्यामुळे रबर उद्योगाला पर्यावरणपूरक उत्पादने विकसित करण्याच्या दिशेने काम करावे लागत आहे. पुनर्नवीकरणयोग्य रबर आणि जैवविघटनशील रबर यासारख्या नवीन उत्पादनांवर संशोधन सुरू आहे.

**स्पर्धा :** जागतिक स्तरावर रबर उद्योगात तीव्र स्पर्धा आहे. चीन, मलेशिया आणि थायलंड सारखे देश मोठ्या प्रमाणात रबर उत्पादन करतात.

**कच्चा माल :** कच्चा रबर उपलब्धता आणि किंमत स्थिरता ही उद्योगासाठी एक प्रमुख चिंता आहे. कच्चा माल किंमत वाढल्यामुळे उत्पादन खर्च वाढतो आणि त्याचा परिणाम अंतिम उत्पादनाच्या किमतीवर होतो.

**भविष्यातील संभाव्यता :** वाढती मागणी : भविष्यातही रबर उत्पादनांची मागणी वाढत राहील, विशेषतः ऑटोमोबाइल, बांधकाम आणि औद्योगिक क्षेत्रात.

नवीन उत्पादने : पर्यावरणपूरक आणि टिकाऊ रबर उत्पादनांवरील भर वाढत आहे.

तंत्रज्ञानाचा वापर : नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन प्रक्रिया अधिक प्रभावी आणि कार्यक्षम बनवली जाईल.

स्पर्धा : जागतिक स्तरावर स्पर्धा तीव्र होत राहील.

**रबर उद्योगातील आव्हाने आणि उपाय :**

रबर उद्योगाला अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. कच्चा माल, किंमत स्थिरता, कच्चा माल उपलब्धता आणि वाढती स्पर्धा ही प्रमुख आव्हाने आहेत. याशिवाय, पर्यावरणीय नियमन आणि श्रम कायदे देखील उद्योगाला प्रभावित करतात.

कच्चा माल किंमत स्थिरतेसाठी दीर्घकालीन करार, हेजिंग (हेजिंग ही अशी गुंतवणूक आहे, जी इतर गुंतवणुकीतील तोटा कमी करण्यासाठी निवडली जाते कारण त्याची किंमत उलट दिशेने जाते. ही रणनीती एक प्रकारची विमा पॉलिसी म्हणून काम करते, जी इतर गुंतवणुकीतील कोणत्याही मोठ्या तोट्याची भरपाई करते.) आणि वायदा बाजारांचा वापर करणे आवश्यक आहे. कच्चा माल उपलब्धता वाढवण्यासाठी स्थानिक स्तरावर लागवड प्रोत्साहन देणे आणि आयात विविधीकरण करणे महत्त्वाचे आहे.

स्पर्धेचा सामना करण्यासाठी उत्पादन क्षमता वाढवणे, नवीन उत्पादने विकसित करणे आणि ब्रँडिंगवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. पर्यावरणीय नियमन आणि श्रम कायदे यांचे पालन करून उद्योगाला सतत अनुपालन सुनिश्चित करावे लागते.

**रबर उद्योगातील उद्योगसंधी :** रबर उद्योग हा भारतातील एक महत्त्वपूर्ण उद्योग असून यात अनेक उद्योगसंधी उपलब्ध आहेत. वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि मध्यमवर्गीय लोकसंख्येतील वाढ यामुळे रबर उत्पादनांची मागणी वाढत आहे. या वाढत्या मागणीमुळे या उद्योगात नवीन उद्योजकांसाठी अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**रबर उद्योगातल्या उद्योगसंधी :** नवीन उत्पादने : पर्यावरणपूरक आणि टिकाऊ रबर उत्पादने विकसित करण्याच्या संधी आहेत. जसे की, जैवविघटनशील रबर, पुनर्नवीकरणयोग्य रबर, इत्यादी.

तंत्रज्ञानाचा वापर : नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन प्रक्रिया अधिक प्रभावी आणि कार्यक्षम बनवण्याच्या संधी आहेत.

विशिष्ट उत्पादने : विशिष्ट क्षेत्रांसाठी रबर उत्पादने विकसित करण्याच्या संधी आहेत. जसे की, वैद्यकीय क्षेत्र, एरोस्पेस क्षेत्र, इत्यादी.

**रिसायकलिंग :** रबर उत्पादनांचे पुनर्नवीकरण करून त्याचा पुनर्वापर करण्याच्या संधी आहेत.

**रबर उत्पादनांचे वितरण :** रबर उत्पादनांचे वितरण करण्यासाठी नवीन वितरण चॅनेल तयार करण्याच्या संधी आहेत.

रबर आधारित सेवा : रबर उत्पादनांची देखभाल आणि दुरुस्ती यासारख्या सेवांसाठी संधी आहेत.

**रबर उद्योगातल्या चालू असलेल्या उद्योगांचे उदाहरण :** टायर उद्योग : हा रबर उद्योगातील सर्वात मोठा भाग आहे. दोन आणि चार चाकी वाहनांसाठी टायर, ट्रक आणि बससाठी टायर, औद्योगिक वाहनांसाठी टायर इत्यादी विविध प्रकारचे टायर या उद्योगात तयार केले जातात.

**नलिका आणि पाइप उद्योग :** या उद्योगात विविध आकार आणि मजबुतीच्या नलिका आणि पाइप तयार केले जातात. याचा उपयोग पाणीपुरवठा, सिंचन, औद्योगिक प्रक्रिया इत्यादी क्षेत्रात केला जातो.

रबर उत्पादनेः यात रबर पट्टे, रबर सील, रबर गॅस्केट्स, रबर चटई, रबर हातमोजे इत्यादीचा समावेश होतो. या उत्पादनांचा उपयोग ऑटोमोबाइल, बांधकाम, औद्योगिक आणि घरेलू क्षेत्रात केला जातो.

रबराची खेळणीः बालकांसाठी विविध प्रकारचे रबरचे खेळणी तयार केले जातात.

**रबरचे औद्योगिक उत्पादनः** रबरचे उत्पादन औद्योगिक प्रक्रियेत विविध प्रकारे वापरले जाते. जसे की, वाहन उद्योग, विमान उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स उद्योग इत्यादी.

रबरचे वैद्यकीय उत्पादनः रबरचे उत्पादन वैद्यकीय क्षेत्रातही वापरले जाते. जसे की, सर्जिकल ग्लोव्हज, मेडिकल ट्यूबिंग इत्यादी.

**यशोगाथा :** भारतातील रबर उद्योगात अनेक कंपन्यांनी आपल्या उद्यमशीलता आणि नवकल्पनात्मक दृष्टिकोनातून यश मिळवले आहे. या कंपन्यांनी उच्च गुणवत्तेचे उत्पादन, ग्राहक समाधान आणि सतत विकासावर लक्ष केंद्रित केले आहे. उदाहरणार्थ, MRF आणि Apolo टायर या कंपन्यांनी भारतीय बाजारात मजबूत ब्रँड इमेज निर्माण केली आहे. त्यांनी विविध प्रकारच्या वाहनांसाठी उच्च प्रदर्शन टायर विकसित केले आहेत आणि देशभरात व्यापक वितरण नेटवर्क उभारले आहे. इतर कंपन्यांनी रबरचे पुनर्नवीकरण आणि रीसायकलिंग क्षेत्रात यशस्वी प्रकल्प राबवले आहेत. या कंपन्यांनी पर्यावरणपूरक उत्पादने विकसित केली आहेत आणि संसाधनांचे प्रभावी उपयोग केला आहे. या यशोगाथांमधून आपण शिकू शकतो की नवकल्पना, गुणवत्ता, ग्राहक केंद्रित दृष्टिकोन आणि सतत विकास हे यशाचे प्रमुख घटक आहेत.

**रबर उद्योगात यशस्वी होण्यासाठी :** नवीन कल्पना : नवीन आणि नवीन कल्पनांचा वापर करून आपले उत्पादन वेगळे करणे आवश्यक आहे.

गुणवत्ता : उच्च गुणवत्तेची उत्पादने तयार करणे आवश्यक आहे.

बाजारपेठेचे विश्लेषण : बाजारपेठेचे योग्य विश्लेषण करून उत्पादनाची मागणी ओळखणे आवश्यक आहे.

तंत्रज्ञान : नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन खर्च कमी करणे आवश्यक आहे.

पर्यावरण : पर्यावरणपूरक उत्पादने तयार करण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**रबर उद्योग सुरू करण्यापूर्वी विचारात घ्यावयाचे मुद्दे :** गुंतवणूक : या उद्योगात गुंतवणूक करण्यासाठी किती पैसे लागतील याचा विचार करावा.

कच्चा माल : कच्चा माल कुठून मिळेल आणि त्याची किंमत किती असेल याचा विचार करावा.

बाजारपेठेचे विश्लेषण : बाजारपेठेत स्पर्धा किती आहे याचा विचार करावा.

नियमन : सरकारचे नियमन आणि कायदे यांची माहिती घ्यावी.

कौशल्य : या उद्योगात काम करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या कौशल्यांची गरज आहे याचा विचार करावा.

*(या लेखाचे लेखक विभागीय अधिकारी, एमसीईडी, पुणे म्हणून कार्यरत असून त्यांचा भ्रमणध्वनी ९४०३०७८७५३ आहे.)* ■■

## संस्था परिचय : इंडियन रबर इन्स्टिट्यूट
## जाणून घ्या रबर उद्योगाबाबत सर्वकाही

# संधींतही लवचिकता



**रबरापासून टायर, ट्यूब, बेअरिंग, पाईप, फूटवेअर, कन्वेयर बेल्ट, खेळण्या अशा कितीतरी वस्तू तयार होतात. या वस्तूंना बाजारात सदैव मागणी असते. भारतात दरडोई ८०० ग्रॅम, तर अमेरिकेत १२ ते १४ किलो रबराचा वापर होतो. ही गरज पूर्ण करण्यासाठी उद्योगांना मोठी संधी आहे. रबराप्रमाणेच लवचिक असणारा हा उद्योग प्रत्येकाची स्वप्नं पूर्ण करणारा आहे. - प्रतिनिधी**

नैसर्गिक रबरनिर्मिती रबरवृक्षापासून निघालेल्या चिकापासून होते. ७९ कुलांतील सुमारे ८९५ जातीतील वनस्पतीच्या चिकात नैसर्गिक रबर आढळते. यापैकी काही १०-१२ वनस्पती या रबर उत्पादनासाठी उपयुक्त आहेत. वेगवेगळ्या देशांत तेथील हवामानारूप या वनस्पतीची लागवड केली जाते. थायलंड, इंडोनेशिया, भारत, चीन, मलेशिया, व्हिएतनाम, श्रीलंका या देशांत प्रामुख्याने रबराचे उत्पादन होते. भारतात त्रावणकोर, कोचीन, म्हैसूर, कुर्ग, सलेम या राज्यांत रबराची लागवड केली जाते. लागवडीनंतरच्या पाच वर्षानंतर या झाडापासून रबर मिळण्यास सुरूवात होते. पुढे ते झाड सुमारे ४० वर्षे उत्पादन देते. एका एकरात १५० झाडांची लागवड होते. एका झाडापासून दरवर्षी ५ ते ६ पौंड रबर उत्पादन मिळते. या झाडापासून मिळालेल्या चिकावर प्रक्रिया करून नैसर्गिक रबर मिळते. या कच्च्या रबरावर गरजेप्रमाणे प्रक्रिया करून हे रबर उत्पादनाच्या निर्मितीसाठी उपयोगात आणले जाते. भारतात रबर उद्योगाची सुरुवात ही १९२० मध्ये झाली. रबराचे जागतिक उत्पादन ६-८ दशलक्ष टन दरम्यान होते. यामध्ये सातत्याने चढ-उतार होत असत, तर भारतात वार्षिक उत्पादन ६ ते ७ लाख टन होते. यातील ९० टक्के उत्पादन केरळ राज्यात होते. या उत्पादनात आरएसएस (रिजिड स्मोक्ड शीट्स) याचा वाटा ७२ टक्के तर आयातीत ४५ टक्के ब्लॉक रबराचा उत्पादनातील वाटा १० तर आयातीत ४० टक्के आहे. देशातील उत्पादन होणाऱ्या रबराच्या उत्पादनापैकी ५२ टक्के रबर टायर निर्मिती उद्योगात वापरले जाते तर भारतातून टायरच्या माध्यमातून सुमारे १२०० ते १३०० कोटींची निर्यात होते. भारतात कोट्टायम, कोची, कोझिकोड, कन्नूर या केरळ राज्यातील मोठ्या बाजारपेठा आहेत.

भारतीय रबर बाजारपेठेवर पावसाळ्यात कमी होणारे उत्पादन, ऑटोमोबाइल क्षेत्रातील तेजी-मंदी, आयात रबराचा दर्जा, सरकारी धोरण, किमतीत होणारे चढ-उतार याचा परिणाम होतो. भारतीय अर्थव्यवस्थेत या रबर उद्योगाची उलाढाल ही २०० बिलियन एवढी आहे. एका पाहणीनुसार भारतात अंदाजे ६००० रबर उत्पादन कारखाने असून यामधून सुमारे ३५०० रबर उत्पादने तयार होतात. यामध्ये नैसर्गिक रबर तसेच पुनर्वापर रबराचा समावेश आहे.

कार्बन ब्लॅक, सिंथेटिक रबर, फॅटी ॲसिड, रबर केमिकल, रेयॉन यापासून लॅटेक्स उत्पादने, ऑटो टायर्स, ट्यूब, बेअरिंग, होजेस पाईप, ऑटोमोबाइल पार्ट, केबल, वायर व तत्सम उत्पादनासाठी रबराचा उपयोग होतो. ही उत्पादने फक्त भारतीय बाजारपेठेतच नव्हे तर युनायटेड अरब अमिरात, फ्रान्स, इटाली, अमेरिका, कॅनडा, सौदी अरेबिया, आफ्रिका, बांग्लादेशसह इतर अनेक देशांत निर्यात होतात. रबर इंडस्ट्री अहवालानुसार आंतरराष्ट्रीय पातळीवर २०.८ मिलियन टन रबराचा विविध उत्पादने तयार करण्यासाठी उपयोग होतो (२००९ चा अहवाल).

भारतीय रबर उद्योगाच्या दृष्टीने चांगली बाब म्हणजे रबर झाडाची लागवड, त्यामुळे कच्च्या मालाची अखंड उपलब्धता, कुशल-अकुशल मनुष्यबळाची उपलब्धता, तांत्रिक संस्थांकडून तंत्रज्ञान व प्रशिक्षणाची सुविधा, दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या स्थानिक बाजारपेठा, ऑटोमोबाइल उद्योगाची या देशात होत असलेली भरभराट, आर्थिक सुधारणा (रिफॉर्म), सुधारणारे जीवनमान यामुळे भारतीय रबर उद्योगाचा विकास दर ८ टक्क्यांनी वाढला आहे. या वाढीला वाहनांचे टायर्स, ट्यूब, बेल्ट व बेल्टिंग, लॅटेक्सची उत्पादने, कन्व्हेयर बेल्ट, रबर कॅनव्हास, फूटवेअर, मशीनरी व टेस्टिंग इक्विपमेंट, फार्मास्युटिकल्स उत्पादने, होजेस, कॉटस, ॲप्रन, खेळाच्या वस्तू, रबर शीट्स या क्षेत्राच्या उत्पादनांना आलेल्या मागणीमुळे हा विकास दर गाठणे शक्य झाले आहे.

जगात भारत रबर उत्पादनामध्ये तिसरा, नैसर्गिक रबर व्यापारात चौथा तर नैसर्गिक रबर व सिंथेटिक रबर वापरात जगात पाचवा आहे. जगात भारत व चीन हे दोनच देश असे आहेत की जे नैसर्गिक रबर उत्पादनात स्वयंपूर्ण आहेत. सुधारलेल्या रबर वापराबाबत भारताचा क्रमांक एक लागतो! भारतात दरडोई फक्त ८०० ग्रॅम रबराचा उपयोग होतो हेच प्रमाण जपान, अमेरिका आणि युरोपीय राष्ट्रांमध्ये १२ ते १४ किलोग्रॅम एवढे आहे. यावरून या देशात रबर उद्योगाला असलेला वाव व नव उद्योजकांसाठी उपलब्ध असलेल्या संधींची आपल्याला कल्पना येईल. भारतीय रबर उद्योगाचे दोन विभाग करता येतील एक टायर, ट्यूब निर्मिती व दुसरा टायर-ट्यूब वगळून ज्यामध्ये छोटे, मध्यम लघु उद्योग मोडतात. ज्यामध्ये औद्योगिक क्षेत्राला लागणारी रबरी उत्पादने तयार होतात. यामध्ये ५० टक्के रबराचा उपयोग होतो (एकूण उत्पादनाच्या). भारताबरोबर दक्षिण-पूर्व आशिया ज्यामध्ये थायलंड, इंडोनेशिया, मलेशिया, श्रीलंका या देशांत नैसर्गिक रबर उत्पादनामध्ये वाढ होत आहे.

प्रदूषण ही एक रबर उद्योगातील डोकेदुखी आहे; परंतु भारतीय रबर संशोधन संस्था, कोट्टायमचे उपसंचालक यांच्या अहवालाप्रमाणे भारतीय रबर उद्योग स्वच्छ विकास पद्धती (क्लिन डेव्हलपमेंट मेकॅनिझम (सीडीएम) प्रमाणे एक क्रमांक इंडस्ट्री असल्याचे अहवालात नोंदवले आहे. यामुळे कार्बन फंडच्या बाबतीत १० टक्के वाटा सीडीएम मार्केटमध्ये या देशाला मिळवून देण्याचे लक्ष्य साध्य केल्यास बराच आर्थिक फायदा होऊ शकेल.

रबराचा शोध हा मानवी जिज्ञासेतून लागला. अमेरिकेतील हैती बेटावरील स्थानिक इंडियन लोक विशिष्ट झाडाच्या चिकापासून (डिंक) तयार केलेल्या चेंडूचा वापर करीत असल्याचे आढळते. हे चेंडू जमिनीवर आपटल्यावर आश्चर्यकारक रीतीने तो हळुवारपणे उसळी घेऊन वर येत असे. त्याच्या या गुणधर्मामुळे तेथील माणसांची जिज्ञासा जागृत झाली व त्यांनी परिसरातील वेगवेगळ्या झाडांचा चीक काढून त्यावर प्रयोग सुरू केले. हा चीक जलरोधक व वाळल्यावर उष्णता दिल्यावर घट्ट होत असल्यामुळे त्यापासून पादत्राणांसारख्या वस्तू निर्मितीकडे माणूस वळला. हळूहळू या रबराने सिद्ध केलेली उपयुक्तता त्याच्या विकासाला कारणीभूत ठरली. जस जसे रबराचे नवनवीन उपयोग मानवाला माहीत होत गेले तसतसे रबर देशोदेशी आयात होऊ लागले. या झाडाच्या चिकाची उपयोगिता, गुणवत्ता, त्याचा उपयोग यावरून त्याला सन १७७० मध्ये रबर हे नाव पडले. या चिकापासून वस्त्र बनविण्याच्या प्रयोगाला सुरुवात झाली. त्यादृष्टीने विविध प्रकारची यंत्रे, त्यामध्ये मिसळण्याची संयुगे यावर बरेच प्रयोग झाले. या प्रयोगाला यश लाभले ते चार्लस गुडइयर यांचे. त्यांनी ४-५ वर्षे अविश्रांत मेहनत करून रबरामध्ये गंधक मिसळल्यास व तापवल्यास ते अधिक टिकाऊ होते याचा शोध लागला अन् रबरी वस्तू उत्पादनाच्या उद्योगाचा पाया रोवला गेला. लाकडासारखा कठीण पदार्थ, घटवालेच्या पेट्या, फाऊंटन पेन, दातांच्या कवळ्या, धूम्रपानाचे पाईप, तारायंत्रात दूरध्वनी या उत्पादनात उपयोग होऊ लागला. पुढे घोडा गाड्यांच्या रबरी धावा, पुढे या रबराच्या पोकळ दांड्यामध्ये हवा भरण्याची कल्पना १८५८ मध्ये जॉन बाईड डनलॉप यांना सुचली. १८९५ मध्ये मोटार गाड्यांच्या रबरी पोकळ धावा, १९१० ला विज्ञानाच्या चाकांना पोकळ धावा असा उपयोग रबराचा सुरू झाला. रबराने आपली उपयुक्तता सिद्ध केल्यामुळे अनेक लाकडी, लोखंडी, प्लास्टिक वस्तूला पर्याय देण्याचे काम या रबराने केले. आज वेगवेगळ्या क्षेत्रांत हजारो वस्तू या रबरापासून तयार होतात. मग त्या मानवाच्या जीवन व्यवहारात प्रत्येक बाबीमध्ये रबराची उपस्थिती ही आवर्जून असते. बालपणात वेणीला रबर, शाळेत खोड रबर यापासून स्वयंपाकघर असो वा बेडरुम, कार्यालय असो वा उद्योग सर्व ठिकाणी रबराची उपस्थिती असतेच असते.

**रबर उद्योगातील संधी :** या उत्पादनाचा विविध क्षेत्रांत होणारा उपयोग, त्याची उपयुक्तता, गुणधर्म याचा विचार केल्यास या उद्योगात प्रचंड उद्योग संधी आहेत. रबर उद्योग म्हटले की टायर, ट्यूब तयार करणे एवढ्यापुरता हा उद्योग मर्यादित नाही. औद्योगिक क्षेत्रात, घरगुती वापरात, लघुउद्योग, विविध पट्टे, नळ्या, ट्रॉलीची चाके, रुळ, अस्तरे, पायपुसणी, सच्छिद्र रबर, रबर विलेपीन कापड, रेनकोट, धातूच्या धारांना वेस्टन, खोड रबर, धागे, चेंडू, खेळणी, व्ही पट्टे, शेतीमध्ये पाईप, ड्रीप, छापखान्याचे, प्रिंटरचे रुल, फुगे, भरीव धावा, टायर रिट्रेडिंग, मशीनरीमध्ये इंधन पाईप, पादत्राणे, मोजे, रबरी बूट, वॉशर, मॅट असे अगणित उपयोग रबराचे आहेत. साधा विचार केल्यास घरातील पलंग, खुर्च्या, टेबल याच्या पायाला आधार देणारे बूच हे रबराचे असतात. अशा या रबराची उपयोगिता बघितल्यास व यावर विचारमंथन केल्यास अनेक वस्तू आपल्या डोळ्यासमोर येतात. आपल्याकडील टेपरेकॉर्डर, रेडिओ यामध्ये असणारे रबरी बेल्ट हेही तेवढेच महत्त्वाचे असतात. असा बहुपयोगी रबराच्या बाबत कच्च्या मालाची उपलब्धता पाहून तरुणांनी उद्योग व्यवसाय सुरू करण्याचा विचार करायला काही हरकत नाही.

भारतात रबर जरी केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, अंदमान, त्रिपुरा या राज्यांत बहुसंख्येने उत्पादित होत असले तरी या राज्यांत या रबराचे वेगवेगळ्या क्षेत्रांत होणारे उपयोग, त्याला असणारी मागणी महत्त्वाचे म्हणजे या राज्यांत ऑटोमोबाइल उद्योगाचे असलेले प्राबल्य पाहता भरपूर संधी आहेत. या संधीचा लाभ घेण्याच्या दृष्टीने रबरसंबंधी तांत्रिक माहिती भारतीय रबर संस्था (इंडियन रबर इन्स्टिट्यूट) या राज्यातील शाखेकडून उपलब्ध होऊ शकेल. रबर उद्योगासंबंधी तसेच या उद्योगासाठी असलेल्या योजना, सुविधा, संधी याविषयी वरील संस्थेचे मुख्यालय अथवा या राज्यातील कार्यालयाकडे संपर्क साधावा. त्यांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत.

H.O. : Indian Rubber Institute, 7, Waterloo Street, Kolkata-700 078. Tel. (033) 22844413, 22430218, 6534-3103.

Public Information Officer, Indian Rubber Manufacturer Research Association, Plot No.254/1B, Road No.162, Wagale Indl. Estate, Thane (West). Tel.No. (022) 25811348, 25823910, 25803753.

## संस्था परिचय : सीजीसीआरआय

# काचेच्या विश्वात चमकदार करिअर, उद्योजकतेला वाव



**काच ही दैनंदिन वापरातील अत्यावश्यक वस्तू. ती वेगवेगळ्या रूपात आपल्याला दिसते. कधी टेबलावर, कधी आरसा, कधी कारच्या खिडक्या, कधी मोबाइलची स्क्रीन, तर कधी आलिशान इमारतीवरील काच प्रत्येकाला आकर्षित करते. मात्र प्रत्यक्षात काच तसे दुर्लक्षित राहिलेले क्षेत्र आहे. या क्षेत्रात उच्च शिक्षण घेऊन करिअरच्या चांगल्या संधी आहेत. काचेच्या विश्वात उद्योजकतेलाही वाव आहे. कोलकाता येथील सीजीसीआरआय ही संस्था काचेबाबत संशोधने व विकासाच्या क्षेत्रात कार्यरत आहे. जाणून घेऊया त्याबाबत. - प्रतिनिधी**

काच ही वस्तू खरोखरच विलक्षण आहे. वाळूसारख्या अपारदर्शक घटकापासून चकचकीत आणि पारदर्शक काच कशी काय बनते हे एक आश्चर्यच आहे! प्रामुख्याने सिलिकॉन डायऑक्साइडने बनलेली वाळू तप्त झाल्यावर सुमारे १७१० अंश सेल्सियस तापमानाला वितळते. या कामासाठी विजेची भट्टी वापरतात. त्या रसाला झपाट्यानं गार केल्यावर काच तयार होते. काचेमध्ये ६० ते ८० टक्के सिलिकेचे प्रमाण असते. तथापि त्यात सोडा आणि लाईम (कॅल्शियम ऑक्साइड) असे दोन्ही घटक असतात. काचेतून प्रकाश किरण गेल्यावर त्याचं वक्रीभवन होतं. काचेवर प्रकाश किरण पडल्यावर त्याचं परावर्तन पण होतं. काचेचे अनेक उपयुक्त गुणधर्म आहेत. खिडकीच्या काचेपासून अगदी उच्च दर्जाच्या भिंगाच्या कॅमेऱ्यापर्यंत काचेचा उपयोग होतो. बांगड्या, आरसे, ग्लासेस, चष्मे, घड्याळे, कंदील, दिवे, ट्यूब-लाईटस आणि अशा घरगुती वापराच्या अनेक गोष्टींमध्ये काचेचा वापर केलेला असतो. सूक्ष्मदर्शक यंत्र, दुर्बीण, टीव्ही, प्रयोगशाळेतील अनेक उपकरणांमध्ये काच हा एक महत्त्वाचा घटक असतो. काच ही ठिसूळ असते. त्यामुळे ती फूटणारी वस्तू आहे. काच जेव्हा खाली पडून तिचे जे तुकडे होतात ते अणकुचीदार असतात. त्याने जखमा होतात. काचेच्या या वैगुण्याकडे जगभरच्या लोकांनी डोळेझाक केली आहे. कारण काचेचे गुण हे तिच्या वैगुण्यापेक्षा किती तरी श्रेष्ठ आहेत. साहजिकच काच आणि तत्सम पदार्थांचे संशोधन करणे खूप महत्त्वाचे आहे. ही बाब विज्ञानप्रेमी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जाणलेली होती. त्यांनी त्यांचे विश्वासू स्नेही प्रो.शांतिस्वरूप भटनागर यांच्या सहकार्याने कोलकाता येथे सेंट्रल ग्लास ॲण्ड सिरॅमिक रिसर्च इन्स्टिट्यूट (सी.जी.सी.आर.आय. केंद्रीय काच आणि सिरॅमिक अनुसंधान संस्था) २६ ऑगस्ट १९५० रोजी स्थापन केली. सी.एस.आय.आर. (कौन्सिल ऑफ सायंटिफिक ॲण्ड इंडस्ट्रियल रिसर्च) या संस्थेच्या वतीने ही प्रयोगशाळा कार्य करीत आहे. सुरुवातीला या प्रयोगशाळेचे नाव 'सिलिकेट रिसर्च इन्स्टिट्यूट'. आपल्या देशातील खनिज संपत्तीची व्याप्ती, उपलब्धता या संबंधात कार्य करणे हे या प्रयोगशाळेचे उद्दिष्ट होते. ही प्रयोगशाळा काच आणि मृत्तिका या विषयांवर भर देऊ लागली. कारण जगभर या विषयांचे महत्त्व वाढत होते. कार्यक्षेत्र व्यापक झाल्यामुळे संस्थेचे नाव बदलणे गरजेचे झाले. काच आणि मृत्तिका घडवण्यासाठी कच्चा माल, यंत्रसामग्री, उपकरणे वगैरे विविध प्रकल्पांवर काम सुरू झाले.

सुरुवातीला म्हणजे १९५०-६० या कालखंडात 'सीजीसीआरआय'ने ऑप्टिकल ग्लाससंबंधी जे संशोधन केले होते त्याची जगातील अनेक जाणकारांनी प्रशंसा केली होती. कारण अशा प्रकारच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक विषयांवर जगात फार थोड्या ठिकाणी संशोधन कार्य चालत होते. ऑप्टिकल ग्लासचा उपयोग पेरिस्कोप, दुर्बीण, रेंज फायंडर, गन साईट, फायर डायरेक्शन या अत्याधुनिक



यंत्रणेमध्ये वापर असलेल्या घटकांचे संशोधन येथे सुरू झाले. यातील कित्येक गोष्टी लष्कराच्या उपयोगी पडणाऱ्या असतात. या ऑप्टिकल ग्रेड काचेचे इतर अनेक उपयोग आहेत. सिनेमा दाखवण्यासाठी जे प्रोजेक्टर असतात त्यासाठी उत्कृष्ट भिंगे लागतात. ती भिंगे उष्णतारोधक असतील तर उत्तमच. तारे पाहण्याची दुर्बीण (टेलिस्कोप) आणि जमिनीवरील (आसपासचे) पाहण्याची द्विनेत्री (बायनॉक्युलर), अनेक शास्त्रीय उपकरणांमध्ये वापरण्यात येणारे लोलक या करिता उच्च दर्जा असलेलीच काच लागते. कॅमेऱ्यामधील काचेचे भिंग तर अत्यंत निर्दोष असावे लागते. भारत विविध प्रकारची भिंगे परदेशांतून आयात करीत आहे. यामुळे आपले परकीय चलन खर्च होते. आपल्या देशाचे आत्मनिर्भरतेचे धोरण पूर्वीपासूनच आहे. हे लक्षात घेऊन 'ऑप्टिकल ग्लास' हाच एक महत्त्वाचा विषय या प्रयोगशाळेने संशोधन आणि विकास करण्यासाठी निवडलेला आहे. यामुळे परदेशी 'लेन्स' आयात करण्याचे प्रमाण घटत राहील अशी आशा करायला हरकत नाही.

सीजीसीआरआय या प्रयोगशाळेने बँच पद्धतीने विविध प्रकारच्या काचा तयार करण्याचे प्रयोग यशस्वी करून दाखवले आहेत.

ऑप्टिकल फायबरसंबंधीचे उच्च तंत्रज्ञान आपल्या देशाने अवगत करणे गरजेचे आहे. कारण या क्षेत्रात जगात खूप मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. दर्जेदार ग्लास फायबर निर्मितीकरिता आता संगणकाचा वापर केला जात आहे.

काचेसंबंधीचे संशोधन हे बरेचसे सिरॅमिक विषयाशी मिळते जुळते आहे. लघुउद्योगाचा विकास व्हावा म्हणून या प्रयोगशाळेने 'पॉटरी'साठी बरेच प्रकल्प पार पाडले असून काही लघुउद्योजकांनी त्याचा लाभ घेतलेला आहे. पश्चिम बंगालमध्ये बांकुडा जिल्ह्यात पांचमुडा गाव आहे. येथे विशिष्ट प्रकारची मृत्तिका (क्ले) सापडते. त्याचा औद्योगिक क्षेत्रात उपयोग होऊ शकतो. त्यामुळे 'पॉटरी' या लघुउद्योगात जे तरुण कारागीर आहेत त्यांना उपयोग झालाय. कारण त्यांना या प्रयोगशाळेने प्रशिक्षण दिलेले आहे. याचा फायदा ग्रामोद्योगासाठी आदर्श ठरलाय.

या प्रयोगशाळेने 'डिफेन्सिव्ह रिसर्च सबस्टिट्यूशन' महत्त्व जाणलंय. त्यानुसार ही प्रयोगशाळा लेझर ग्लास, सिंथेटिक क्वार्टझ सिंगल क्रिस्टल, इन्फ्रारेड ट्रान्समिटिंग फिल्टर, हाय टेंपरेचर हाय ॲल्युमिना सिरॅमिक्स सील (स्पेसर) या संरक्षण क्षेत्रात उपयुक्त आणि जरूरीच्या उपकरणांचे संशोधन चालू ठेवले आहे. आता 'फोम ग्लास', 'ग्लास बॉण्डेड मायका (अभ्रक), स्टील प्लँट रिफॅक्टरी आणि फायबर ग्लास या प्रकल्पांवर येथील संशोधक संशोधन करीत असतात. ज्यांना अशा प्रकारच्या व्यवसायात प्रगती करायची असेल त्यांनी या प्रयोगशाळेच्या वेबसाईटवर जाऊन भरपूर माहिती गोळा करावी. प्रयोगशाळेच्या संचालकांना पत्र पाठवून त्यांच्या अनुमतीने आवश्यकता वाटली तर प्रयोगशाळेला भेट द्यावी. या प्रयोगशाळेचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

To,
The Central Glass & Ceramic Research Institute (CGCRI),
Opp. Jadavpur Police Station at the Junction of the Raja S.C.Muòick Road and Prince Anwar Shah Road of Jadavpur area in the southern part of Kolkata city.
Phone No. 00 91-33-2473-5829 (O) Fax : 00 91-33-2473-0957
E-mail : director@cgcri.res.in

## कर्म हीच पूजा!

कुठल्याही व्यवसायात यश मिळविण्यासाठी सतत कामाचा ध्यास असावा लागतो आणि त्यासाठी उगीचच ताणतणावांचा (टेन्शन) बाऊ करून जमत नाही. हार्ड वर्कबरोबर कठोर परिश्रम (हार्ड स्टेप्स) आत्मविश्वासाने उचलावी लागतात. त्यामध्ये मन गुंतवावे लागते. पूजा समजून कर्म करावे लागते. डोक्यावर ताणतणावाचे ओझे नुसते बाळगून यश मिळत नाही. योग्य वेळी योग्य काम केल्याने यशप्राप्ती होते.






महिला व बालकल्याण विकास
विभागाकडून महिला बचत गटांसाठी
**यशस्विनी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म**

### आर्थिक उन्नतीचा नवा मार्ग

# बचतगटांसाठी यशस्विनी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म

**महिला बचतगटांच्या उत्पादनाला हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून महिला बचतगटांसाठी यशस्विनी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. यामुळे महिला बचतगटांना आपले उत्पादन ऑनलाइन विकता येणार आहे.**

**- प्रतिनिधी**

पूर्वा फार चालत आलेल्या रूढी-परंपरांच्या जोखडाखाली दबलेली महिला नेहमीच साधनसंपत्तीपासून वंचित राहिलेली आहे. देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक स्तर टिकवून ठेवण्यासाठी आर्थिक साक्षरताही अत्यंत महत्त्वाची आहे. जोपर्यंत आर्थिक स्वातंत्र्य मिळत नाही तोपर्यंत महिलांना त्यांच्या कल्याणासाठी विविध उपक्रमांना वेळ देता येणार नाही आणि बळही मिळणार नाही हे बळ मिळवण्यासाठी महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून उद्योग आणि व्यवसायाचा मार्ग स्वीकारणे ही अत्यंत आवश्यक अशी बाब ठरली आहे

बचत गट हा एक सामाजिक-आर्थिक उपक्रम आहे. ही प्रक्रिया संघटितपणे एकमेकांना समजून घेत होत असल्याने या रचनेला स्वयंसाहाय्य गट असेही संबोधले जाते. बचत गट म्हणजे ठराविक काळाने बचत जमा करण्याच्या निमित्ताने एकत्र येणारा गट होय. हा नाबार्डचा सूक्ष्म वित्त पुरवठ्याचा जगातील सर्वात मोठा कार्यक्रम आहे. गटाला काहीतरी विशिष्ट नाव ठेवले जाते आणि त्यातून गट एखाद्या व्यवसायात उतरतात.आज बचतबट क्रांतीमुळे अनेकांना रोजगार निर्माण झाला आहे. आत्मविश्वासासह, अंगी असलेल्या गुण कौशल्याला बचत गटांमुळे वाव मिळाला आहे.सामाजिक साचे बद्ध चौकटित महिलांनी न अडकता पुरुषप्रधान क्षेत्रातही उतरावे यासाठी शासनही मदत करत आहे. दीनदयाल अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानाद्वारे डिसेंबर २०२३ मध्ये जारी केलेल्या आकडेवारीनुसार, भारतात नऊ दशलक्ष स्वयं साह्याता ग्रुप आहेत, ज्यात जवळपास १०० दशलक्ष महिला सदस्य आहेत.

महिला बचतगटांच्या उत्पादनाला हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून महिला बचतगटांसाठी यशस्विनी ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते या प्लॅटफॉर्मचे ऑनलाइन उद्घाटन करण्यात आले. भारताच्या रिटेल क्षेत्रात ऑनलाइन शॉपिंग महत्त्वाची भूमिका निभावत आहे. सध्या करोडो रुपयांची देवाण घेवाण ऑनलाइन शॉपिंग प्लटफॉर्मद्वारे केली जात आहे. यामध्ये महिला बचतगटांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी हा पथदर्शी उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यामुळे राज्यातील ग्रामीण, आदिवासी, शहरी अशा हजारो बचतगटांनी तयार केलेली नावीन्यपूर्ण, दर्जेदार उत्पादने यशस्विनी ई -कॉमर्स प्लटफॉर्मवर आता उपलब्ध होणार असून महिला बचत गटांना आर्थिक उन्नतीचा नवा मार्ग उपलब्ध होणार आहे.

जाहिरातीच्या आभावी अनेकवेळा महिला बचत गटांची उत्पादने विकली जात नाहीत किंवा त्यांना योग्य बाजारभाव मिळत नाही. त्यासाठी महिला व बालविकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी या अभिनव कल्पनेच्या माध्यमातून यशस्विनी ई- कॉमर्स प्लॅटफॉर्म विकसित केला आहे. यामध्ये बचत गटांना खरेदी किंवा विक्री करण्याकरिता सहज आपले नाव नोंदणी करता येणार आहे. तसेच बचत गटांच्या उत्पादनाचे फोटो अपलोड करता येणार आहेत तसेच त्यांच्या किंमतीची व गुणवत्तेची जाहिरात करण्यासाठी सुद्धा यामध्ये डॅशबोर्ड व्यवस्था करण्यात आली आहे.

बचतगटांना उत्पादन पॅकिंग, वाहतूक, साठवणूक करणे, योग्य हाताळणी करणे या विषयी माहिती देण्यात आली आहे. महिला बचतगटांनी उत्पादन केलेल्या वस्तूंची विक्री झाल्यानंतर त्यांच्या खात्यात ऑनलाइन रक्कम जमा होण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यशस्वीनी प्लॅटफार्म सर्व जनतेसाठी उपलब्ध असून नागरिकांनी https://yashaswini.org/launch.html या प्लॅटफॉर्मला भेट द्यावी. ग्रामीण महिलांनी स्वावलंबनासाठी महिला बचत गटाची कास धरली आहे. महिला बचत करतात. सरकारी पाठिंबा, नियमांचा जाच नसल्याने परिणामकारक ही चळवळ ठरत आहे. विविध जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, स्टेट बँक आणि इंडिया, इतर राष्ट्रीयकृत बँका, नागरी सहकारी बँका यांच्या प्रोत्साहनाने बचत गटाची चळवळ ही जलत गतीने वाढते आहे. बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना नाबार्डने आपल्या असून अनेक प्रोत्साहन पर योजना सुरू करण्यात आल्या आहे. बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे त्यात दर्जा सुधारणे त्यात सातत्य राखणे त्यांना पॅकेजिंगविषयक मदत करणे यासाठी अनेक संस्था आजही कार्यरत आहेत.याच प्रयत्नाना बळ देण्याचा यशस्वीनी व्यासपिठाचा प्रयत्न आहे.




नवीन पिढीसाठी दिशादर्शक, उपयुक्त ग्रंथ

# चांगलं जीवन जगण्यासाठी प्रेरक गुरुमंत्र

**जीवनात शिकण्याबरोबरच अर्जन म्हणजे कमावणे (Earn) आणि गरजूंना, उपकारकर्त्यांना कृतज्ञ भावाने मदत करणे (अर्पण, Return). पुस्तकाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या भागात अनुक्रमे अर्जन आणि अर्पण क्रियांची माहिती उदाहरणांसह दिली असल्यामुळे ती समजण्यास सुलभ झाली आहे.**

**- प्रतिनिधी**

सध्याच्या स्पर्धात्मक ज्ञान युगात सर्व वयोगटातील व्यक्तीना चांगलं जीवन जगण्याची योग्य दृष्टी देणारा ग्रंथ 'महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ, मुंबई' यांनी नुकताच प्रकाशित केला आहे. प्रा. जीवन मुळे लिखित हा ग्रंथ अतिशय सोप्या भाषेत, समर्पक उदाहरणांसाह आपल्याला जीवनात 'अध्ययन, अर्जन आणि अर्पण' यांचे संतुलन ठेवून समृद्ध, कृतार्थ जीवन कसं जगावं याचं उत्तम मार्गदर्शन करतो.

या ग्रंथात मुख्यतः तीन विभाग आहेत. पहिल्या विभागात माणसांसाठी आयुष्यात 'अध्ययन' अर्थात शिकणे (Learn), भरपूर ज्ञान मिळवणे किती आणि का आवश्यक आहे, याचं महत्त्व आणि महात्म्य अधोरेखित केले आहे. आजीवन शिक्षण (Lifelong learning) ही आज काळाची गरज आहे. कारण दर ६४ दिवसांनंतर ज्ञानात भर, सुधारणा, बदल होत आहेत. त्यामुळे जीवनभर ज्ञानाच्या बाबत अद्ययावत राहणे अत्यावश्यक बनले आहे.

जीवनात शिकण्याबरोबरच अर्जन म्हणजे कमावणे (Earn) आणि गरजूना, उपकारकर्त्यांना कृतज्ञ भावाने मदत करणे (अर्पण, Return) हेही तेवढेच आवश्यक असते. पुस्तकाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या भागात अनुक्रमे अर्जन आणि अर्पण क्रियाची माहिती उदाहरणांसह दिली असल्यामुळे ती समजण्यास सुलभ झाली आहे.

सध्याच्या आपल्या जीवन जगण्याच्या पद्धतीत या तीनही प्रक्रिया (शिकणे, कमावणे आणि परतफेड करणे) एकाचवेळी केल्या जात नाहीत. उदाहरणार्थ नोकरी किंवा व्यवसाय करताना आपण फक्त पैसे कमावण्यावरच भर देतो. नवीन शिकणे, अनुभव घेणे, माणसं कमावणे, इतरांना मदत देण्यासाठी वेळ देणे, इत्यादी बाबीकडे आवश्यक तेवढे योगदान, लक्ष दिले जात नाही. आपण फक्त एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित केल्यामुळे आपला विकासही एकांगी होतो. विकास सर्वांगीण कसं करावा त्याच्या टिप्स वाचकांना पुस्तक वाचल्यावर समाजातील. माणसाने आपल्या जीवनशैलीत आवश्यक बदल कुठे आणि कसे करावे यांचे उपयुक्त मार्गदर्शन या पुस्तकात अतिशय उत्तमपणे केले आहे. लेखकाला अध्यापनाचा मोठा अनुभव असल्यामुळे सर्व वयोगटातील व्यक्तीना समजेल, उमजेल अशारीतीने शब्दरचना आणि मांडणी केली आहे.

सध्याच्या काळात सर्वांसाठी, विशेषकरून नव्या पिढीसाठी या मार्गदर्शनाची खूपच गरज आहे. इंग्रजीमध्ये या विषयावर काही पुस्तके आहेत; परंतु मराठी भाषेत अशा पुस्तकाची फार आवश्यकता होती. ती उणीव या पुस्तकाने भरून निघेल. शिवाय ही माहिती आयुष्यभर आपल्याला उपयुक्त ठरणारी असल्यामुळे हे पुस्तक तुमच्या संग्रही असणे हितकारक ठरेल. हे पुस्तक ग्रंथालयात असेल तर अनेकांना त्याचा उपयोग होऊ शकतो.

थोडक्यात चांगलं जीवन जगण्याचा उद्देश्य केवळ भरपूर पैसे कमावून किंवा फक्त खूप शिक्षण घेऊन, केवळ परोपकारावरच लक्ष केंद्रित करून साध्य होत नाही. त्यांचे संतुलन असणे गरजेचे असते. त्यासाठी या पुस्तकात सुचविलेल्या त्रिसूत्रीचे अनुकरण केले पाहिजे.

लेखकाने अत्यंत तळमळीने, आस्थापूर्वक लिहिलेल्या या ग्रंथाचा लाभ नवीन पिढीसह सर्व वयोगटातील व्यक्तीना होऊ शकतो. तुमच्या करिअर विकासासह जीवनाच्या सर्वांगीण (वैयक्तिक, व्यावसायिक आणि सामाजिक जीवन) विकासासाठी पुस्तकात दिलेली तीन सूत्रं उपयोगी ठरणारी आहेत. यासाठी जास्तीत जास्त लोकांनी या ग्रंथाचे वाचन, अनुकरण करण्याची आवश्यकता आहे. या ग्रंथामुळे नवीन पिढीला ऊर्जा मिळेल. त्यांच्यासाठी 'फ्रेंड, फिलॉसॉफर आणि गाईड' (मित्र, तत्त्ववेत्ता आणि मार्गदर्शक)ची भूमिका बजावेल असा विश्वास वाटतो.

**ग्रंथाचे नाव : अध्ययन, अर्जन आणि अर्पण**
**लेखक : प्राचार्य जीवन मुळे**
**प्रकाशक : महाराष्ट्र भारतीय शिक्षण मंडळ, मुंबई**
**पृष्ठे : २००**
**मूल्य : २०० रुपये**



राज्याचे पर्यटन धोरण-२०२४

# पर्यटन क्षेत्रात १ लाख कोटींची गुंतवणूक, १८ लाख रोजगार

**राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटन धोरण-२०२४ तयार करण्यात आले आहे. या माध्यमातून उच्चतम दर्जाचे शाश्वत व जबाबदार पर्यटन विकसित करण्याचे उद्दिष्ट असून ग्रामीण भागातील पर्यटन व कृषी पर्यटनास वाव देण्यात येणार आहे. २०२८ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर्स करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात पर्यटनाचे योगदान वाढविण्यासाठी या धोरणात महत्त्वाची क्षेत्रे निश्चित केली आहेत. या माध्यमातून राज्यात पर्यटन क्षेत्रात सुमारे १ लाख कोटींच्या गुंतवणुकीतून १८ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे. - प्रिया गंध्रे**

राज्याचे बहुप्रतिक्षित पर्यटन धोरण-२०२४ १८ जुलै रोजी जाहीर करण्यात आले. मुंबई महानगर प्रदेशासाठी पर्यटन प्रोत्साहन आणि सुविधा मंडळ, राज्यातील सागरी किनाऱ्यासाठी क्रूझ पर्यटन, तसेच नद्यांमध्ये हाउसबोटना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. पर्यटन घटकांना भांडवली गुंतवणूक प्रोत्साहन, अतिरिक्त चटई क्षेत्र, सीजीएसटी कराचा परतावा, वीजदरात सवलत, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना इतर वित्तीय प्रोत्साहन, व्याज व अनुदान प्रोत्साहन, महिला उद्योजक, अनुसूचित जाती-जमाती, भिन्न सक्षम घटक यांना अतिरिक्त प्रोत्साहन, पर्यटनाशी संबंधित घटकांना पुरस्कार अशा गोष्टींचा यात समावेश आहे. धोरणात वेगळे 'माइस' केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. राज्यात १० वर्षात पर्यटनस्थळे तसेच पायाभूत सुविधा विकसित करून पर्यटकांचा ओघ दुप्पट करण्याचे उद्दिष्ट आहे ठेवण्यात आल्याची माहिती पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

**विभागनिहाय स्पर्धांचे आयोजन :** पर्यटनमंत्री गिरीश महाजन म्हणाले, ग्रामीण व शहरी भागात पर्यटनाद्वारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करणे हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. राज्यात त्यासाठी उच्चतम दर्जाचे शाश्वत व जबाबदार पर्यटन विकसित करून ग्रामीण भागातील पर्यटन व कृषी पर्यटनास वाव देण्याच्या दृष्टीने विविध पुरस्कारही देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील लघु, मध्यम, मोठे, मेगा, अल्ट्रा मेगा प्रकल्पांना अ, ब, क गटांमध्ये विभागण्यात आले असून त्यांना गुंतवणूक व रोजगारनिर्मितीच्या आधारे प्रोत्साहन देण्यात येणार आहे. पर्यटन घटकांना व्याज परतावा, एसजीएसटी परतावा, विद्युत शुल्कासह विविध करांमध्ये सवलतींचा धोरणात समावेश आहे. ग्रामीण भागातील पर्यटन उद्योगांसाठी होम स्टे, ॲग्रो टूरिझम या स्पर्धा विभागनिहाय राबविण्यात येणार आहेत. या धोरणामुळे राज्याचा देशातील राज्यांमध्ये अग्रेसर राज्य श्रेणीत समावेश होणार आहे.

**खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी वातावरण निर्मिती :** देशातील व राज्यातील पर्यटकांना आकर्षित करणे, पर्यायाने व्यापार-उत्पन्न आणि उद्योजकता यांना चालना देणे, पर्यटन क्षेत्रामध्ये ग्रामीण व शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे, पर्यटन क्षेत्रात नवीन गुंतवणूक आणणे, राज्याच्या महसुलात वाढ करणे, राज्यातील वैविध्यपूर्ण, बहुप्रांतीय, बहुभाषिक संस्कृती लक्षात घेता स्थानिक लोकसंस्कृतीवर आधारित कार्यक्रम आणि उत्सवाचा पर्यटनाच्या विकासासाठी उपयोग करून घेणे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून नवकल्पना, उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढविणे यावर या धोरणात भर देण्यात येणार आहे. एक खिडकी प्रणालीच्या संस्थात्मकीकरणासह खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी सक्षम वातावरण निर्माण करणे. केंद्र सरकारच्या मैत्री प्रणालीसह संलग्न केले जाणार आहे.

**पर्यटन वाढीसाठी आर्थिक तरतूद :** पर्यटन घटकांना भांडवली गुंतवणूक प्रोत्साहन, सीजीएसटी कराचा परतावा, वीजदरात सवलत,सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना इतर वित्तीय प्रोत्साहन, व्याज व अनुदान प्रोत्साहन, महिला उद्योजक, अनुसूचित जाती-जमाती, भिन्न सक्षम घटक यांना अतिरिक्त प्रोत्साहन, देश-परदेशातील पर्यटन प्रदर्शन, ट्रॅव्हल शो- मार्टमध्ये सहभागासाठी पर्यटन भागधारकांना प्रोत्साहन, ग्रामीण पर्यटन मेळावा, वार्षिक मेळावा आयोजनासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १५ लक्ष पर्यंत), मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क सूट, युवा पर्यटनासाठी प्रोत्साहन, पर्यटन पुरस्कार, कौशल्य विकास कार्यक्रमांना प्रोत्साहन, पर्यटन/आदरातिथ्य उद्योगातील संशोधनासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १० लक्ष पर्यंत), माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान सक्षमीकरणासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १० लक्ष पर्यंत), दुर्मिळ कला, संस्कृती आणि पाककला पुनरुज्जीवित करण्यास प्रोत्साहन (प्रति रु. ५ लाख पर्यंत), नावीन्यपूर्ण उत्पादने/सेवांसाठी प्रोत्साहन (प्रति रु, ५० हजार पर्यंत), दिव्यांगाना रोजगार देण्यासाठी प्रोत्साहन, पर्यावरण पर्यटन प्रमाणपत्रासाठी प्रोत्साहन (प्रति रु. १० लक्ष पर्यंत), कृषी, कॅराव्हॅन, साहसी पर्यटनासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे, याबाबतचा सविस्तर शासन निर्णय राज्यशासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**पर्यटन विभागाचे आता एकच बोधचिन्ह व घोषवाक्य**

पर्यटन संचालनालय तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ या दोन प्रमुख संस्था पर्यटन विभागाच्या अधिनस्त असल्या तरी त्यांचे बोधचिन्ह, घोषवाक्य यामध्ये तफावत होती, ती आता दूर करण्यात आली आहे. आता 'महाराष्ट्र टूरिझम' हे बोधचिन्ह (लोगो), 'महाराष्ट्र अनलिमिटेड' हे घोषवाक्य (टॅग लाइन) असेल, असा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील पर्यटन स्थळांची राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी, प्रचार करून पर्यटन वाढीला चालना देण्यासाठी शासन कार्यरत आहे. येत्या काळामध्ये राज्यातील पर्यटन वाढीसाठी महत्त्वपूर्ण योजना आणि उपक्रम या धोरणाअंतर्गत राबविण्यात येणार असल्याचे महाजन यांनी सांगितले.

*(या लेखाच्या लेखिका मुक्त पत्रकार असून विविध विषयांवर लिखाण करतात. त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ९१६८०६७००६ हा आहे.)*

डिजिटल इंडिया अभियान

# डिजिटल तंत्रज्ञानात भारताची आगेकूच

**डिजिटल क्रांतीमध्ये भारताचे स्थान जगात अग्रेसर आहे. मागच्या ७ वर्षांत डिजिटल व्यवहारातील वार्षिक वाढीचा दर संख्येच्या बाबतीत ५० टक्के आणि मूल्याच्या संदर्भात १० टक्के इतका होता. याचा अर्थ अत्यंत जलद वेगाने देशात डिजिटल क्रांती होत आहे, हे स्वागतार्ह आहे. २०२३-२४ मध्ये ४२८ लाख कोटी रुपयांचे १६४ अब्ज डिजिटल व्यवहार झाले. संपूर्ण जग भारताने या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे आज कौतुक करत आहे. ही बाब अभिमानाची आहे.**

**- हेमंत देसाई**

जगातील डिजिटल व्यवहारांमध्ये भारताचा हिस्सा तब्बल ४८.५ टक्क्यांवर पोहोचला आहे. दोन वर्षांतच, म्हणजे २०२६ साली देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात, अर्थात जीडीपीमध्ये डिजिटल अर्थव्यवस्थेचा वाटा सध्याच्या एकदशांशावरून एकपंचमांश असा वाढण्याचा दिलासादायक अंदाज रिझर्व्ह बँकेच्या अहवालाने प्रकट केला आहे.

देशातील प्रशासनातील जनतेचा सहभाग वाढवणे, ते अधिक पारदर्शी बनवणे, शासकीय कारभार लोकाभिमुख करणे अशा उद्देशांनी नरेंद्र मोदी सरकारने १ जुलै २०१५ साली देशात 'डिजिटल इंडिया अभियाना'ची सुरुवात केली. टाटा समूहाचे तत्कालीन अध्यक्ष सायरस मिस्त्री, रिलायन्स इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी, विप्रोचे अध्यक्ष अझीम प्रेमजी प्रभृतींनी या अभियानाला पाठिंबा दिला होता. या अभियानाबाबत जनजागृती करण्यासाठी ३६ राज्यांत आणि ६०० जिल्ह्यांत विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले. यूजीसी, म्हणजेच विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व महाविद्यालये व उच्चशिक्षणसंस्थांना डिजिटल इंडिया सप्ताह साजरा करण्याच्या सूचना दिल्या. हे उपक्रम स्तुत्यच होते. माहिती तंत्रज्ञानावर आधारित सशक्त अर्थसत्ता बनण्यासाठी हे गरजेचेच होते. डिजिटल लॉकर, ई-एज्युकेशन, ई-हेल्थ, ई-साइन आणि नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल यासारख्या योजनांवर सरकारने १ लाख कोटी रुपयांहून अधिक खर्च केला. ११ राज्यांत भारत नेट आणि नेक्स्ट जनरेशन नेटवर्क योजना राबवली. नागरिकांना सरकारी सुविधांचा व योजनांचा लाभ घेता यावा, यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला. डिजिटल इंडियासाठी खास ॲपचा वापर सुरू करण्यात आला. डिजिटल इंडिया पोर्टल तर आहेच. स्वच्छ भारत ॲप हेही लोकप्रिय आहे. आधार क्रमांक मोबाइल अपडेट ॲप आहे आणि त्याचा उपयोग असंख्य लोक करून घेत आहेत. प्रत्येक नागरिकासाठी डिजिटल सोयीसुविधा पुरवल्या जात आहेत.

ब्रॉडबँड महामार्ग, दूरध्वनीची व इंटरनेटची सार्वत्रिक उपलब्धता, ई-गव्हर्नन्स, सेवांचा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पुरवठा हे डिजिटल इंडियाचे आधारस्तंभ आहेत. विकासामध्ये सहभागी होण्यासाठी सर्वांना पारदर्शी पद्धतीने माहिती व सेवा मिळणे आवश्यक असते. त्यामुळे लाखो गावांमध्ये ब्रॉडबँड सुविधा पुरवण्यात आल्या. शून्य टक्के इलेक्ट्रॉनिक आयात करावी लागावी, इतपत या वस्तूंच्या उत्पादनात देशाला स्वयंपूर्ण बनवण्यात येणार आहे. चार लाख सार्वजनिक इंटरनेट केंद्रे स्थापण्यात येत आहेत. अडीच लाख शाळांमध्ये वायफाय सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार व इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात नोकऱ्या मिळवण्यासाठी जवळपास दोन कोटी तरुणांना प्रशिक्षण दिले जात आहे. आरोग्य, शिक्षण व बँकिंग या क्षेत्रांत आयटीच्या वापराबाबत भारत आघाडीवरील देश बनला आहे. डिजिटल लॉकर योजना राबवली जात असून, या योजनेंतर्गत नागरिकांना त्यांची पॅन कार्ड्स, पासपोर्ट, गुणपत्रिका, प्रमाणपत्रे आदी कागदपत्रे सुरक्षितरीत्या साठवण्यास मदत होत आहे. कागदाचा वापरही यामुळे कमी होत आहे. त्यामुळे लोकांचा वेळ व कष्ट यांची बचत होत आहे. आधार कार्ड आणि त्याला संलग्न असलेल्या मोबाइल नंबरद्वारे या योजनेचा लाभ घेता येतो. नॅशनल ऑप्टिकल फायबर नेटवर्कद्वारे ग्राम पंचायतींपासूनचे नेटवर्क जोडले जात आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर, आता जगभरातून परदेशस्थांनी आपल्या मायभूमीत पैसे धाडण्याचे प्रमाण भारतात सर्वाधिक आहे. २०२३ मध्ये ही रक्कम ११५ अब्ज डॉलर होती. रिझर्व्ह बँकेच्या चलन आणि वित्त अहवालानुसार, मोबाइल आणि डिजिटल मंचांच्या माध्यमातून जागतिक पातळीवरून मायदेशी पैसे पाठवण्याचे प्रमाण वाढलेच आहे. गेल्या वर्षी संपूर्ण जगभरातील ही रक्कम ८५७ अब्ज डॉलर्स इतकी होती. डिजिटल क्रांतीमध्ये भारताचे स्थान जगात अग्रेसर आहे. मागच्या सात वर्षांत डिजिटल व्यवहारांतील वार्षिक वाढीचा दर संख्येच्या बाबतीत ५० टक्के आणि मूल्याच्या संदर्भत १० टक्के इतका होता. याचा अर्थ, अत्यंत जबरदस्त वेगाने देशात डिजिटल क्रांती होत आहे आणि हे स्वागतार्ह आहे. २०२३-२४ मध्ये ४२८ लाख कोटी रुपयांचे १६४ अब्ज डिजिटल व्यवहार झाले. संपूर्ण जग भारताने या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे कौतुक करत आहे, ही अभिमानाचीच गोष्ट आहे. २०००च्या दशकात भारताने इंटरनेट क्रांतीतही असाच चमत्कार घडवला होता. त्यमुळे जगभारात भारतातील आयटी तंत्रज्ञांची मागणीही वाढली. आता भारताने वित्तीय नवतंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे. तसेच बायोमेट्रिक ओळख, युनिफाइड पेमेंट इंटरफेस, डिजी लॉकर, मोबाइल संपर्क यंत्रणा आणि संमतीसह डेटा हस्तांतरण या सर्वच बाबींचा भारताने स्वीकार केला आहे; परंतु त्याचवेळी भारतात डिजिटल वित्तीय पायाभूत सुविधांना सायबर गुन्हेगार लक्ष्य करत आहेत. सात वर्षांपूर्वी भारतीय संगणक आपत्कालीन प्रतिसाद प्रथकाने ५३ हजार सायबर हल्ले हाताळले होते. हे प्रमाण तेरापटीने वाढून तेरा लाखांवर गेले आहे. कुठल्याही तंत्रज्ञानाचा दुरुपयोग होतो, तसे याबाबतही घडत आहे. ईमेल आणि मोबाइलवर बनावट मेसेजेस पाठवून, लोकांना फसवले जात असते. भारतात डेटाचोरीमुळे मागच्या तीन वर्षांत सरासरी आर्थिक हानी २८ टक्क्यांनी वाढली. या नुकसानीचे प्रत्यक्ष प्रमाण २० लाख डॉलर इतके आहे. म्हणजे एकूण जनतेचे सायबर संरक्षण करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची असून, तिचे पालन न झाल्यास, होणारे नुकसान दिवसेंदिवस वाढतच जाईल.

*(या लेखाचे लेखक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व ज्येष्ठ पत्रकार आहेत. त्यांचा ई-मेल hemant.desai001@gmail.com आहे.)*



एक नवा रचनात्मक दृष्टीकोन

# सामाजिक उद्योजकता आणि शाश्वत विकास

**आर्थिक वाढीतून सामान्य जनतेचा जीवनस्तर कसा उंचावता येईल याचा विचार करण्याची गरज आहे. आपल्या उद्योजकीय व्यवस्थेत थेट पारंपरिक क्षमतांचे आधुनिक उद्योगात रूपांतर करण्याची धमक आहे; पण त्यासाठी केले जाणारे प्रयत्न अपुरे आहेत. विकास प्रक्रिया गतिमान करताना नव्या संकल्पनांचा स्वीकार करणे अगत्याचे असते. विकासाचे प्रकल्प जर स्थिर आणि सुसंघटित राहायचे असतील तर शाश्वतता हा त्याचा आत्मा असला पाहिजे. नैसर्गिक साधनसामग्री, नवीन अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि उपलब्ध मनुष्यबळाचा विचार असा एकात्मिक दृष्टिकोन अनुसरला पाहिजे.**

**- डॉ. वि. ल. धारूरकर**

भावी पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला बाधा पोहोचू न देता वर्तमानकाळातील गरजा पूर्ण करण्याच्या विकासाला शाश्वत विकास म्हणतात. शाश्वत विकासात पृथ्वीवरील संसाधनांचा वापर विकासासाठी करताना पुढील पिढ्यांनीही संसाधनांचा वापर काळजीपूर्वक करणे अपेक्षित असते.त्यांना शाश्वत विकासासंदर्भात जाणिव जागृती वाढविणे ही काळाची गरज आहे.

विकास हा नैसर्गिक संसाधनांच्या वापरावर अवलंबून असतो. नैसर्गिक संसाधने निसर्गनिर्मित असून ती मर्यादित प्रमाणात असतात. नैसर्गिक संसाधनांवर कोणत्याही एका विशिष्ट समाजाचे स्वामित्व नसून ते संपूर्ण सजीव सृष्टीचे असते. तसेच ते केवळ एका पिढीपुरते नसून भविष्यातील अनेक पिढ्यांसाठी असते. नैसर्गिक संसाधनांचा वापर अमर्याद केल्यास भावी पिढीसाठी संसाधने शिल्लक राहणार नाहीत, ही बाब लक्षात घेऊन शाश्वत विकास संकल्पना मांडली गेली आहे. ही संकल्पना नैसर्गिक संसाधनांचा काटकसरीने व प्रभावी वापर, नूतनीक्षम संसाधनांच्या वापरातून भौतिक विकास, सामाजिक न्याय व समता यांवर आधारित विकास इ. बाबींवर आधारलेली आहे.अशी संकल्पना मराठी विश्वकोशाने मांडली आहे.

नवीन सहस्त्रकामध्ये सर्वसमावेशक शाश्वत विकास ही काळाची गरज आहे. आर्थिक वाढ होत असताना विकासाची फळे सामान्य माणसापर्यंत कशी पोहोचविता येतील याचा विचार करत असताना अनेक नवीन प्रमेये मांडली जात आहेत. त्यांचे परिशिलन केले असता काही नवीन विचारप्रवाह लक्षात घेऊन नवे सिद्धांत मांडावे लागतील. या दृष्टीने प्रस्तुत लेखात सूत्ररूप विवेचन केले आहे.

**शाश्वत विकासाचे प्रयोजन :** तिसऱ्या जगामधील आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील विकसनशील राष्ट्रांसाठी शाश्वत विकासाचे सिद्धांत पूरक व पोषक ठरणारे आहेत. भांडवलशाही प्रधान आणि मार्क्सवादी विचारापेक्षाही हा नवा विचार वैशिष्ट्यपूर्ण आणि भारतीय परिस्थितीशी तादात्म्य पावणारा आणि सुसंगत असा असेल यावर येथे भर दिला आहे.

महात्मा गांधी यांनी खेडी हा आधारभूत घटक मानला आणि खेड्यांच्या संपूर्ण विकासासाठी ग्रामस्वराज्य ही संकल्पना मांडली. त्यामध्ये संधीची समानता आणि मानवी व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर भर देण्यात आला होता. आधुनिकीकरण म्हणजे पाश्चात्यीकरण हा विकासाचा पश्चिमी सिद्धांत तिसऱ्या जगासाठी खोटा ठरला असून कृषी, उद्योग आणि शिक्षण या तीनही विकास क्षेत्रात स्वयंप्रज्ञेने स्वतंत्र विकास प्रतिमाने विकसित केली पाहिजेत असे त्यांना वाटत होते. यादृष्टीने प्रस्तुत लेखात नवीन प्रतिमानाच्या विकासावर भर दिला आहे.

विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामान्य माणसाचा रचनात्मक सहभाग कसा वाढविता येईल यावरच शाश्वत विकासाचे फलीत अवलंबून असणार आहे. विकास विषयक जाणीवजागृती करण्यासाठी नवीन व्यूहरचना कशी करता येईल यादृष्टीने येथे विवेचन करावयाचे आहे.

**सामाजिक उद्योजकता कशासाठी? :** ग्रामीण पुनर्रचनेचा विचार करताना सबंध समाजाचे उद्योजकीकरण करण्याचे लक्ष ठेवले पाहिजे. स्वंयपूर्ण विकासाच्या प्रक्रियेत शेतीसुधारणा, नवे उद्योग आणि सेवांचा विकास आणि शालेय जीवनापासून कला आणि सजावटीचे संस्कार करण्याची गरज आहे. सामाजिक उद्योजकता विकासाच्या प्रक्रियेत पूरक आणि समन्वीत प्रयत्नांची गरज आहे. महिला दुर्बल घटक आणि अल्पसंख्याक यांना विकासाच्या मध्यवर्ती प्रवाहात आणण्यासाठी अशा

उद्योजकीय दृष्टीची गरज आहे.

नवीन आर्थिक दृष्टी विकसित करताना प्रगल्भीय राजकीय संस्कृतीची गरज आहे. सामाजिक व सांस्कृतिक अधिष्ठान असलेला स्वयंभू उद्योजक हा सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून कार्य करू शकतो.

**मार्गस्थ अडसर कोणते? :** अज्ञान, दारिद्र्य आणि साधनसामग्रीच्या विकास व वापरातील विसंगती ही शाश्वत विकासाच्या मार्गातील प्रमुख धोंड होय. त्यासाठी पूरक आणि सर्वसमावेशक अशा लोकशिक्षणाची गरज आहे. शालेय, उच्चमाध्यमिक आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय गुण रुजविले पाहिजेत. व्यक्तिमत्व विकासासाठी दिशादर्शक तत्त्व सूत्रांचा आणि उपयोजित उपक्रमांचा विकास करण्यावर भर द्यावा लागले. धोका कसा पत्करावा आणि उद्योगामध्ये गुंतवणूक कशी करावी याबाबत प्रगल्भ चिंतन आणि दिशादर्शनाची गरज आहे. उद्योजकता विकासासाठी पोषक विकास संस्कृती जर विकसित करावयाची असेल तर परंरा आणि आधुनिकता यात समन्वय साधण्याची गरज आहे. परंपरा आणि संस्कृतीस जर यथायोग्यपणे नवी दिशा दिली तर सांस्कृतिक जाणिवा विकासात अडथळा ठरू शकत नाहीत. त्यांचा समर्थपणे वापर करताना पारंपरिक प्रतिकांना नवा वैज्ञानिक अर्थ दिला पाहिजे. तसे झाले तरच रचनात्कम परिवर्तन शक्य आहे.

**नवी अध्यात्मिक बैठक :** विकासाला सामाजिक भान द्यावयाचे असेल तर त्यासाठी उद्योगात नैतिक व अध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करून दिले पाहिजे. उद्योजकता हे समाजाचे विश्वस्त आहेत आणि त्यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवले पाहिजे असा गांधीजीचा आग्रह होता. उद्योगसंस्थांनी आपल्या नफ्याचा काही सुनिश्चित भाग हा समाजाच्या भल्यासाठी वापरावा असे त्यांचे सूत्र होते. गांधीजीच्या पर्यावरण विचारास विवेकी मानवतावादाचे अधिष्ठान होते. जगा आणि जगू द्या हा विशाल दृष्टिकोन होता.


**शाश्वत विकासासाठी :** सर्वसमावेशक शाश्वत विकासासाठी भारतासारख्या देशाला पुढील उपाय योजावे लागतील. आर्थिक वाढ ही सामाजिक विकासात प्रकट व्हावी म्हणून समाजाच्या सर्व स्तरातून उद्योजक पुढे यावेत. वैश्विक स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी भारतीय उद्योजकता गुणवत्तेची बीजे रोवली पाहिजेत. त्यासाठी त्यांना आयएसओ ९००० सारख्या वैश्विक माणकासाठी यथार्थ प्रशिक्षणाचे कार्यक्रम आखले पाहिजेत. व्यवस्थापकीय दृष्टी विकसित करण्यासाठी त्यांना वैज्ञानिक प्रणालीबाबत प्रशिक्षण द्यावे लागेल. त्यासठी भारतीय व्यवस्थापन सिद्धांत विकसित केले पाहिजेत. पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी भारतीय नियामक तत्त्वे विकसित करावी लागणार आहेत. दुष्काळ, महापूर आणि भूकंप यासारख्या आपत्तीशी सामना करताना संरचनात्मक व्यवस्थेच्या विकासाची नवी मांडणी करावी लागले.

वाढती लोकसंख्या ही अधिक उत्पादक कार्याशी कशी वापरता येईल यावर भर देताना स्वयंसेवी संस्थांना नवी दिशा दिली पाहिजे.

**नवे सूत्र :** आर्थिक वाढीतून सामान्य जनतेचा जीवनस्तर कसा उंचविता येईल याचा विचार करावा लागेल. आपल्या उद्योजकीय व्यवस्थेत पारंपरिक क्षमतांचे आधुनिक उद्योगात रूपांतर करण्याची धमक आहे; पण त्यासाठी केले जाणारे प्रयत्न अपुरे आहेत. विकास प्रक्रिया गतिमान, नव्या संकल्पनांचा स्वीकार करणे अगत्याचे असते. विकासाचे प्रकल्प जर स्थिर आणि सुसंघटित राहावयाचे असतील तर शाश्वतता हा त्यांचा आत्मा असला पाहिजे. नैसर्गिक साधनसामग्री, नवी अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि उपलब्ध मनुष्य बळाचा विचार कसा एकात्म दृष्टिकोन अनुसरला पाहिजे. स्थानिक व प्रादेशिक गरजावर भर देऊन नवी व्यूहरचना करण्याची गरज आहे. समग्र विकासासाठी सामाजिक उद्योतकता रुजविली पाहिजे. समाजातील पददलित, दुर्बल घटक आणि महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक वातवारण निर्मिती करणे गरजेचे आहे. तसे झाले तरच भारतीय समाजात उद्योजकता रुजू शकेल आणि त्यातून एक नवे प्रतिभाशाली आत्मनिर्भर झेप घेणाऱ्या उद्योजकाचे युग अवतरू शकेल.

सध्या भारत जगामध्ये पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला आहे. दहा वर्षांपूर्वी भारताचे स्थान अकराव्या क्रमांकावर होते. आता भारताला जर्मनी, जपानला मागे टाकून जगात तिसऱ्या क्रमांकावर पोहोचावयाचे आहे. हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा भारतामध्ये चीन प्रमाणे घराघरात नवे छोटे उद्योग उभारले जाऊ शकतील. जागतिक बँकेने असे म्हटले आहे की, भारताला आर्थिक विकासाचा वेग वाढवावयाचा असेल तर महिला आणि समाजातील दुर्बल घटकाला उद्योजकतेच्या मध्यवर्ती प्रवाहात आणावे लागेल. त्यासाठी पोषक सामाजिक वातवरण तयार करावे लागेल. शहरातील मध्यम व छोटे उद्योग आणि ग्रामीण भागातील कृषी आधारीत लघुउद्योग हा भारताच्या भावी औद्योगिक विकासाचा भक्कम पाया असू शकेल. आजवर भारताने एकविसाव्या शतकात २००४, २०१२ दोन वेळा आर्थिक मंदिचा जबरदस्त मुकाबला केला आहे. त्यामागचे खरे कारण काय असेल तर आपण आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी केलेली छोट्या व उपयुक्त उत्पादनांची निर्मिती हे आहे. आत्मनिर्भर भारतामध्ये गरीब, शेतकरी, युवक आणि महिला हे चार आधारस्तंभ आहेत. या चारही घटकांना उद्योजकतेच्या भक्कम पायावर उभे करता आले तरच परिवर्तन शक्य आहे. त्यासाठी नवी व्यूहरचना करावी लागेल. या वर्षीच्या अर्थसंकल्पात कौशल्यविकास व युवकांच्या प्रशिक्षणासाठी केलेली तरतूद त्यामुळे विशेष महत्त्वाची आहे. सामाजिक विकासात शाश्वत उद्योजकतेचे मूल्य अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे. त्यामुळे भारताचा जीडीपी वाढून उत्तरोत्तर भारत आर्थिक विकासातील आलेखाच्या वरच्या बिंदू पर्यंत पोहोचू शकेल. प्रत्येक कुटुंब उद्योगाचा व निर्मिती प्रक्रियेचा आधार कसा बनेल यावरच भावी प्रगतीची दिशा अवलंबून असेल. या दृष्टीने शिक्षणातील गुणवत्ता, उद्योजकता प्रशिक्षण आणि उत्पादन व सेवांमधील श्रेष्ठ गुणवत्तेचे संगोपन या घटकावर विशेष लक्ष केंद्रित करावे लागेल. तसे झाले तरच आर्थिक प्रगतीचे नवयुग अवतरू शकेल.

*(या लेखाचे लेखक डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात वृत्तपत्र व जनसंवाद विभागाचे व कला विभागाचे विभागप्रमुख म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ८३२९९१६६९८ हा आहे.)*



रबर स्टॅम्प : फायदेशीर व्यवसाय

# दस्तऐवजाची विश्वासार्हता वाढवणारा व्यवसाय

**रबर स्टॅम्प बनवण्याचा व्यवसाय हा एक कायमस्वरूपी चालणारा आणि फायदेशीर व्यवसाय आहे. एखाद्या दस्तऐवजावर संस्थेचा किंवा कंपनीचा शिक्का लावल्याने त्या दस्तऐवजाचा अधिकार वाढतो. कुठल्याही प्रकारच्या संस्थेच्या कार्यक्षमतेसाठी एक प्रक्रिया तयार केली जाते आणि या प्रक्रियेत शिक्का महत्त्वाची भूमिका बजावते.**

**- प्रतिनिधी**

बँका, शाळा, महाविद्यालय, कारखाने, वेगवेगळे कार्यालय अथवा कुठलाही व्यवसाय,उद्योग यामध्ये ही वेगवेगळे विभाग असतात त्या प्रत्येक विभागाचा एक शिक्का असतो. हे आपण जाणताच. केवळ एक नाही तर अनेक प्रकारचे रबर स्टॅम्प वेगवेगळ्या विभागात वापरण्यात येतात. काही उदाहरणे डोळ्यासमोर आणा जसे की, विक्रेत्यांकडून मिळालेल्या मालावर आतील बाजूचा शिक्का मारावा लागतो. जेव्हा तुम्ही उत्पादन केलेला माल कारखान्याच्या बाहेर विक्रीसाठी पाठवता तेव्हा गेट पास आणि इतर कागदपत्रांवर मटेरियल आउटवर्ड असा शिक्का मारला जातो. अशा अनेक संस्था आहेत ज्यात प्रत्येक विभागाचा स्वतःचा शिक्का असतो जसे की Admin चा स्वतःचा शिक्का आहे, HR वेगळा आहे, Accountant वेगळा आहे, Sales Marketing वेगळा आहे आणि कंपनीचा स्वतःचा शिक्का आहे.

एखादे कार्यालय किंवा कंपनी यशस्वीपणे चालवण्यासाठी अनेक सुविधांची आवश्यकता असते जसे की पिण्याचे पाणी, चहा-कॉफी वेंडिंग मशीन, घरकामाचे साहित्य, स्टेशनरी वस्तू इ आणि कंपनीला महिन्यातून एकदा विक्रेत्यांना पैसे द्यायचे आहेत, यासाठी एक इनव्हॉइस सिस्टम तयार आहे. अशा स्थितीत शिक्का महत्त्वाचा ठरतो.

समान मानक कार्यप्रणाली इतर विभागांमध्ये देखील वापरली जाऊ शकते, ज्यामध्ये सीलची भूमिका महत्त्वाची आहे आणि जर कोणताही विभाग त्याच्या मानक कार्यप्रणालीचे पालन करत नसेल तर ऑडिटच्या वेळी त्याला जबाबदार धरले जाऊ शकते. यामुळेच कोणत्याही विशिष्ट संस्था किंवा कंपनीला नाही तर सर्व प्रकारच्या व्यावसायिक घटकांना रबर स्टॅम्पची आवश्यकता असू शकते.

**प्रशिक्षण घ्या :** रबर स्टॅम्पचा व्यवसाय सुरू करण्यापूर्वी योग्य प्रशिक्षण घेण्यावर भर द्यावा. जवळच्या रबर स्टॅम्प बनविण्याच्या दुकानास भेट देऊ शकता. व्यवसाय सुरू करताना योग्य जागेची निवड करावी. विविध संस्था, कारखाने, संस्था इत्यादींच्या कार्यालयांनी वेढलेल्या मध्यवर्ती जागा व्यवसायासाठी निवडावी. कार्यालये जास्त असेल असे ठिकाण या व्यवसायासाठी योग्य मानले जाऊ शकते.

**आवश्यक उपकरणे, कच्चा माल -** रबर स्टॅम्प बनवण्यासाठी लागणारे सर्व साहित्य किंवा उपकरणे तुमच्या परिसरातील स्थानिक बाजारपेठेत सहज उपलब्ध होतात.

**कंपोझिंग स्टिक -** हे ट्रेच्या आकाराचे साधन आहे जे रबर स्टॅम्प बनवण्यासाठी वापरले जाते. रबर स्टॅम्पवर जे शब्द किंवा अंक लावले जातात ते कंपोझिंग स्टिक या उपकरणाच्या मदतीने केले जातात.

**विविध प्रकारचे डाय -** हे साचे वेगवेगळ्या आकारात रबर स्टॅम्प बनवण्यासाठी वापरले जातात.

**स्टॅम्पिंग इंक -** शाई सारख्याच रंगाचे शब्द स्टॅम्पद्वारे मुद्रित केले जातील. तसेच प्लास्टिक आणि लाकडापासून बनवलेल्या स्टॅम्पचे हँडल. रबर शीट, लहान पाहिले, कात्री, गॅस स्टोव्ह, ड्रिल मशीन हे साहीत्य ही लागते. स्टेशनरीच्या दुकानातून कच्चा माल पॉलिमर शीट, बटर पेपर, शाई, टेप अडेसिव्ह, कात्री इत्यादी खरेदी करू शकता, याशिवाय तुम्ही Indiamart मधून मशीन आणि फोम खरेदी करू शकता. जर तुमच्याकडे लॅपटॉप आणि लेझर प्रिंटर नसेल तर तुम्ही मॅन्युफॅक्चररकडून मॅटर प्रिंट करून घेऊ शकता, यामुळे तुमची गुंतवणूक कमी होईल.

केवळ दुकानात बसून ग्राहकांची वाट पाहू नये तर ग्राहकापर्यंत पोहोचण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे लागतील. यासाठी तुम्ही वेगवेगळे सेट केल्यानंतर तुमच्या व्यवसायाच्या नावावर काही व्हिजिटिंग काड्र्स आणि वेगवेगळ्या स्टॅम्पच्या किंमती, तुम्हाला त्या भागात उपलब्ध असलेल्या कार्यालयांमध्ये जाऊन माहीती द्यावी.

आणि संबंधित विभाग सामान्यतः एखाद्या संस्थेतील प्रशासक आणि सुविधा विभाग यासारखी कामे पाहतो. अशा परिस्थितीत, तुम्हाला त्या विभागाच्या संबंधित प्रतिनिधींना भेटावे लागेल आणि त्यांच्या रबर स्टॅम्पशी संबंधित गरजा जाणून घ्याव्या लागतील.

**रबर स्टॅम्पची प्रक्रिया :** सर्वप्रथम, रबर स्टॅम्प बनवण्यासाठी जे काही शब्द वापरले जात आहेत, ते कंपोझिंग स्टँडमध्ये कंपोझिंग स्टिक अँड डायच्या मदतीने स्थापित केले जातात. ही प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, कंपोझिंग स्टँड रबर स्टॅम्पच्या बाहेर बसवलेल्या लाकडी चौकटीच्या आत पाठवले जाते आणि या प्रक्रियेच्या पुढच्या टप्प्यात, प्लास्टर ट्रेचा वापर केला जातो, ज्यामध्ये प्लास्टर ऑफ पॅरिस आणि व्हाईटिंग पावडरचे मिश्रण ठेवावे लागते. या प्रक्रियेनंतर, प्लास्टर ट्रे लाकडापासून बनवलेल्या फ्रेममध्ये ठेवावी लागेल ज्यामध्ये कंपोजिंग स्टँड सहज बसू शकेल. त्यानंतर, या प्रक्रियेत, गॅस स्टोव्हचा वापर संपूर्ण युनिट मंद आचेवर अंदाजे गरम करण्यासाठी केला जातो.

ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मिश्रणावर शब्दांचा प्रभाव सहज दिसून येतो. आता उद्योजक हे शब्द पातळ रबर शीटवर छोट्या अक्षरात सहज लिहू शकतो. त्यानंतर ही पातळ रबर शीट शब्दांनुसार कापली जाते आणि हाताने दाब दिला जातो. या प्रक्रियेनंतर रबर प्लास्टर ऑफ पॅरिसमध्ये सहज मिसळते. स्टॅम्प बनवण्यासाठी शब्द आणि अंक छापण्याचे काम पूर्ण झाल्यावर तुम्ही त्यात प्लास्टिक किंवा लाकडापासून बनवलेले हँडल सहज जोडू शकता.

**मशीन रबर स्टॅम्प :** कुठल्याही कंपनीचे रबर स्टॅम्प मशीन घेतल्यास डेमो पूर्ण दिला जातो. माहिती पुस्तिकाही त्यात असते.त्यामुळे अडचण येत नाही तरी मशीनच्या साह्याने रबर स्टॅम्प तयार करताना काही जुजबी माहीती आवश्यक आहे. ॲमेझॉन, इंडिया मार्ट, फ्लीप कार्ड, जस्ट डायल, अली बाबा आदी संकेत स्थळावरही रबर स्टॅम्प मशीनची माहीती मिळते. मशीन खरेदी करता येते.

सर्व प्रथम तुम्ही संगणकाच्या कोरल ड्रॉमध्ये स्टॅम्पची डिझाइन करा. त्यातील ग्राहक एक डिझाईन निवडतो. नंतर बटर पेपर लेझर प्रिंटरमध्ये ठेवला जातो आणि डिझाइन प्रिंट केले जाते. डिझाईन प्रिंट केल्यानंतर प्रिंट केलेल्या सर्व डिझाईन्स कात्रीच्या मदतीने कापल्या जातात यानंतर डिझाईन आकाराचे पॉलिमर शीट किंवा ओएचपी शीट आणि फोम कापला जातो. यानंतर बटर पेपर प्रथम टेबलवर ठेवला जातो नंतर बटर पेपरच्या वर एक ओएचपी शीट ठेवली जाते नंतर त्यांच्यावर फोम ठेवला जातो व त्यात नंतर हे सर्व टेपच्या मदतीने चिटकवले जाते यानंतर फ्लॅश स्टॅम्प मशीन इलेक्ट्रिक बोर्डमध्ये जोडले जाते आणि मशीन चालू केले जाते. मशीन चालू केल्यानंतर लाल पिवळा आणि हिरवा तीन प्रकारचे सिग्नल आपल्याला दिसतात.

मशीनचा हिरवा लाईट लागल्यानंतर मशीनवरील झाकण उघडून ओएचपी शीट, बटर पेपर, टेपने पेस्ट केलेला फोम मशीनमध्ये बसवलेल्या काचेवर उलटा ठेवला जातो आणि झाकण बंद करा यानंतर हिरव्या दिव्याच्या उजव्या बाजूला लाल बटन दाबा आणि सोडा नंतर झाकून उघडा आणि फोन बाहेर काढा बाहेर काढल्यानंतर प्रथम टीप काढा नंतर फोममधून ओएचपी सीट आणि बटर पेपर वेगळा करा. फोमवर डिझाईनची छाप आली आहे असे दिसेल. त्यानंतर फोम शाईत बुडवून घ्या साधारण अर्धा तास बुडवून ठेवल्यानंतर शाईतून फोम काढा स्क्रॅप पेपरने फोम वरील शाई पुसून टाकानंतर मागील बाजूस चीटकवा आणि फोम प्लास्टिक किंवा लाकडी शिक्क्यांवर चिटकवा.

**रबर स्टॅम्पची व्यवसायाची गुंतवणुक :** रबर स्टॅम्प व्यवसाय सुरू करण्यापूर्वी, उद्योजकाने सर्व प्रकारचे रबर स्टॅम्प बनविण्याची प्रक्रिया व्यावहारिकरित्या शिकणे खूप महत्त्वाचे आहे. रबर स्टॅम्पची व्यवसाय ३० हजार ते ३५ हजारांच्या गुंतवणुकीसह सहज सुरू करता येतो आणि जर हा व्यवसाय चांगल्या ठिकाणी असेल तर तो तुम्हाला एका महिन्यात १५ ते १७ हजारांचा नफा मिळवून देऊ शकतो.एक स्टॅम्प तयार करताना साधारण ५० रुपये खर्च येतो व हा स्टॅम्प १०० रुपयांच्या पुढे विकला जातो.

**चौकट**

इंडस्ट्रीज असोसिएशन (एआयआरआयए) या संस्थेच्या सहकार्याने स्थापन झालेला रबर टेक्नॉलॉजी हा अभ्यासक्रम पश्चिम महाराष्ट्रात चालवला जातो. १२वी विज्ञान (गणित, रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र विषय आवश्यक) शाखेनंतरील अभ्यासक्रम मुंबईच्या शासकीय तंत्रनिकेतन, वांद्रे इथे सुरू करण्यात आला आहे. १०० टक्के प्लेसमेंट हे या त्याचं वैशिष्ट्य आहे. १२ वी विज्ञानशाखेतील गुणांनुसारच या अभ्यासक्रमाला प्रवेश दिला जातो. अभियांत्रिकी पदविकाधारकसुद्धा या अभ्यासक्रमास पात्र आहेत.हा अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी रबर उद्योगामध्ये क्वालिटी कंट्रोल, उत्पादनक्षेत्र, मार्केटिंग या क्षेत्रांत काम करू शकतात. उत्पादक तंत्रज्ञानाची समज हा रबर उद्योगाचा मूलभूत पाया आहे, या अनुषंगाने विविध उपकरणे, उत्पादन सामग्री, कच्च्या मालाची निवड या सर्व अंगांचे ज्ञान या अभ्यासक्रमांत विद्यार्थ्यांना शिकवले जाते. मूलभूत विज्ञान, मानवता विज्ञान, अभियांत्रिकी विषयसुद्धा येथे शिकवले जातात. त्यासाठी लागणारी अद्ययावत उपकरणं व प्रयोगशाळा शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई येथे उपलब्ध आहेत. हा अभ्यासक्रम ६० टक्के गुणांसह मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्लास्टिक/पॉलिमर अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळवण्यास पात्र ठरतात. उत्तीर्ण विद्यार्थ्यास ऑल इंडिया रबर इंडस्ट्रिज असोसिएशनच्या सभासद उद्योजकांच्या उद्योगात संधी दिली जाते. हा अभ्यासक्रम बारावीनंतर अडीच वर्षांचा असून, शेवटचे सहा महिने विद्यार्थ्यास रबर क्षेत्रात प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी पाठवलं जाते. यामुळे प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेऊनच विद्यार्थी सरकारी तंत्रनिकेतनमधून बाहेर पडतात.टायर उत्पादने, पादत्राणे, मोटार उद्योग, भारतीय रेल्वे, औषध उद्योग यासाठी लागणाऱ्या विविध रबर उत्पादनांच्या क्षेत्रात पदविकाधारकांना नोकरी मिळू शकते. ■■



पर्यावरणपूरक वाण

# रंगीत कापसाची शेती

**आज कापसाचा बदललेला रंग हा महाराष्ट्रात चर्चेचा विषय झालेला आहे. कृषी क्षेत्रावर आधारित काही उद्योग जर आपण करत असाल, तर पांढऱ्या रंगाच्या कापसाशिवाय बदललेल्या रंगाच्या कापसाची लागवड करूनही एक नवीन कृषी उद्योगाचा विचार आपण करू शकता. येणाऱ्या काळामध्ये निश्चितच याला चांगली मागणी राहील. रंगीत कापसाच्या प्रयोगात यशस्वीपणे कार्यरत असणाऱ्या श्रीकांत अमरशेट्टीवार यांची झेप दखलपात्र आहे.**

**- श्याम हेडाऊ**



**श्रीकांत अमरशेट्टीवार**
एकार्जुना कृषी संशोधन प्रकल्प
प्रभारी अधिकारी

चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यात एका शिक्षकाच्या घरी जन्माला येऊन स्वतःच्या शैक्षणिक गुणवत्तेवर एकाहून एक असे यश गाठणारे आणि आपल्या शैक्षणिक गुणवत्तेच्या बळावर येथील शेतकरी वर्गासाठी अविश्रांत मेहनत घेणारे एकार्जुना कृषी संशोधन प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी श्रीकांत अमरशेट्टीवार. आपल्या शैक्षणिक प्रगतीतून त्यांनी स्थानिक भागातच नव्हे तर महाराष्ट्रातील शेतकरी वर्गासाठी, आपल्या कृषी विभागातील अधिनस्त अधिकारी व कर्मचारी वर्गासाठी सातत्याने विविध असे नवनवीन प्रशिक्षण राबवून आपल्या नौकरीच्या काळात कृषी विकासासाठी अतुलनीय असे योगदान दिले आहे.

आपले शालेय शिक्षण नागभीड येथे तर कृषी महाविद्यालय, नागपूर येथे पदवीचे शिक्षण घेतल्यानंतर अमरशेट्टीवार यांनी पदव्युत्तर शिक्षणासाठी अकोला येथील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथे प्रवेश घेतला. पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर त्यांनी कृषी वनस्पती शास्त्र (Agriculture Botny) या विषयात आचार्य पदवी (Ph. D.) प्राप्त केली.

जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत पंचायत समिती, सिरोंचा येथे ते १९९२ मध्ये पहिल्यांदा ग्राम विकास अधिकारी पदावर रुजू झाले. आपल्या कार्यकुशल पद्धतीमुळे श्रीकांत अमरशेट्टीवार यांनी अल्पावधीतच ग्राम अभियानांतर्गत तालुकास्तरीय पुरस्कारही मिळविला. इथून सुरू झालेला हा प्रवास पुढेही असाच सुरू आहे.

भारत हा कृषिप्रधान देश असून या कृषिप्रधान देशांमध्ये जोपर्यंत शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने विकास होत नाही. तोपर्यंत या देशाचा योग्य तो विकास होऊ शकत नाही आणि म्हणून शेतकऱ्यांच्या जीवनात एक आमूलाग्र क्रांती होणे हे अतिशय आवश्यक आहे. हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून चंद्रपूर जिल्ह्यामध्ये वरोरा तालुक्यातील एकार्जुना कृषी संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी तथा प्रकल्प प्रमुख श्रीकांत अमरशेट्टीवार यांनी आपले शासकीय कर्तव्य बजावत असतानाच त्यांच्या आतापर्यंतच्या कार्यकाळात तब्बल सहा कोटी ५९ लाख रुपयांचे कृषीशी संबंधित संशोधन आणि विस्ताराच्या दृष्टिकोनातून असलेले विविध असे प्रकल्प राज्यशासन व केंद्र शासनाच्या वतीने मंजूर करून घेतलेले आहेत. आपल्या नोकरीच्या कालावधीत आलेल्या अनुभवातून आणि स्वतः केलेल्या अध्ययनातून त्यांनी शेतीशी संबंधित दोन पुस्तक प्रकाशित केलेली असून 'कपाशीवरील ताण सहन करणाऱ्या वाणांचे जीवनचक्र' व 'धानावरील उत्पादनाचे तंत्रज्ञान' अशी दोन पुस्तके आज शेतकरी आणि अभ्यासकांच्या उपयोगात येत आहेत. याशिवाय गुजरात येथील नवसारी मध्ये आयोजित राष्ट्रीय परिषदेत पेपर सादर करून बेस्ट पेपर प्रेझेंटेशन अवार्डने सुद्धा त्यांना सन्मानित करण्यात

आले आहे. कृषी क्षेत्रात कापसाच्या लागवडीमध्ये अमूलाग्र परिवर्तन करत असतानाच कापसाच्या वैदेही, CNH १७३९५, CNA १७५५२ या कपाशीच्या तीन नवीन वाणांची लागवड एकार्जुना येथील कृषी संशोधन केंद्रात करून रंगीत कापसाचे उत्पादन केले व त्याच्या प्रचार आणि प्रसाराबद्दल जनजागृती सुद्धा त्यांनी करून आपल्या एकूणच शासकीय नोकरीच्या कार्यकाळात कृषीशी संबंधित एक अतुलनीय असं योगदान दिलेलं आहे.

आजवर कृषीशी संबंधित तब्बल ३७ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर शोधनिबंध श्रीकांत अमरशेट्टीवार यांनी सादर केले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन विद्यार्थी आचार्य पदवीने सन्मानित झाले आहेत, तर दोन विद्यार्थ्यांचे संशोधन सुरू आहे.

वनस्पती शरीरक्रियाशास्त्र या विषयात M.Sc, तर कपाशीवरील पाण्याचा ताण सहन करणाऱ्या वाणांच्या तपासासाठी या विषयावरील शोधप्रबंध सादर करून त्यांनी आचार्य पदवी (Ph. D.) प्राप्त केली आहे.

पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत विभागीय कृषी संशोधन केंद्र, सिंदेवाही येथे १९९९ ला साहाय्यक प्राध्यापक म्हणून त्यांनी कार्य केले असून, कृषी महाविद्यालय गडचिरोली येथे सहयोगी अधिष्ठाता या पदावर चार वर्षे तर आनंदनिकेतन कृषी महाविद्यालय आनंदवन येथे दीड वर्ष प्रतीनियुक्तीवर प्रभारी प्राचार्य म्हणूनही कार्य केलं आहे. त्यांनी धानाच्या तीन वाणनिर्मितीमध्ये सहभाग नोंदविला आहे. शिवाय विद्यापीठाला कपाशीच्या दोन संशोधनाच्या शिफारसीही श्रीकांत अमरशेट्टीवर यांनी केलेल्या आहेत. शासकीय नोकरीवर कार्य करीत असताना आपल्या वैविध्यपूर्ण अभ्यासातून आपल्या पदाला न्याय देत शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये एक नवीन उषःकाल निर्माण करण्यासाठी सातत्याने धडपड करणाऱ्या, उपक्रमशील अशा या अधिकाऱ्याला त्यांनी कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल आधुनिक केसरीद्वारे नुकताच 'महाराष्ट्र आयडॉल' पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

एका सामान्य कुटुंबात जन्माला येऊन आपलं पदव्युत्तर पदवी आणि आचार्य पदवीपर्यंतचे शिक्षण घेत असतानाच व स्वतःची नोकरी करत असताना सुद्धा प्राध्यापक अमरशेट्टीवार हे शांत बसले नाहीत, तर त्यांनी कपाशीच्या नवीन वाणाचा शोध लावला आणि एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर, त्यात त्यांनी यश मिळवलं. येथे त्यांनी कापसाचा पांढरा रंग सगळ्यांना माहीत असताना करड्या रंगाच्या कापसाची लागवड केली आणि एवढेच नव्हे तर या करड्या रंगाच्या कापसाची लागवड केल्यानंतर त्यांना आलेले यश पाहून परिसरातील शेतकऱ्यांना, आपल्या विभागातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना सुद्धा त्यांनी या संदर्भात प्रशिक्षण देऊन करडा रंगाचा कापसासाठी लागवड करण्याचे आवाहन केले आहे. खरं तर कापसाचा बदललेला रंग पाहण्यासाठी अनेक लोक वरोरा तालुक्यातील एकार्जुना कृषी केंद्राला भेट देत होते आणि श्रीकांत अमरशेट्टीवार हे आलेल्या प्रत्येकाला या संदर्भात योग्य ते मार्गदर्शन करत होते. त्यांचा हा प्रवास निश्चितच साधा, सरळ,सोपा नव्हता; पण आलेल्या आलेल्या आव्हानांना त्यांनी समर्थपणे तोंड दिले आणि हळूहळू करत त्यांना यश मिळत गेलं. आज कापसाचा बदललेला रंग हा महाराष्ट्रात चर्चेचा विषय झालेला आहे मित्रांनो. उद्योगाच्या क्षेत्रात जात असतानाच कृषी क्षेत्रावर आधारित काही उद्योग जर आपण करत असाल तर आपण सुद्धा बदललेल्या रंगाच्या कापसाची लागवड करूनही एक नवीन उद्योग कृषीच्या माध्यमातून करू शकता ज्याला येणाऱ्या काळामध्ये निश्चितच चांगली मागणी राहील. या संदर्भात आपणास काही मार्गदर्शन हवे असल्यास आपण शिकांत अमरशेट्टीवार यांना एकार्जुना कृषी संशोधन केंद्र, तह. वरोरा, जिल्हा चंद्रपूर येथे संपर्क करू शकता.


भारत हा कृषिप्रधान देश असल्याने येणाऱ्या काळात विकसित भारताच्या दिशेने जेव्हा भारत झेपावतोय तेव्हा आपणही उद्योजक म्हणून कृषिशी संबंधित उद्योगांवर लक्ष केंद्रित केल्यास येणारा काळ हा आपल्यासाठी सुद्धा आपल्याला विकासाच्या दिशेने नेणारा ठरेल यात शंकाच नाही.

*(या लेखाचे लेखक हे स्वतः गेल्या २५ वर्षांपासून एक मोटिव्हेशनल ट्रेनर, व्यवसायिक निवेदक तथा समुपदेशक आहेत. त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ९८३४३०१५६८ हा आहे.)*




*मा.श्री.राहुल गुप्ता, भा.प्र.से., सह व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उद्योजक मासिक भेट देताना श्री. संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक व उद्योजक विभाग प्रमुख दिसत आहेत. यावेळी एमसीईडी व उद्योजक मासिकाबद्दल माहिती देण्यात येऊन मार्गदर्शन घेण्यात आले.*





## कमी भांडवलात अधिक मोबदला

# मशरूम उत्पादनाद्वारे अर्थार्जनाचा मार्ग

**मशरूमबद्दल समाजात अनेक समज-गैरसमज असले तरी मशरूम हे आरोग्यदृष्ट्या बहुगुणी आहे. त्यांचे विविध स्वादिष्ट खाद्यपदार्थ करता येतात. विशेष म्हणजे मशरूम शेती हा अर्थार्जनाचा उत्तम मार्ग आहे. पुण्यातील तृप्ती भूषण धकाते यांनी मशरूम उत्पादनात आपला आगळा ठसा उमटवला आहे. स्वतः अभ्यास, संशोधन करून अलीकडेच नरसापूरजवळ भोर उंबरे येथे मोठ्या स्वरूपात त्यांनी प्रकल्प उभारला आहे.**

**- धनश्री हुडेकर**

तृप्ती यांच्या घरातील वातावरण शेतीपूरक होते. त्यामुळे तृप्ती यांनीही शिक्षणासाठी कृषी संबंधित विषयांची निवड केली. एम. एस्सी. बॉटनी आणि एम. एस्सी. बायोटेक्नॉलॉजीत सुवर्णपदकांसह सेट, नेट उत्तीर्ण असलेल्या तृप्ती यांनी पुढे उच्चशिक्षण पूर्ण करून नोकरीही करण्यास सुरुवात केली; पण सतत त्याच्या मनात काहीतरी वेगळ करण्याची इच्छा होती.

**पांरपरिक विचाराला छेद :** उच्चशिक्षित व्यक्तीने हा योग्य पदावर नोकरी करावी अशी संकल्पना समाजात असते. त्यात कुटुंबामध्ये कुणीही व्यवसायिक नव्हते, त्यामुळे व्यवसायाबद्दलचा फारसा अनुभव तृप्ती यांच्याकडे नव्हता; पण काहीतरी युनिक कॉलिटी आपल्याकडे आहे याची मात्र खात्री होती. चांगल्या पदावरची नोकरी मिळाली आहे त्यात प्रगती कर अशी कुजबुज सुरुवातीला झाली; परंतु माहेर आणि सासर या दोन्ही बाजूनेही त्यांना सबळ पाठिंबा मिळाला. याच पाठिंब्यावर लग्नानंतर मशरूम उत्पादनात तृप्ती उतरल्या.

**मशरूमवर प्रयोग :** शिक्षण घेत असतानांच तृप्ती यांना मशरूम विषयी रुची निर्माण झाली होती तसेच कृषी जैवतंत्रज्ञान संशोधन संस्था संभाजीनगर येथे डॉ. मुकादम यांच्या मार्गदर्शनाने लेक्चररशिप करत असताना मशरूमवर तृप्ती यांनी वेगवेगळे प्रयोग करून बघितले व मशरूमवर अभ्यास केला व प्रत्येक मशरूमनुसार त्याला लागणारे वातावरण, वाढीचे टप्पे, वाढीसाठी लागणारी आद्रता, हवी असणारी ट्रीटमेंट या सर्वांची माहिती घेत असताना मशरूम उत्पादनाचा व्यवसाय मनात तक धरून होता.

**आकारास आला व्यवसाय :** लग्नानंतर पतीसह पुण्यात तृप्तीचे वास्तव्य होते. याठिकाणी मशरूम उत्पादन व्यवसायात बराच वाव मिळेल असे त्यांना वाटत होते म्हणून मशरूम विक्रीचा अभ्यास करत हळूहळू व्यवसायास सुरुवात त्यांनी केली. पतीची ही भक्कम साथ होती. मशरूम उत्पादनात चांगला अभ्यास असला तरी त्याची मार्केटिंग करणे ही जोखमीचे होते, त्याचे कारण म्हणजे लोकांमध्ये मशरूम विषयी असलेले समज व गैरसमज होय. वेगवेगळ्या भागात मशरूमला कावळ्याची छत्री, कुत्र्याची छत्री असे वेगवेगळे नाव ठेवले जातात. आठवडी बाजारामध्ये जाऊन तृप्ती यांनी लोकांना मशरूमविषयी माहिती दिली. मशरूमचे भाजी सूप असे वेगवेगळे प्रकार लोकांना चाखण्यासाठी दिले जेणेकरून त्यांना चव माहिती होईल, त्यातही सरळ कोणाला मशरूमची भाजी देणे शक्य नव्हते म्हणून वडापावचा स्टॉल चालू केला व त्याबरोबर मशरूमची भाजी किंवा चटणी देखील आवर्जून तृप्ती देत असे. आणि जमतील तसे मशरूम ही काही प्रमाणात तृप्ती यांनी ग्राहकांना मोफत दिले.

त्यामध्ये असलेल्या जीवनसत्वाविषयी माहिती दिली. यांचा परिणाम असा झाला की हळूहळू मशरूम विकण्यास प्रारंभ झाला. बाजारात भाज्या घेऊन बसत असलेल्या लोकांना तृप्ती यांनी मशरूमचे पॅक नेऊन दिले. हळूहळू उत्पादन वाढू लागले. असे करत मशरूम विक्रीस गती मिळाली. त्यानंतर मोठे मोठे कॉन्टॅक्ट्स मिळाले जसे की लग्न, मुंज, पार्टी यासाठी मशरूमची मागणी वाढली. गावोगाव मशरूम पोहोचले आहे.

**वेस्ट एग्रीकल्चर प्रोडक्ट :** मशरूम तयार झाल्यानंतर राहिलेले वेस्ट एग्रीकल्चर प्रोडक्ट म्हणजे वापरलेला भुसा हा गांडूळ खत तयार करण्यासाठी वापरण्यात येतो. त्यातून गांडूळ खत, व्हर्मी वॉशचे उत्पादन मिळते. त्याही व्यवसायात योग्य तो परतावा मिळतो आणि उरलेले मटेरियल वायाही जात नाही. कोणत्याही प्रकारची औषधी किंवा फवारणी न वापरता म्हणजेच ऑर्गनिक पद्धतीचा वापर तृप्ती करतात. पर्यायी ऑर्गनिक मशरूमची मागणी जागतिक बाजापेठेत मोठ्या प्रमाणात आहे.

**वर्कशॉपद्वारे ट्रेनिंग :** मशरूममध्ये उत्पादन घेण्यासाठी रुची असलेल्या व्यक्तींना तृप्ती या वर्कशॉप द्वारे ट्रेनिंग देतात त्यामध्ये मशरूम उत्पादन मशरूमचे बाय प्रोडक्ट्स आणि वर्मी कंपोस्ट हे सर्व विषय शिकवले जातात. त्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणाहून आलेले लोक संपर्कात येऊन पुढे तशा ऑर्डरही मिळतात व व्यवसायाची व्याप्ती वाढविण्यास मदत होते असे तृप्ती सांगतात. विविध महाविद्यालयात तृप्ती गेस्ट लेक्चर घेऊन मशरूम बद्दल सविस्तर माहिती देतात त्यामुळे तरून वर्ग नव्या दृष्टीने मशरूम कडे पाहत आहेत. तसेच शहरी भागातील लोकांना विशेष रुची निर्माण झाली आहे, आरोग्य विषयी जागृत असलेल्या लोकांसाठी हे एक वरदान ठरले आहे. म्हणून मशरूम आणि त्याचे विविध पदार्थांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. त्याप्रमाणे मी लोकांची मशरूमची मागणी पूर्ण करू शकत आहे. थोडक्यात म्हणजे कोणत्याही व्यवसायात सुरुवातीचा काळ हा जोखीमेचा असतो. त्यात डगमगून न जाता सतत कार्य करावे व वेगवेगळ्या पद्धतीचा वापर करावा लागतो म्हणजे यश नक्की मिळते असे तृप्ती सांगतात.

**मशरूम शाकाहारी पदार्थ :** मशरूम हा पूर्णपणे शाकाहारी पदार्थ आहे. ती एक प्रकारची उपयोगी बुरशी आहे. कुठलाही संकोच न बाळगता शाकाहारी लोकांनी आहारामध्ये मशरूमचा वापर सर्रास करायला हरकत नाही. शुगर, ब्लड प्रेशर, थायरॉईड यासारख्या आजारावर मशरूम अतिशय गुणकारी आहे. हाडांचा मजबूतपणा टिकवून ठेवण्यासाठी मशरूम अत्यंत उपयोगी आहे कारण त्यामध्ये विटामिन डी, कॅलरीज जीवनसत्व आढळते. मशरूम रोगप्रतिकारक क्षमता वाढते. वजन मर्यादित ठेवते. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांना मशरूम खाणे योग्य ठरते. पूर्वीचे लोक मशरूमला संजीवनी म्हणत असत आणि आयुर्वेदामध्येही त्याचे महत्त्व विशद केले आहे.

**व्यवसायातील सातत्य :** तृप्ती यांनी १ लाख रुपये गुंतवणूक करून मशरूम उत्पादन व्यवसायास सुरुवात केली. एक ते दीड लाखापासून झालेल्या व्यवसायाची व्याप्ती आज रोजी दहा ते बारा लाखापर्यंत झाली आहे. मशरूम उत्पादन आणि वर्मी कंपोस्ट यातील महिन्याकाठीची निव्वळ मिळकत ही दीड ते दोन लाखाची आहे. व्यवसायात ठेवलेल्या सातत्याने हे यश मिळाल्याचे त्या नमुद करतात.

मशरूम उत्पादन घेत असताना त्यामध्ये ऑईस्टर मशरूम आणि मिल्की मशरूम असे मागणीप्रमाणे वेगवेगळे उत्पादन त्या घेतात. शिवाय मशरूम उत्पादनासाठी लागणारा कच्चामाल हा सहजरित्या मुबलक प्रमाणात मिळतो. जसे की गव्हाचा कडबा, सोयाबीनचा भुसा, तांदळाचा कडबा. म्हणजेच कच्चामाला साठी लागणारा खर्च हा प्रमाणात आहे.

या व्यवसायामध्ये मशरूमची फक्त भाजी म्हणूनच विक्री करत नसून त्यापासून होणारे बाय प्रोडक्ट्स सुद्धा त्या लोकांना शिकवतात जेणेकरून वेगवेगळ्या पद्धतीने मशरूम खाण्यात यावे आणि तसा मशरूम चा गुणधर्मही आहे. मशरूमची पावडर, मशरूम सूप, मशरूम कुकीज, मशरूम भाजी, मशरूम पापड असे वेगवेगळे प्रोडक्ट्स आपण त्यापासून बनवू शकतो. शिवाय मानवी शरीरावर त्याचे कोणते साईड इफेक्ट्स सुद्धा नाही.

**मशरूम टिकवणे आव्हानात्मक :** सहसा मशरूम हा प्रकार जास्त काळ न टिकणारा असल्यामुळे यामध्ये मशरूम टिकवणे हे चॅलेंजिंग आहे. त्यावर पर्याय म्हणून आपण ड्राय मशरूमचे पॅकिंग करून काही काळासाठी साठवून विक्री करू शकतो. ड्राय मशरूम वीस मिनिट गरम पाण्यामध्ये ठेवल्यानंतर ताज्या मशरूम प्रमाणे खाण्यास योग्य होतात. तसेच मशरूम सूप हे देखील झटपट होणारे पेय आहे जे की आरोग्यास लाभदायक आहे. कॅलरी, चरबी, पोटॅशियम, कार्बोहायड्रेट, फायबर, प्रथिने, विटामिन, आयर्न, मॅग्नेशियम या पोषख तत्वांचा यात समावेश असतो.

**रोजगारनिर्मिती :** सुरुवातीचा काळात मशरूम उत्पादन घेत असताना तृप्ती यांनी कुठल्याही व्यकतीची मदत न घेता काम सुरू केले. पुढे काम वाढल्यानंतर मशरूम उत्पादनात चार आणि मशरूमची निगा राखण्यासाठी दोन, मशरूम ऑर्डर घेण्यासाठी एक आणि प्रॉडक्ट डिलिव्हरी करण्यासाठी एक या पद्धताने आठ जणांना रोजगार मिळवून दि ा.

**पुरस्कारांची थाप :** तृप्ती यांचे पुणे, मुंबई शिवाय मशरूम व मशरूमचे प्रोडक्ट्स हे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये विक्री होत आहे. तृप्ती यांना आयकॉन ऑफ भारत-एनडीटीवी न्यूज चैनल दिल्ली, मशरूम समिट - दिल्ली, दुर्गा स्त्री शक्ती संघटना, मी सक्षम - स्केलेटन फाउंडेशन, नारीशक्ती अवॉर्ड - एशियन कॉल, पुण्यनगरी दैनिकाने पुरस्काराने गौरविले आहे.

*(या लेखाच्या लेखिका एमसीडी मुख्यालय येथील समन्वय विभागात सहाय्यक (से.पू.) म्हणून कार्यरत असून कृषी क्षेत्रातील संशोधनाचा त्यांना अनुभव आहे.)*






## यशोगाथा - मयुर रत्नपारखी

# हॉटेल व्यवसायातून गवसला प्रगतीचा रूचकर मार्ग

**खाद्यपदार्थांशी संबंधित व्यवसाय तसा मोठा जोखमीचा. ग्राहकांना आवडेल अशीच चव द्यावी लागते. त्यात सातत्य बाळगावे लागते. स्वच्छता, सेवा हे तर गरजेचेच आहे. यामुळेच बहुतांशी व्यावसायिक एखाद्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे फ्रँचायझी घेऊन मोकळे होतात; परंतु छत्रपती संभाजीनगरातील मयुर रत्नपारखी यांनी स्वतःच्या खाद्यपदार्थाच्या आऊटलेट्सची एक साखळी तयार केली आहे. छत्रपती संभाजीनगरात सुरू झालेल्या या आऊटलेटचे अल्पावधीतच पुणे, मुंबई आणि नांदेडसह राज्यातील ८ ते १० शहरात विस्तार झाला आहे. यातून संभाजीनगरचा ब्रँड राज्यात पोहोचला आहे, तर अनेकांना याद्वारे रोजगारही मिळाला आहे. - सौरभ भरत सदावर्ते**

'साहसे श्री प्रतिवसति असे म्हणतात, अर्थात जो धाडसाने निर्णय घेतो आणि ते अंमलात आणतो, त्याला 'श्री' म्हणजे पैसा आणि यश मिळते. याच उक्तीला थोडेसे बदलून 'उद्यमे श्री प्रतिवसति' असेही म्हटले जाते. म्हणजे जो सतत कामात असतो, कष्ट करतो त्याला 'श्री म्हणजे पैसा आणि यश मिळते.

या दोन्ही उक्ती सार्थ ठरवत स्वतःबरोबर इतरांनाही यशस्वी उद्योजक करण्याचा ध्यास घेणारा 'मयुर माणिक रत्नपारखी हा केवळ ३२ वर्षांचा उमदा तरुण अनेकांसाठी प्रेरणादायी ठरतो आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये राहणारे मयुर रत्नपारखी एक यशस्वी उद्योजक आहेत. स्वतःची एक स्वतंत्र ओळख आणि फूड इंडस्ट्रीत एक स्थान निर्माण करणारे मयुर रत्नपारखी, खरे तर एक इलेक्ट्रॉनिक्स इंजिनीअर आहेत. शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी नात्यातल्याच एका व्यक्तीच्या उद्योगात काम केले. तिथे व्यवसाय क्षेत्राची माहिती घेतली.

नोकरीपेक्षा व्यवसायात मन जास्त रमते, म्हणून स्वतःच्या ज्ञानाला अनुभव, निरीक्षण आणि एका ध्यासाची जोड देत आपला धाकटा भाऊ शुभम रत्नपारखी सोबत 'दालचिनी' नावाचे रेस्टॉरंट 'शहरातील खडकेश्वर भागात २०१८ मध्ये सुरू केले. एक रेडी सेटअप असलेली जागा भाड्याने घेऊन हे रेस्टॉरंट सुरू झाले. उत्तम गुणवत्ता आणि विनम्र सेवा हे त्याने जणू आपले ब्रीदवाक्यच ठेवल्याने व्यवसाय चांगला चालू लागला. मग शहरातील दुसऱ्या भागात कॅनॉट भागात बच्चनस् किचन हा एक थीम कॅफे २०२० मध्ये सुरू केला. एक एक गोष्ट शिकत, माणसांची पारख करायला शिकत, व्यवसायतले खाचखळगे ओळखत, अनुभव घेत प्रवास सुरू झाला.

पण कोरोना नावाचा राक्षस आला आणि सगळे गिळंकृत करू लागला, त्यात या दोन्ही व्यवसायांची मोठी हानी झाली. मात्र, डोक्याला हात लावून बसेल तो खरा बिझिनेसमॅन कसला; चिंता करत बसण्याइतका सुद्धा वेळ घालवायचा नाही, काम करायचे हा त्यांचा स्वभाव!

कोरोनाला त्यांनी व्यवसायातील इष्टापत्ती समजले आणि रुग्णांना दर्जेदार, वैविध्यपूर्ण आणि अगदी परवडणारे जेवण घरपोच पुरवणे सुरू केले. हजारो थाळया वेळेत पोहोचवून त्यांनी व्यवसाया सोबत

सेवाही साधली. नंतर ऑनलाइन ऑर्डर्स घेऊन पदार्थ पुरवण्याचा व्यवसाय सुरू केला आणि दिवान ए बिर्याणी ही अनोखी कल्पना राबवून व्हेज आणि नॉन व्हेज बिर्याणीचे परिपूर्ण पॅक तयार करून पोचवणे सुरू केले. यात बिर्याणीसोबत रायता, गुलाबजाम, पाण्याची बाटली आणि अगदी मुखवास, चमचा, पेपर नॅपकिन अशा सर्व गोष्टी द्यायला सुरुवात केली. हा व्यवसाय यशस्वी झाला तो चविष्ट पदार्थ, गुणवत्ता, सोयीस्कर तरीही परवडेल असा पोटभरीचा पॅक दिल्याने, ज्यात २६ हजारांहून पॅक आतापर्यंत विकले आहेत.

क्लाऊड किचन ही संकल्पना शहरात चांगलीच रूजू लागली होती, त्याचा विचार करून नवीन व्यवसाय सुरू करण्याचे मयुरने ठरवले. त्यात फ्रोजन फूडचाही व्यवसाय सुरू केला आहे. एकूण १५ ब्रँड विकसित करून हा व्यवसाय बहरला आहे. हे सगळे सांभाळण्यात आणि चालवण्यात भाऊ शुभम रत्नपारखी यांचा सहभाग कायम आहे.

सुतगिरणी चौकात पेनल्टी बॉक्सशेजारी अनामृता फूड्स हे मल्टिकुझिन क्लाऊड किचन आणि 'बेला विटा' हा कॅफे त्यांनी सुमारे साडेतीन वर्षांपूर्वी सुरू केले आहे. त्यात मयुर यांची पत्नी ऋतुजा आणि भाऊ शुभम यांचा सक्रीय सहभाग आहे. त्याचबरोबर आता काही दिवसांपूर्वीच शहरातील क्रांती चौक भागात परिक्रमा नावाचे एक प्रशस्त रेस्टॉरंट सुरू केले आहे.

ऑनलाइन ऑर्डर्स घेऊन पदार्थ पोचवणे हे क्लाऊड किचनचे काम आहे. त्यांचा कॅफे हा इटालियन कुझिनची मजा देणारा आहे. राईस बोल हा प्रकार ज्यात अर्धा भाग राईस आणि अर्धा भाग ग्रेव्ही असणारी भाजी, दाल असते, असे पोटभरीचे कॉम्बो फूड पॅक देणे ही संकल्पना त्यांनी शहरात आणली. इंडियन, चायनीज, इटालियन असे सगळे पदार्थ ते पुरवतात. दादर स्टेशन वडेवाले' या स्वतः विकसित केलेल्या ब्रँडची फ्रेंचाइजी देण्याचाही त्यांचा व्यवसाय आहे, जो आता वैजापूर, लातूर, नांदेड, पुणे इथे पोहोचला आहे.

फूड बिझिनेस हा कौशल्याचा भाग आहे. त्यात जिद्द, चिकाटी आणि कष्ट याला पर्याय नाही, ग्राहकांचे समाधान, गुणवत्ता आणि सेवा या सर्वाधिक महत्त्वाच्या गोष्टी आहेत, असे मयुर रत्नपारखी सांगतात.

बेस्ट फ्रेंचायजी ऑफ द इअर, मराठवाडाज बिगेस्ट क्लाऊड किचन, बेस्ट बिझिनेसमॅन, संभाजीनगर गौरव असे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत, हीच त्यांच्या यशाची पावती आहे. सुरुवातीला दीड लाख रुपये कर्ज घेऊन सुरू केलेल्या या व्यवसायाची सध्या वार्षिक दीड कोटीची उलाढाल आहे. दोन जणांच्या मदतीने सुरू केलेला व्यवसाय आज सुमारे तीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने सुरू आहे.

सुरुवातीला व्यवसाय म्हटलं की कुटुंबाला असुरक्षितता वाटली; पण जेव्हा आपला निर्णय योग्य असल्याचे सिद्ध करून दाखवले तेव्हापासून सगळ्यांचा पाठिंबा मिळाला. आई वडील आणि प्रत्येक टप्प्यावर खिंड लढवणारा शुभम हा भाऊ तसेच ऋतुजा ही पत्नी त्यांचे आधारस्तंभ आहेत. त्यांचे मामा श्रीकांत जोशी यांच्या मार्गदर्शनाचा ते नेहमी उल्लेख करतात.

'जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे; शहाणे करून सोडावे सकळ जन' या वचनानुसार मयुर रत्नपारखी आता उद्योजक घडवण्याचा ध्यास घेऊन काम करत आहेत. त्यांच्या इन्स्टाग्राम पेजवरून नवउद्योजकांना मार्गदर्शन करणे, वेबिनार आयोजित करणे, व्याख्यान देणे अशा मार्गांनी तसेच वैयक्तिक मार्गदर्शन करत ते ५००० मराठी उद्योजक तयार करण्याच्या ध्येयपूर्तीसाठी झटत आहेत. यासंदर्भात अनेक जण सोशल मीडियावर त्यांच्याशी जोडले गेले आहेत.

*(लेखक व्यावसायिक भाषांतरकार आणि सृजनशील लेखक असून डिजिटल मीडिया क्षेत्रात कंटेंट रायटिंगही करतात. या लेखकाचा भ्रमणध्वनी ७७७६०९२९८८ आहे.)*




*मा.श्री. प्रशांत नारनवरे, भा.प्र.से., आयुक्त, महिला व बालकल्याण विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे यांना उद्योजक मासिक भेट देताना श्री.हेमंत वाघमारे, केंद्र प्रमुख, एमसीईडी उपकेंद्र, नागपूर व श्री.मदनकुमार शेळके, प्रकल्प अधिकारी, पुणे दिसत आहेत. यावेळी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम व उद्योजक मासिकाबद्दल प्रस्ताव सादर करण्यात आला.*





छोटी बचत, मोठी स्वप्ने

**भरारी**
**स्वयंसहाय्यता समूह महिला बचत गट, माण, सातारा**

# पशूआहाराची कौतुकास्पद झेप

**कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीने आपले कार्य सर्मपण भावनेने केले, तर विधायक सामाजिक परिणाम दिसतात. याचे उत्तम उदाहरण सातारा येथील माण तालुक्यातील नरवणे गावचे आहे. गावातील शेतकरी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम यामार्फत झाले. भरारी स्वयंसहाय्यता समूह महिला बचत गटाने केमिकलविरहीत भरारी पशुखाद्याची निर्मिती करत दखलपात्र कामगिरी केली आहे.**

**- डॉ. आरतीश्यामल जोशी**

सातारा येथील माण तालुक्यातील नरवणे हे गाव एका सांस्कृतिक वैशिष्ट्यामुळे कायम चर्चेत राहते. आज अनेक गावांमध्ये एक गाव एक गणपती संकल्पना राबविली जात आहे. संपूर्ण गावात सर्वांचा मिळून एकच गणपती स्थापन केला जातो; परंतु नरवणे गावात गेल्या १६५ वर्षापासून 'एक गाव एक गणपती' ही संकल्पना राबविली जाते. शिवाय गावच्या मातीचाच गणपती येथील कुंभार समाजाचे लोक करतात. पर्यावरणाच्या दृष्टीने ही बाब महत्त्वपूर्ण आहे. गावात दहा दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जाते. अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. गणेशोत्सवात जमा झालेल्या वर्गणीमधून गावाच्या विकासासाठी काही कामे केली जातात. स्वातंत्र्यापूर्वीपासून 'एक गाव एक गणपती' ही परंपरा नरवणे गावात राबविली जात आहे. यामुळे हे गाव आपल्या वेगळेपणामुळे लक्षात राहते.

**संवादातून बचतगटाकडे :** माण तालुक्यातील नरवणे हे दुष्काळी गाव आहे. या गावात जलसंधारणाची कामे झाल्याने काही प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्यावर दोन हंगामात पिके घेता येतात. भरारी महिला गटातील महिला एकमेकींच्या शेतात जाऊन पैरा पद्धतीने शेती करत होत्या. त्यामुळे शेतीचा भांडवली खर्च कमी होण्यास मदत होत गेली. या महिला सतत एकत्र असल्याने सुख-दुःख, अडीअडचणींची संवाद रोज होत होता. त्यांनी अडचणीच्या काळात एकमेकींना मदत करता यावी या उद्देशाने तसेच  पैशाची बचत व्हावी यासाठी १० महिलांनी आपला बचत गट सुरू करण्याचा विचार केला आणि विचार प्रत्यक्ष उतरवत सुरुवातीला १०० रुपये जमविले असे तीन वर्ष रक्कम जमत गेली.

**'सीएसआर' फंडाचे पाठबळ :** दरम्यानच्या काळात कमिन्स इंडिया या कंपनीने या गावात शेतीचा विकास करण्यासाठी ग्रामीण उपजीविका विकास कार्यक्रमांतर्गत शेतीला उपयुक्त अशी मदत सुरु केली. ही मदत सीएसआर फंडातून केली जात होती. 'सीएसआर' हे एखाद्या निसर्गचक्राप्रमाणे असते. जे काही समाज, पर्यावरणाकडून मिळाले तेच पुन्हा त्यांना अर्पण करणे हे त्याचे उदात्त तत्त्व असते. हे तत्त्व  गावातही राबविण्यात येऊ लागले. यामध्ये पिकाचे दर्जेदार बियाणे, मूरघास, गांडूळ खत युनिट, वेगवेगळ्या फळझाडांची रोपे गावातील शेतकऱ्यांना दिली. तसेच या कंपनीने शेतीपूरक व्यवसायासाठी चांगले काम करणाऱ्या व्यवहार चांगले असलेल्या महिला व पुरुष बचत गटाची निवड केली. यापूर्वीच्या चांगल्या कामाच्या जोरावर या महिलांच्या भरारी बचत गटाची निवड करण्यात आली

**पशुखाद्य निर्मितीत पर्दापण :** कमिन्स कंपनीने शेतीपूरक व्यवसाय निवडावा असे महिलांना त्यांनी सुचवले. गावात सुमारे ४०० च्या वर पशुधन असून शेतीला पूरक म्हणून दुग्ध व्यवसाय करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. या महिलांनी बाजारपेठ व सभोवतालची परिस्थिती यांचा विचार करून पशुखाद्य निर्मिती करण्याचा निर्णय घेतला. महिलांचे ३० टक्के  आणि कंपनीचे ७० टक्के भांडवल असे ठरले. त्यात मशीनरी आणल्यानंतर महिलांना पूर्ण प्रशिक्षण देण्याची जबाबदारीही कंपनीने घेतली.

बचत गटातील महिलांनी २५ ते ३० हजार रुपये काढून ३० बाय १६ पत्र्याचे शेड गावातच उभे केले. कंपनीने या महिलांना जागेवर तीन प्रशिक्षणे उपलब्ध करून दिली यासाठी लागणाऱ्या मशीनरीसाठी साडेसहा लाख रुपये खर्च केला. एकत्रित भांडवलातून बारामती येथून या व्यवसायासाठी मशीनरी खरेदी केली. व्यवसायाच्या कच्च्या मालासाठी बँक ऑफ महाराष्ट्रचे कर्ज घेऊन आत्मविश्वासाने महिलांनी व्यवसाय सुरू केला.

**गावातील शेतकऱ्यांनाही साह्य :** पशुखाद्य तयार करण्यासाठी मुख्य कच्चा माल लागतो मका हा मका गावातील शेतकऱ्यांकडूनच घेण्यात येतो त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळतो. माल इतरत्र पाठविण्याचा खर्च वाचतो. शिवाय बचतगटाचे कामही सोपे होते. याशिवाय लागणारा पॉलिश राईस, रॅपसिड, डिओआरबी, शेंगदाणा पेंड आदी कच्चा माल बाहेरगावातून मागविण्यात येतो. योग्य प्रमाणात कच्चामाल मशीनरीमध्ये टाकून पशुखाद्य तयार होते. पशुखाद्य आधिक पौष्टिक करण्याच्या हेतूने सध्या या खाद्यावर अधिक संशोधनही सुरू आहे.

**एक टन पशुखाद्याची निर्मिती :** बचतगटातर्फे दररोज एक टन पशखाद्याची निर्मिती होते. एक गोणी ५० किलोची असते. एका गोणीची किंमत १५०० रुपये आहे. गुणवत्तेमुळे मालाला मागणी वाढत आहे. गोणी भरण्याचे, पॅकिंग करण्याचे कामही महिला करतात दररोज १० ते ५ यावेळेत महिला या ठिकाणी येतात. काम करतात सोबत डब्बा घेऊन येतात. त्यामुळे कामाला एक शिस्त आली असल्याचे अध्यक्ष दमयंती काटकर सांगतात. घरच्याच्या पाठिंब्यावरच हे काम उत्कर्षाकडे जात असल्याचेही त्या नमूद करतात.

**कामाचे समाधान :** पशुखाद्याच्या व्यवसायाला दोन वर्षे पूर्ण होऊन आता तिसरे वर्ष सुरू आहे .या व्यवसायामुळे सर्व महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. शेतात राबणारे हात आता पशुखाद्याची निर्मिती, विक्री करतात. दर्जेदार कच्चा मालाच्या खरेदीवर भर दिल्याने चांगले पशुखाद्य तयार होत आहे. केमिकलविरहीत पशुखाद्य असल्याने दुधाच्या फॅटवरही परिणाम झाल्याचे दिसून येत असल्याचे शेतकरी सांगत आहे. त्यामुळे महिलांनाही कामाचे समाधान लाभत आहे. भविष्यात पशुखाद्याचे उत्पाद संपूर्णपणे ऑटोमॅटिक व्हावे अशी मशीनरी खरेदी करण्याची इच्छा सदस्यांची आहे.

**भरारी महिला बचत गटाचे सदस्य :** अध्यक्ष - दमयंती विठ्ठल काटकर, सचिव - तेजश्री दत्तात्रय काटकर, सदस्य - लक्ष्मी जालिंदर काटकर, नंदा भरत काटकर, गजराबाई रामचंद्र काटकर, सुवर्णा पोपट काटकर, कौशल्या लक्ष्मण काटकर, रुचिरा विशाल काटकर, पुष्पा भालचंद्र काटकर, जयश्री आनंदा काटकर या दहा महिलांनी एकत्र येत भरारी स्वयंसहाय्यता समूह महिला बचत गटाची स्थापना केली.

*(या लेखाच्या लेखिका 'उद्योजक' मासिकामध्ये कनिष्ठ प्रकल्प अधिकारी (से.पू.) म्हणून कार्यरत असून त्यांना मराठी आणि इंग्रजी प्रसारमाध्यमात कामाचा सतरा वर्षांचा अनुभव आहे.)*

## शी र्षा स न



- पुढे पुढे करून जगणारी स्वाभिमानशून्य माणसं स्वाभिमानाचा कधीच विचार करीत नाहीत. कारण त्यांना माहिती असते की, जर त्यांचा स्वाभिमान जागृत झाला तर त्यांचे अस्तित्वच धोक्यात येईल.
- कामसू कर्मचारी काम करतातच; पण दाखविण्याचा प्रयत्न करीत नाहीत. याउलट कामचुकार आपले अस्तित्व टिकविण्यासाठी न केलेल्या कामाचा उदो-उदो करतात.
- उगाच वेळ व्यर्थ दवडणे म्हणजे हप्त्याहप्त्याने केलेली आत्महत्याच असते.
- पैशासाठी तगादा लावणाऱ्या धनकोपासून काही काळ सुटका मिळवण्यासाठी ऋणकोने स्वतः स्वतःच्या पी.ए.ची भूमिका निभवावी.
- उद्योग तोट्यात असण्याची कारणे देताना दोन हुकमी बहाणे. खेळत्या भांडवलाची कमतरता आणि दुसरे मालाला उठाव नाही.
- उद्योग/व्यवसायामध्ये पत्नीचा हस्तक्षेप जाणीवपूर्वक टाळण्यामागे २४ तासांच्या सुरक्षा व्यवस्थेतून सुटका मिळवण्याचा सुरक्षित मार्ग असतो.
- मानसिक शांततेसाठी दोन आघाड्यांवर नेहमी काळजी घ्या. ऑफिसात साहेबाशी तर घरी पत्नीशी वादविवाद टाळा.
- काटकसर करण्याचा सल्ला एकाला दिला तर दुसरा ऐकतो; पण तिसराच अमलात आणतो.
- मालकाने केलेली चूक हा एक अपघात असतो तर कर्मचाऱ्याने केलेली चूक ही घोडचूक असते.
- कार्यालयात वाहणाऱ्या वाऱ्याचे होकायंत्र साहेबाचा पी.ए. असतो तर कर्मचाऱ्यांच्या मनात घोंघावणाऱ्या विचारांच्या वाऱ्याचे होकायंत्र शिपाई असतो.
- उद्योग चांगला सुरू असेल तर याचा जास्त गाजावाजा करू नका अन्यथा ऋणको, धनको भेटीला येतील तर मित्रांच्या आणि हितचिंतकांच्या संख्येत वाढ होईल.
- फार आर्थिक चणचण सुरू आहे याची इतरांना ओळख करून देण्याचे काही प्रभावी मार्ग - गाडी असूनही पायी फिरणे, पैसे असूनही बिल न भरणे, किराणावाला, पेपरवाला यांची बिले त्यांनी प्रचंड पाठपुरावा केल्यानंतर देणे.
- सामान्य, असामान्य माणसांबाबत तुमची आमची व्याख्या जो माणूस असामान्य काम करतो तो सामान्य, तर जो माणूस सामान्य काम करतो तो असामान्य.



यशोगाथा :

# डॉ.सुरेश माळी

# नोकरदार ते उद्योग रत्न

**आर्थिक सुरक्षेला महत्त्व देणे योग्यच आहे; परंतु जोखीम पत्करण्याचे धाडस अंगी असणे महत्त्वाचे आहे. व्यवस्थापनशास्त्रात विविध पदविका अंगी असताना नोकरीची वाट सोडत आयएसओ प्रमाणपत्र देणाऱ्या संस्थेचा प्रारंभ करून डॉ. सुरेश माळी यांनी उद्योजकतेचा प्रवास यशस्वी केला.**

**- निशिगंधा कणकवलीकर**

डॉ. सुरेश पार्वतीबाई दामोदर माळी यांचा जन्म १५ मार्च, १९५९ रोजी पुणे जिल्ह्यात झाला. त्यांचे वडील हे भारतीय रेल्वेत कामाला होते आणि आई गृहिणी होती. सुरेश हे भावंडांमध्ये थोरले बंधू आहेत. त्यांना सुधाकर आणि प्रकाश हे दोन भाऊ आणि रंजना ही बहीण आहे. कुटुंब मोठे असल्याने पगार पूरत नव्हता. सुरेश यांना स्वतःच्या पायावर उभं राहून कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्याचे वेध लागले होते. पदवीधर झाल्यावर त्यांनी मटेरिअल्स मॅनेजमेंट, बिझिनेस मॅनेजमेंट, क्वालिटी मॅनेजमेंट असे तीन डिप्लोमा केले. डॉ. दिलिप माने यांच्या मार्गदर्शनामुळे त्यांनी नॅचरोपथीमध्ये आंतरराष्ट्रीय डॉक्टरेट मिळवली.

१९८१ साली डॉ. सुरेश यांना किशोर पंप्स् या कंपनीत नोकरी मिळाली. त्यांचा पहिला पगार रु. ४५०/- होता. सहा महिने काम केल्यानंतर त्यांनी फिनोलेक्स केबल, एल्प्रा-जीई, प्रिमियर, एक्साइड, जयश्री पॉलिमर्स, इंटरटेक अशा अनेक कंपन्यांमध्ये उच्च पदावर नोकरी केली; पण ते अस्वस्थ होते कारण त्यांना हे चांगलं ठाऊक होतं की, नोकरी करून आपली प्रगती होणार नाही. त्यासाठी स्वतंत्र उद्योग करून यशस्वी उद्योजकच व्हावं लागणार. इंटरटेकमध्ये त्यांनी बरेच वर्ष ऑडिटर म्हणून काम केलं. त्यांना कामानिमित्त भारतभर दौरे करावे लागत होते. भ्रमंतीमुळे विश्रांती मिळत नव्हती, कुटुंबाकडे दुर्लक्ष होत होतं, हे मनाला पटत नव्हतं. नोकरीत समाधान लाभत नव्हतं. दरम्यानच्या काळात १२ मे, १९८७ रोजी पदवीधर असलेल्या सौ. शोभा यांच्याशी त्यांचा विवाह झाला.

२०११ साली ते एका कंपनीच्या व्हिजीट दरम्यान लिफ्टमध्ये अडकले. तेव्हा त्यांच्या मनात उद्योजकतेची ठिणगी पेटली. मुलाखतीत ते म्हणाले, 'मी स्वप्न पाहू लागलो की, मी स्वतःचा उद्योग सुरू करून कंपन्यांचं ऑडिटिंग करतोय, त्यांना आयएसओ सर्टिफिकेट मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करतोय. जे कष्ट मी नोकरीत घेतोय, तेच कष्ट माझ्या स्वतःच्या उद्योगासाठी घेतले, तर माझा वेळ वाचेल, माझे श्रम कमी होतील, माझी आर्थिकदृष्ट्या भरभराट होईल, माझं नाव प्रसिद्ध होईल आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, स्वतःचा उद्योग केल्याचं समाधान लाभेल.' डॉ. सुरेश माळी आणि माझी ओळख जुनी आहे कारण डॉ. उमेश कणकवलीकर सरांचा 'मी विजेता होणारच!' हा कार्यक्रम त्यांनी अनेकदा सहकुटुंब पाहिला आहे. तसंच सरांचं 'मी विजेता होणारच!' हे पुस्तक त्यांनी अनेकदा वाचलं आहे. या दोन्ही गोष्टी नोकरी सोडून उद्योजकतेकडे वळण्यासाठी टर्निंग पॉइंट ठरल्या असं ते आवर्जून सांगतात.

२०१४ साली त्यांनी 'आयएसओ सर्टिफिकेशन्स' नावाचा लघुउद्योग सुरू केला. गीता ग्रुप ऑफ कंपनीचे श्री.पी.टी.वेणुगोपाल यांनी आयएसओ सर्टिफिकेशन या कंपनीला शुभारंभाचं काम दिलं. ही कंपनी आजही त्यांची ग्राहक आहे. आमचा उद्योग हा ग्राहकांशी मानवी स्नेहसंबंधांवर अवलंबून आहे, असं ते म्हणतात. या क्षेत्रामध्ये त्यांना सिनिअर कंसल्टंट (आयएमएस) सुहास गोळे आणि सुनिल मेदगे या दोन्ही तज्ज्ञ व्यक्तींनी मोलाची मदत केली आहे, अशी कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली. त्यांचं कार्य चांगलं असल्यामुळे त्यांचे ग्राहकच त्यांची माऊथ-टू-माऊथ पब्लिसिटी करतात. त्यांना जाहिरात करावी लागत

नाही. ग्राहकांना सेवा पुरवणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. विन-विन पद्धतीने काम करायला त्यांना आवडतं.

२०१४ ते २०२४ या दहा वर्षांच्या वाटचालीत त्यांच्या संस्थेने भारतभर २०० पेक्षा जास्त ग्राहक जोडले गेले आहेत. डॉ. सुरेश हे सर्टिफाइड सिनिअर लीड ऑडिटर आहेत. ते एकूण १० इंटरनॅशनल स्टँडर्डपैकी ६ इंटरनॅशनल स्टँडर्डचे (आयएसओ ९००१, आयएसओ १४००१, आयएसओ २२०००, आयएसओ २७००१, आयएसओ ४५००१ इत्यादी) कामकाज करतात. त्यांना ऑडिट क्षेत्रातील २० वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी आजवर भारतभर ३००० ऑडिटस् केले आहेत आणि ८५० कंपन्यांना भेटी दिल्या आहेत. क्वालिटी अर्थात गुणवत्ता, हीच त्यांची विशेषता आहे. गुणवत्ता ही जीवनाची पहिली पायरी असते, असं ते म्हणतात. ज्या प्रमाणे भारतीय तत्वज्ञानाचा पाया गीता आहे, त्याच प्रमाणे आयएसओ ही प्रणाली सर्व आंतरराष्ट्रीय प्रमाणीकरण प्रणालीचा पाया आहे. सूक्ष्म, लघु, मध्यम किंवा महत्तम या सर्व नोंदणीकृत उद्योगांसाठी आयएसओ सर्टिफिकेशन गरजेचं आहे. डॉ. सुरेशजी ऑडिट या क्षेत्रात प्रशिक्षण देण्याचंही काम करतात. आजवर त्यांच्या मार्गदर्शनाखाली ३०० ऑडिटर्स प्रशिक्षित झाले आहेत.

आज टेंडरिंग, इंपोर्टस् अँड एक्सपोर्टस् या सर्व भारतीय आणि आंतरराष्ट्रीय उद्योगांसाठी आयएसओ सर्टिफिकेट ही काळाची गरज ठरत आहे. त्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल डॉ. सुरेश यांना दोन समाजभूषण आणि एक उद्योगरत्न असे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांनी भारतातील नामांकित वृत्तपत्रांना आयएसओ या विषयावरील आपले लेख प्रकाशित करण्यासाठी दिले; पण त्यांना न्याय मिळाला नाही. म्हणून त्यांनी या विषयावर 'आयएसओ ग्लोबल बेनिफिटस' हे त्रिभाषिक अर्थात इंग्लिश, हिंदी आणि मराठी पुस्तक प्रकाशित केलं आहे, ज्यात आयएसओ या विषयाचा सखोल उहापोह केला आहे. पुस्तकाचं मुखपृष्ठ श्री. प्रभाकर भोसले यांनी खूपच सुंदर डिझाइन केलं आहे. इंटरनॅशनल बिझिनेस युलिंक ॲग्रिटेक कंपनीचे श्री. अश्विनकुमार रघुवंशी यांच्या हस्ते या पुस्तकाचं प्रकाशन झालं. याच व्यक्तिमत्त्वाने त्यांना आयएसओ सर्टिफिकेशनच्या उद्योगाचा मार्ग दाखवून मार्गस्त केले. या प्रसंगी कलाश्री ग्रुप ऑफ कंपनीचे श्री. कृष्णंत अडसुळ तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.

मराठी माणसं नोकरीच्या मागे लागतात कारण ते आर्थिक सुरक्षेला महत्त्व देतात. खरं तर आपण छोटीशी जोखीम पत्करून उद्योगक्षेत्राकडे वळलं पाहिजे. मराठी उद्योजक मार्केटिंग आणि सेलिंग क्षेत्रात कमी पडतात. ही कला अवगत करण्यासारखी आहे, ज्यामुळे आपला उद्योग भरभराटीस येतो, असं ते म्हणतात. त्यांनी खंत व्यक्त केली की, आपल्या शैक्षणिक अभ्यासक्रमात अजूनही हा विषय शिकवला जात नाही. अजूनही ८० टक्के उद्योजकांना आयएसओ सर्टिफिकेटचं महत्त्व कळलेलं नाही. प्रवासादरम्यान ते वाचन आणि चिंतन करतात. त्यांच्या उद्योगाशी संबंधित पुस्तकांचा संग्रह त्यांनी केला आहे. त्यांना पर्यटनाचा छंद आहे.

आयएसओ सर्टिफिकेट बाबतच्या अधिक माहितीसाठी डॉ. सुरेश माळी यांना suresh_sss17@rediffmail.com या ईमेल वर संपर्क साधावा.

*(या लेखाच्या लेखिका पूर्वी राष्ट्रीयीकृत बँकेत नोकरी करायच्या. आता त्या एक प्रशिक्षक आणि सामाजिक उद्योजिका आहेत. त्यांचे मीच! नावाचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. email – nishamissionvijeta@yahoo.com)*



SARTHI पुणे यांचे सोबत मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा महिला या लक्षित गटांसाठी तांत्रिक उद्योजकता विकास कार्यक्रम राबविण्यासाठी MCED ने नुकताच सामंजस्य करार केला आहे. यावेळी श्री. अशोक काकडे (IAS) व्यवस्थापकीय संचालक, डॉ. श्रीकांत देशमुख, प्रकल्प संचालक, SARTHI, पुणे व श्री. सुदाम थोटे, विभागीय अधिकारी, श्री. प्रसाद पाटील, MCED, पुणे.






हस्तकलेला
कल्पकतेचा साज

# नितू क्रिएशन्सची कलाकुसर सातासमुद्रापार

**कलाकुसरी मन आणि कलाकुसरी हात एकत्र आले की नवनिर्मिती होतेच. नवनिर्मितीचा आनंद मनाला समाधान तर देतोच शिवाय अर्थार्जनाचे मार्गही उघडून देतो. संभाजीनगरच्या नितू व सुनील कुलकर्णी या दाम्पत्याने नोकरी सांभाळत, कला जपत 'नितूज क्रिएशन्स'द्वारे स्वयंरोजगाराची वाट धरली. सेवानिवृत्तीनंतर ती अधिक भक्कम केली. सण-उत्सव, मंगल कार्यासाठी लागणारे साहित्य, लक्ष्मीची पावले, ॲक्रलिक पूजेची थाळी, रेडिमेड रांगोळ्या, भेटवस्तू, रुखवत, ताटाच्या कमानी, हलव्याचे दागिने अशा एकाहून एक सरस वस्तू त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. पैकी काही वस्तू सातासमुद्रापार बोस्टनमध्येही पोहोचल्या आहेत.**

**- प्रतिनिधी**

नितू कुलकर्णी या अहिल्यादेवीनगर (अहमदनगर) जिल्ह्यातील श्रीरामपूर येथील रहिवासी. वडील रेल्वेमध्ये नोकरीला होते. नितू ८ वर्षांच्या असतानाच वडीलांचे निधन झाले. नितू यांच्या आईवर दोन मुले आणि दोन मुलींचा सांभाळ करून घर चालवण्याची जबाबदारी पडली. वडिलांची तुटपुंजी पेन्शन आणि वाढती महागाई यातून चार मुलांचे शिक्षण आणि घर चालवणे अवघड होते; पण आईने सर्व आव्हानांना तोंड देत मुलांचा सांभाळ केला. चांगले संस्कार दिले. नितू यांच्या आई मेहंदी डिझाइन, रांगोळी, पेंटिंग ह्याचे क्लास घेत होत्या. याच कलागुणांची शिदोरी नितू यांना बालवयात मिळाली आणि तशी कलात्मक दृष्टी तयार झाली. त्यात त्यांनी सतत काळानुसार बदल केले.

**शिक्षणासह अर्थार्जन :** शालेय शिक्षण सुरू असतानाच टेबल टेनिस स्पर्धेत राज्य पातळीवर चमकदार कामगिरी करणाऱ्या नितू या नाटक आणि मैदानी क्रीडा प्रकारात देखील आघाडीवर होत्या. खेळाडूवृत्ती आणि नेतृत्व गुणाची जडणघडण तेथे झाली. आईला मदत करण्यासाठी दहावीत असतानाच मेंदी क्लास आणि चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची शिकवणी घेण्यास सुरुवात केली. कॉलेज पूर्ण होईपर्यंत त्यात खंड पडला नाही. मराठी टायपिंग, एमकॉम पूर्ण केले. शिक्षण सुरू असताना एका सीएकडे नोकरी सुद्धा पत्करली. शिक्षण, शिकवणी, नोकरी यांची सांगड घालत हाती आलेली मिळकत कुटुंबाला देत असत. पुढे पूर्ण वेळ त्यांनी शिकवणीवर लक्ष केंद्रित केले. मेहंदी, रांगोळी, पेंटिंगच्या क्लास घेत त्यांचा लौकिक वाढवला.

**विवाहानंतर छत्रपती संभाजीनगरात :** एका खाजगी कंपनीत कार्यरत असलेले सुनील कुलकर्णी यांच्यासोबत विवाह करून नितू या छत्रपती संभाजीनगरात आल्या. आता सांसारिक जबाबदारी वाढली होती. येथेही मेहंदी, रांगोळी, पेंटिंग क्लास घेण्यास सुरुवात केली आणि शहरामध्येही चांगलेच बस्तान बसवले. कलाकुसरीची आवड असल्यामुळे हलव्याचे दागिने करण्यासह इतर गृहउद्योग सुरू केले. एका खाजगी संस्थेत नोकरीही स्वीकारली.

**नितूज क्रिएशनचा प्रारंभ :** नोकरी, कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासोबत गृहउद्योग सुरू होता. याला अजून मोठे रूप देण्याच्या हेतूने त्यांनी २०१४ मध्ये 'नितूज क्रिएशन' या नावाने एक फर्म नोंदणीकृत केले. या अंतर्गत त्या सण-उत्सव व मंगल सोहळ्यासाठी लागणाऱ्या विविध प्रकारच्या नक्षीदार, सजावटपूर्ण वस्तू तयार करतात. लक्ष्मीची पावले, ॲक्रलिक वूडन थाली, रेडिमेड रांगोळ्या, भेटवस्तू, फ्लॉवर पॉट, लग्न, मुंजीचे संपूर्ण रुकवत, ताटाच्या कमानी, हलव्याचे दागिने, विविध प्रकारचे तोरण, हळदी कुंकवाचे करंडे, विविध प्रकारच्या बाहुल्या, मोत्यांच्या रांगोळ्या, रांगोळी छापे, बॅग्ज,पर्स अशा एकाहून एक सरस वस्तू नितू यांच्याकडे मिळतात.

**प्रदर्शने देतात ओळख :** महाराष्ट्रभर लघुउद्योजकांसाठी विविध ठिकाणी भरविण्यात येणारी प्रदर्शने मोठा आधार देतात. त्यातून व्यवसायाची ओळख निर्माण होते. लोकांशी संपर्क वाढतो. पुढे त्यांचा उपयोग व्यवसाय वृद्धीसाठी होतो, असे नितू सांगतात. वर्षातून किमान ५ प्रदर्शनात त्यांचा सहभाग असतो. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या शहरातील प्रदर्शनात त्यांचा सहभाग असतो.

**परदेशातही पसंती :** नितूज क्रिएशन्सच्या कलाकुसरीच्या वस्तू ग्राहकांच्या मनात घर करत आहेत. संपूर्ण राज्यातून त्यांच्या कलाकृतींना मागणी असते. ऑनलाइन ऑर्डरद्वारे ग्राहक वस्तू तयार करून घेतात. अमेरिकेतील बोस्टन मधील भारतीयांसाठी त्यांनी रेडिमेड रांगोळ्यांचे १७५ सेट पाठवले. त्यांनी तयार केलेल्या हलव्याच्या दागिण्यांनाही परदेशात मागणी असते. नितू यांच्या या कार्याला प्रेरणा देण्यासाठी उद्यम हिरकणी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

**कुटुंबीयांची साथ मोलाची :** नितू यांचे पती सुनील हे काही काळापूर्वीच नोकरीतून सेवानिवृत्त झाले आहेत. ते पूर्णवेळ आता नितू यांना व्यवसायात मदत करतात. कच्चा माल आणणे, तयार माल पोहोचविणे आदी जबाबदारी ते पार पाडतात. कल्पेश हा त्यांचा मुलगा पुण्यात शिक्षण घेत आहे. नुकत्याच नितूही खाजगी नोकरीतून निवृत्त झाल्या. निवृत्तीनंतरच्या आयुष्यात व्यवसायाची व्याप्ती वाढवण्याचे त्यांचे ध्येय आहे. बाजारपेठेची गरज लक्षात घेऊन व्यवसायात बदल केले. तत्पर आणि जलद सेवा ग्राहकांना दिली तर त्यांचा विश्वास संपादन करून यश मिळते, याचे उत्तम उदाहरण नितू आहेत. आपल्या प्रथा आणि परंपरा जपताना, हा समृद्ध वारसा पुढच्या पिढीकडे हस्तांतरीत करताना, त्यात काळानुसार सुसंगती, आकर्षकता हवी. याच बाबींवर लक्ष केंद्रित करत नितू यांचा व्यवसाय बहरत आहे.

■■



यशोगाथा

दीपक ताकवणे

# जीवन विम्याने दाखवला समृध्दीचा मार्ग

**कुटुंबाचा आधार होत, घरातील सर्व कर्तव्य पूर्ण करत, शेती व्यवसाय सांभाळत काही तरी करण्याची जिद्द मनात बाळगून दीपक ताकवणे यांनी ध्येयाच्या दृष्टीने वाटचाल केली. कष्टाला प्रामाणिकपणाची जोड देत एलआयसीच्या माध्यमातून आपला वर्तमान आणि भविष्याला आकार देण्याची किमया त्यांनी साकारली आहे.**

**- डॉ. उमेश कणकवलीकर**

नमस्कार, मी दीपक ताराबाई खंडेराव ताकवणे. माझा जन्म २३ जुलै, १९६८ रोजी केडगाव, दौंड, पुणे येथे झाला. मला विलास नावाचा एक भाऊ आणि नंदा व वर्षा या दोन बहिणी आहेत. माझे आई-वडील शेती करायचे. आमची २० एकर जिराईत जमीन होती. शेतीसाठी पाणी आणि वीज नव्हती. आमचं मूळ गाव पारगाव हे भीमा नदीच्या काठी वसलेलं आहे. आमचं शेत नदीपासून ८ किमी लांब आहे. शाळेत जाण्यासाठी आम्हाला दररोज १० किमीची पायपीट करावी लागायची. एकंदरीत काय, तर आमचं बालपण हे गरिबीत गेलं. माझं शिक्षण बारावीपर्यंत झालं. बारावीनंतर मी कर्ज काढून एक ट्रॅक्टर घेतला. शेती, दुग्ध व्यवसाय करून मी कुटुंबाला हातभार लावू लागलो. २० फेब्रुवारी, १९८८ रोजी सौ. पद्मा यांच्याशी माझा विवाह झाला.

ज्येष्ठ बंधू या नात्याने मी माझ्या तिन्ही भावंडांची लग्नं लावली. माझा छोटा भाऊ विलास माझ्यासारखाच बारावीपर्यंत शिकला आहे; पण आम्ही आमच्या बहिणींना पदवीधर करण्यात यशस्वी झालो. माझ्या दोन्ही बहिणींचा विवाह सख्ख्या तावरे बंधूंशी झाला आहे. विलास आता शेती व गूळ उद्योग करतो. मी स्वप्न पाहिलं होतं त्यानुसार ८ किमीची पाइपलाइन करून आम्ही आमच्या शेतात भीमा नदीचं पाणी आणलं. वाटणी नंतर माझ्या वाट्याला १० एकर जमीन आली. त्यात भर करत मी आणखीन ५ एकर शेत जमीन विकत घेतली.

श्री. अनंत दंडवते, हे एलआयसीचे डेव्हलपमेंट ऑफिसर पॉलिसी विकण्यासाठी आमच्याकडे आले होते. त्यांनी माझ्यातील कौशल्यं हेरली आणि मला एलआयसीची एजन्सी दिली. मी १४.०८.१९९१ रोजी एलआयसीचा प्रतिनिधी झालो. बारामती, पुणे शाखेच्या माध्यमातून मी माझ्या एलआयसीच्या व्यवसायाचा श्रीगणेशा केला. श्री.सर्जेराव शिवाजीराव जेधे यांना मी माझ्या कारकिर्दीतील पहिली विमा पॉलिसी विकली. कालांतराने दौंड शाखेची स्थापना झाली, त्यामुळे आता मी दौंड शाखेमार्फत कार्यरत आहे.

एलआयसीचं काम सुरू केल्यावर मला एका गोष्टीची जाणीव झाली की, आयुष्यात काहीतरी भव्य-दिव्य करायचं असेल तर विमा क्षेत्र हेच माझ्या हिताचं ठरणार आहे. मी माझी पत्नी सौ. पद्माच्या नावावर पुन्हा दुसरी एजन्सी घेतली. त्यानंतर आम्ही उभयतां झपाटल्यासारखं काम करू लागलो. ग्राहक सेवा हीच ईश्वर सेवा समजून आम्ही आमचं कार्य श्रद्धेने करू लागलो. जनतेनेही आमच्यावर विश्वास ठेवला. आज माझ्या एजन्सीला ३३ वर्ष पूर्ण झाली आहेत. आजपर्यंत आम्ही १०,००० पेक्षा जास्त विमाधारकांना पॉलिसी दिल्या आहेत. मेडिक्लेमकडे लोकांचा कल वाढला, म्हणून २००५ ला मी मेडिक्लेमच्या व्यवसायात उतरलो. मी स्टार हेल्थ इन्शुरन्सची एजन्सी घेतली.

२०१२ साली मला हिंदुस्तान पेट्रोलियमच्या माध्यमातून पेट्रोलपंपची डिलरशिप मिळाली. शिरुर-चौफुला या हमरस्त्यावर पारगाव येथे आमचा 'यशोदीप' पेट्रोलपंप आहे. तिथेच बाजूला मी एका शुद्ध शाकाहारी हॉटेलसाठी माझी जागा भाड्याने दिली आहे. जीवनात मला एक गोष्ट शिकता आली, ती म्हणजे आपल्या उत्पन्नाचे स्रोत वाढवले पाहिजेत. या संघर्षात आम्ही ताकवणे कुटुंबीय यशस्वी झालो आहोत. शेती, पेट्रोलपंप, जागेच्या भाड्याचं उत्पन्न, इन्शुरन्स पॉलिसीचे कमिशन, मेडिक्लेम पॉलिसीचे कमिशन इत्यादी माध्यमांतून आम्ही उत्पन्न कमवू लागलो. २००० साली मी पहिलं 'एमडीआरटी' केलं. त्यानंतर मी दरवर्षी 'एमडीआरटी' हा किताब पटकावतो आहे. २०२१ साली मी 'सिओटी' हा मानाचा किताब पटकावला. एलआयसीने आम्हाला आमच्या कामाच्या मोबदल्यात भरपूर काही दिलं आहे. कधीतरी हा दीपक ताकवणे दुसऱ्यांची गाडी, बंगला पहात राहायचा. जर मी विमा क्षेत्रात उतरलो नसतो, तर माझी स्वप्नं ही स्वप्नंच राहिली असती. विमा क्षेत्राचे काम करून मला त्या स्वप्नांना न्याय देता आला. आज आम्ही साडेतीन हजार स्क्वे. फिटच्या बंगल्यात सुखात रहातो आहोत. इथेच आमचं ऑफिसही आहे. जीवन विम्याचं काम दीपक आणि पद्मा करतात, 'दी' दीपकचा आणि 'प' पद्माचा म्हणून आम्ही आमच्या बंगल्याचं नाव 'जीवनदीप' ठेवलं आहे. माझ्या आयुष्यातली पहिली कार, मारुती ८००, त्यानंतर सँट्रो, क्रेटा, एसक्रॉस या गाड्या माझ्या जीवनात आल्या.

अलीकडेच एलआयसी आणि आमच्या कुटुंबीयांनी मला टोयोटा क्रिस्टा ही गाडी घेण्यासाठी मोठी आर्थिक मदत केली. विमा क्षेत्रातील माझे गुरुवर्य, ज्यांनी मला विमा क्षेत्राचा मार्ग दाखवला, ते श्री.अनंत दांडेकर यांच्याच हस्ते मी माझ्या या आलिशान गाडीची पूजा करून घेतली. एलआयसी कॉन्फरन्सच्या माध्यमातून मी कॅनडा, ताश्कंद, मलेशिया, सिंगापूर, दुबई, व्हिएतनाम, थायलंड इत्यादी देशांचे दौरे करू शकलो. सौ. पद्मा यांनादेखील मी माझ्यासोबत प्रत्येक परदेश दौऱ्यावर स्वतःच्या खर्चाने घेऊन गेलो आहे.

मी स्वतःला अपडेट करण्यासाठी सतत शिकत राहतो. मी दरवर्षी स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी ५० ते ६० हजार रुपयांची गुंतवणूक करतो. यासाठी मी वेगवेगळी प्रशिक्षणं घेत असतो. २००९ साली डॉ. उमेश कणकवलीकर सर आमच्या जीवनात आले. 'मी विजेता होणारच!' कार्यक्रम, 'आर्ट ऑफ विनिंग' चे प्रशिक्षण, सरांची सर्व पुस्तकं या सर्वांचा मला आणि माझ्या कुटुंबाला जीवनात पदोपदी उपयोग झाला आहे. सरांनी १२ तास अन्न-पाणी प्राशन न करता आम्हाला कळकळीने आणि तळमळीने प्रशिक्षण दिलं होतं, ते आम्ही कधीच विसरणार नाही. सरांच्या प्रशिक्षणातील पहिला महत्त्वाचा भाग म्हणजे ते आपल्या सोबत कुटुंबाला प्रशिक्षण देण्याची सवलत देतात. त्यामुळे सौ. पद्मा यांनीदेखील सरांकडून प्रशिक्षण घेतलं आहे. दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांच्या प्रशिक्षणात त्यांची सर्व पुस्तकं आपल्याला दिली जातात. या पुस्तकांतून जणू ज्ञानगंगाच वाहते. सरांच्या प्रशिक्षणातून सातत्याचं महत्त्व कळल्यामुळे मी दरवर्षी एमडीआरटी करून विजेता होत आहे.

२०२२ ला माझी आई स्वर्गवासी झाली असून वडीलांनी आयुष्यभर शेतात काबाडकष्ट केलेले असल्यामुळे ते शेतातच रमलेले असतात.२०१२ला आमच्या मुलीचं लग्न झालं. माझे जावई श्री.विकास नागवडे यांनी फूड टेक्नॉलॉजीमध्ये लंडन येथून एमएस केलं आहे. त्यांची 'आदर्श ॲग्रीटेक' नावाची कंपनी असून ते अनेक देशांसोबत आयात-निर्यातीचा व्यवसाय करतात. माझा मुलगा सिव्हिल इंजिनिअर आहे. २०२२ ला अनिकेतचं सौ.श्रद्धाशी लग्न झालं. पुरंदरचे माजी आमदार, श्री. अशोकराव टेकवडे, दौंडचे माजी आमदार, श्री.रमेश आप्पा थोरात, तसेच महाराष्ट्र शासनाचे क्लास-वन अधिकारी श्री. बाळासाहेब मुरलीधर तावरे या सर्वांनी मला माझ्या उद्योगात अनमोल अशी मदत केली आहे. मी आजन्म या सर्वांच्या ऋणानुबंधनात राहीन. मानवी स्नेहसंबंध आणि मजबूत जनसंपर्क यांच्या जोरावर माझा उद्योग भरभराटीस जात आहे. माझ्या मोबाइलमध्ये अंदाजे १२,००० व्यक्तींचे नंबर्स आहेत, कारण उद्योगात ओळखीचं भांडवल महत्त्वपूर्ण कामगिरी बजावते.

आजच्या तरुण पिढीला मी एक मित्रत्वाचा सल्ला देऊ इच्छितो की, नोकरीपेक्षा उद्योगच बरा. सुरुवातीला उद्योगात टिकून राहावं लागतं; पण जर आपण उद्योगात टिकलो, तर तोच उद्योग आपल्याला उद्योग क्षेत्रात कायम टिकवतो. उद्योगात सुरुवातीला उत्पन्न धिम्या गतीने येते; पण नंतर तेच उत्पन्न जलद गतीने येऊ लागते. यासाठी कष्ट, जिद्द आणि चिकाटी याची कास धरली पाहिजे. उद्योगात धरसोड वृत्ती चालत नाही. एकदा का उद्योगाचा मार्ग स्वीकारला, की जिंकू किंवा मरू; पण आयुष्यभर उद्योगच करू, असा उद्योगाचा अलिखित नियम आहे. तो प्रत्येक उद्योजकाने पाळलाच पाहिजे. २९ जुलै, २०२४ रोजी ''आंतरराष्ट्रीय व्याघ्र दिन'' होता. याच दिवशी एलआयसीच्या दीपक ताकवणे नावाच्या वाघाला 'जे डब्ल्यू मॅरिएट', पुणे या फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये ''लोकमत अचिव्हर ऑफ पुणे'' हा मानाचा पुरस्कार दिला गेला.

आज सिंहावलोकन करताना डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहतात. मी दीपक ताकवणेचा अण्णा ताकवणे कधी झालो हे कळलंच नाही. आता जीवनात एकच इच्छा आहे की, एलआयसीचा 'टीओटी' हा सर्वोच्च किताब पटकवून महाविजेता व्हायचं. ''केल्यानं होत आहे रे, आधी केलेच पाहिजे'', ''प्रयत्नांती परमेश्वर'' या म्हणींनुसार 'मी विजेता होणारच!' म्हणत मी पुढचं पाऊल पुढे टाकणारच! जय महाराष्ट्र! जय भारत!

*(या मुलाखतीचे शब्दांकन करणाऱ्या लेखकाची २५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच त्यांनी आजवर मी विजेता होणारच! या कार्यक्रमाचे ३५०० हून अधिक प्रयोग सादर केले आहेत. आर्ट ऑफ विनिंग नावाने ते प्रशिक्षण देतात. ते नामांकित कंपन्यांचे प्रशिक्षक आहेत. त्यांनी सामाजिक बांधीलकीतून पुणे येथे शिष्यकुल या संस्थेची उभारणी केली आहे. त्यांचा e-mail : nishamissionvijeta@yahoo.com असून त्यांचे भ्रमणध्वनी ९८२०२९२०७२ / ९०२९३७३१११ आहेत.)*

## संवाद कौशल्य :

संभाषण कौशल्य आपल्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. आपल्याला जीवनामध्ये प्रत्येक क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रेरित करत असतात. उत्तम संभाषण कौशल्य आपला आत्मविश्वास तर वाढवतात. संवाद कौशल्य सुधारण्यासाठी आपल्या सर्वांना काही प्राथमिक गोष्टी करणे गरजेचे आहे.

चांगला संवाद होण्यासाठी वाचन गरजेचे आहे. तसेच चांगले ऐकायला शिकायला हवे. त्यामुळे शब्द सामर्थ्य वाढते. मुद्देसूद बोलायला हवे. बऱ्याच संभाषणामध्ये जेव्हा जास्त प्रमाणात अनावश्यक माहिती दिली जाते तेव्हा समोरच्याचा गोंधळ उडतो. संभाषण करताना मुद्देसूद बोला. लिखित तोंडी संभाषण दोघांवरही हे लागू होते. मूळ विषयापासून विचलित होऊ नका. आपण कोणाशी संवाद साधत आहोत हे आपल्याला माहिती असणे गरजेचे आहे. समोरच्या व्यक्तीचे वय, अनुभव लक्षात घ्या. जर तुम्ही तुमच्या श्रोत्यानुसार भाषेचा वापरही नाही केला तर तुम्ही श्रोत्यापर्यंत पोहोचू शकणार नाही.

तुमची देहबोली ही फार महत्त्वाची आहे. देहबोली हा शब्दाशिवाय संवाद साधण्याचा उत्तम मार्ग आहे. व्हिडिओ कॉन्फरन्स कॉल किंवा समोरासमोर माणसे भेटतात तेव्हा सकारात्मक देहबोली राखा. तुमच्या श्रोत्यांच्या नजरेला नजर देऊन बोला. तुमची देहबोली हा संवादाचा उत्तम मार्ग होतो. संवादात आपल्या सुराला खूप महत्त्व आहे. बऱ्याचदा तुम्ही मोठ्या आवाजात बोलता तेव्हा चुकीचा संदेश जातो. त्यामुळे संवाद मधुर भाषेतच असला पाहिजे. त्यामुळे ऐकणारा आरामात ऐकू शकेल. ज्या व्यक्तीशी तुमचे चांगले संबंध आहेत त्याच्याशी नेहमी थेट बोला. त्यामुळे गोंधळ आणि कोंडी उडत नाही. जेव्हा कोणताही गोंधळ नसतो तेव्हा नाते चांगले टिकून राहते. परिस्थितीकडे विशेष लक्ष देऊन बोलण्याचा प्रयत्न करा.





# अभियांत्रिकी ज्ञान आणि उद्योजकीय भान आवश्यक

**भारताला फाईव्ह ट्रिलियन इकॉनॉमी बनवण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या स्वप्नांना प्रत्यक्षात आणण्याच्या कामी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या अभियंते हे निश्चितच मदत करू शकतात. प्रक्रिया उद्योग असो किंवा सेवा क्षेत्र यामध्ये आपल्या अभियांत्रिकी ज्ञानाने आपले अभियंते निश्चितच प्रभावी कामगिरी करून आपल्या उद्योजकतेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात स्वयंरोजगार व रोजगारनिर्मिती करू शकतात.**

**- प्रसाद जोग**

अभियंते तीन ते चार वर्षे अभियांत्रिकीचे शिक्षण घेऊन आपली पुढील कारकीर्द घडवण्यासाठी सज्ज होत असतात; पण त्यांच्या प्राधान्यक्रमात ते नोकरी करण्यालाच पसंती देत असल्याचे आढळून येते.

खरे पाहता अभियंते चांगले उद्योजक होऊन आपल्यातील तांत्रिक कौशल्याला व उद्योजकीय कौशल्याला एकाच वेळी न्याय देऊ शकतात; पण त्यासाठी अभियांत्रिकीचे प्रशिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये उद्योजकीय जागरूकता तयार करण्यात यायला हवी. जर आपल्याला आपल्या अर्थचक्राला वेगाने गती द्यायची असेल, तर अभियंते आत्मनिर्भर होण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत व आपल्या अभियंत्यांमध्ये तंत्रज्ञानाबरोबरच उद्योजकतेची रुची निर्माण करण्याचे ध्येय ठेवून अत्यंत व्यापक अशी जनजागृती करावी लागणार आहे. कारण अभियांत्रिकी प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये एकाच वेळी दोन विषम परिणाम दिसून येत आहेत.

उच्च गुणवत्ता असणाऱ्या किंवा अंगमेहनतीची तयारी असणाऱ्या विद्यार्थ्यांना सहजतेने नोकऱ्या मिळत आहेत तर दुसऱ्या बाजूला हेच अभियंते नोकरी मिळवताना संघर्ष करत आहेत.

या स्पर्धात्मक युगात विविध पर्याय उपलब्ध असताना सुद्धा दरवर्षी अभियांत्रिकी पदवी आणि पदविका मिळवणारे विद्यार्थी करिअर करण्यासाठी फक्त उच्च पदाच्या, गलेलठ्ठ पगाराच्या नोकऱ्या मिळतील म्हणून जर फक्त मुलाखतीवर मुलाखती देत राहणार असतील, तर ते त्यांच्यासाठी, अभियांत्रिकी शाखेसाठी व उद्योजकतेसाठी तसेच आपल्या अर्थव्यवस्थेसाठी निश्चितच हितावह ठरणारे नाही असेच म्हणावे लागेल.

दरवर्षी दहावी-बारावी परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेले तरुण-तरुणी आपले गाव, शहर सोडून तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी आपले भविष्य घडविण्यासाठी येत असतात व शासकीय किंवा निमशासकीय तसेच खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेऊन अभियांत्रिकीचे ज्ञान घेण्यासाठी सिद्ध होत असतात.

अभियांत्रिकीचे ज्ञान, तंत्रकुशलता, संगणकीय ज्ञान व त्याच्या जोडीला संवाद कौशल्य व व्यवस्थापकीय ज्ञान घेऊन हे तरुण-तरुणी नोकरी मागणाऱ्यांच्या स्पर्धेत येऊन दाखल होतात.

खरे पाहता अभियांत्रिकी ज्ञानाबरोबर जर विद्यार्थ्यांनी आपले उद्योजकीय भान वाढवून विविध उद्योग संधीचे आकलन करून घेतले, तर ते स्वतः आत्मनिर्भर होऊन दुसऱ्यांना नोकरी देण्याची क्षमता अंगी धारण करू शकतात.

माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात आपल्या बौद्धिक संपदेचा वापर करून उच्च अभियांत्रिकी शिक्षण घेतलेले युवा आपल्या भावी करिअरसाठी निश्चितपणे उद्योग या पर्यायाचा आत्मविश्वासपूर्वक स्वीकार करू शकतात. अभियांत्रिकी विद्याशाखा जशी अभियंत्यांना घडवू शकते तशीच चांगल्या उद्योजकांनाही घडवू शकते.

अभियांत्रिकी ज्ञान हे उपयोजित ज्ञान आहे. म्हणजे अभियांत्रिकी शिक्षणात अभियंता जे शिकतो ते त्या अभियंत्याने आपल्या विविध संशोधनात्मक क्रियाकलापातून समाजाच्या विविध प्रकारच्या गरजा पूर्ती करण्याच्या दृष्टीने व्यावहारिक पातळीवर करणे अपेक्षित आहे.

संगणक अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी, रासायनिक अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, ऑटोमोबाइल अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, यांत्रिक अभियांत्रिकी, कृषी अभियांत्रिकी, लेदर तंत्रज्ञान, दूरसंचार अभियांत्रिकी, ध्वनी अभियांत्रिकी, रोबोटिक्स अभियांत्रिकी, खाण अभियांत्रिकी, सागरी अभियांत्रिकी, वैमानिक अभियांत्रिकी, इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी अशा अभियांत्रिकी विद्याशाखांचे ज्ञान घेतलेले तरुण अभियंते जर उद्योजकतेकडे वळणारच नसतील तर...

भारताला फाईव्ह ट्रिलियन इकॉनॉमी बनविण्याच्या पंतप्रधान मोदींच्या स्वप्नांना प्रत्यक्षात आणण्याच्या कामी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या अभियंते निश्चितच मदत करू शकतात. प्रक्रिया उद्योग असो किंवा सेवा क्षेत्र यामध्ये आपल्या अभियांत्रिकी ज्ञानाने आपले अभियंते निश्चितच प्रभावी कामगिरी करून आपल्या उद्योजकतेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात स्वयंरोजगार व रोजगारनिर्मिती करू शकतात. भारताला ५ लाख कोटी डॉलरची अर्थव्यवस्था उभारण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात आत्मनिर्भर होऊन स्थानिक रोजगार वाढवावा लागणार आहे. आपल्याकडच्या प्रत्येक इंडस्ट्रीमधून मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी जर वाढीस लागल्या तरच महाराष्ट्रात पर्यावरणपूरक उद्योगांसह, उत्पादन क्षेत्रातील आस्थापनांमध्ये वाढ होणार आहे.

स्थानिक पातळीवर सक्षमता व समृद्धता आल्यास एक एकात्मिक सर्वंकष विकास होऊन तिथली क्रयशक्ती वाढण्यास मदत होणार आहे.

**अभियंते व उद्योजक यामध्ये समान गुणवैशिष्ट्ये असतात -**

१ नावीन्यपूर्ण किंवा वेगळा विचार करण्याची क्षमता

२ निर्णय क्षमता

३ जोखीम घेण्याची वृत्ती

४ संधीशोधक वृत्ती

५ जटिल विषयाचे आकलन करून तो विषय समजून घेण्याची वृत्ती

६ समस्या निराकरण कौशल्य

७ चिकाटी

८ लवचिकता

९ उत्कृष्टतेचा ध्यास

१० नियोजन कौशल्य

११ संघटन कौशल्य

१२ सांघिक कामगिरी आणि संघभावना

१३ एखाद्या गोष्टीच्या मुळापर्यंत जाण्याची चिकित्सक वृत्ती

१४ संशोधनात्मक रुची

१५ सृजनाची आवड व नावीन्याचा ध्यास

**अभियांत्रिकीची व्यापकता आणि तांत्रिक उद्योजकता यांचे अतूट नाते**

अभियांत्रिकीची सफलता त्याच्या सृजनावर, आविष्कारावर, नवनिर्माणावर व औद्योगिक उपयोगितेवर अवलंबून असते. अभियांत्रिकीचे उपयोजन योग्य प्रमाणात केले गेल्यास मानवी गरजांची पूर्तता होते. मानवी जीवन सुकर होण्यासाठी अभियांत्रिकीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अभियांत्रिकी ज्ञान, विज्ञान व संशोधन शास्त्र यांचा योग्य अभ्यास करून आपल्या अभियंत्यांनी समस्या निराकरण करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन नवनवीन शोध लावणे अपेक्षित आहे. अभियांत्रिकी क्षेत्रात सुद्धा नवीन सिद्धांत, नवीन संकल्पना, नवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. सद्यःस्थितितील प्रचलित यंत्रांमध्ये आवश्यक ते बदल करून त्यांचे अभियांत्रिकी मूल्य वाढवण्यास वाव आहे. तांत्रिक उद्योजकता विकास ही काळाची गरज आहे. जर आपल्याला ब्रेन ड्रेन थांबवायचे असेल, म्हणजेच परदेशात नोकरीसाठी जाणाऱ्या अभियंत्यांचे प्रमाण थांबवायचे असेल, तर आपल्या महाराष्ट्रातील अभियांत्रिकीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे महत्त्व समजावून सांगून त्यांचा कल तांत्रिक उद्योजकतेकडे वळवायलाच हवा.

शेतकऱ्यांचा, बागायतदारांचा कृषी माल संरक्षित करणे, त्यावर योग्य मूल्यवर्धन करून तो प्रक्रियायुक्त माल योग्य तापमानात साठवून बाजारपेठेत विक्रीस आणणे, यासाठी सुद्धा अभियांत्रिकी व उद्योजकीय ज्ञानाची गरज सातत्याने भासणार आहे. यासाठी तांत्रिक उद्योजक म्हणून अन्नप्रक्रिया उद्योजकांच्या सातत्याने संपर्कात राहून त्यांचे उत्पादन वाढीसाठी कोणती मशीन्स आवश्यक आहेत, याचा आढावा घेऊन अशा यंत्रांची निर्मिती करून त्या मशीन्सच्या देखभालीचा व्यवसाय आपल्या अभियांत्रिकीची आवड असणाऱ्या उद्यमी मित्रांनी करणे गरजेचे आहे. वणवा ही कोकणातील मोठी समस्या असून यामध्ये शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. ही समस्या गंभीर असून यावर योग्य उपाययोजना होणेही गरजेचे आहे. या समस्या निराकरणासाठी अभियांत्रिकी ज्ञानाचा निश्चित उपयोग होऊ शकतो. इलेक्ट्रॉनिक्स शाखेचे अभियंते यावर सेन्सरचा वापर करून फायर डिटेक्शन अलार्मसारखी उपकरणे शोधून काढू शकतात. यातून आगीवर नियंत्रण ठेवणे सोपे होऊ शकते.

वणवा लागूच नये यासाठी गवताळ भागातील गवत, बांबू, पालापाचोळा यांचा वापर करून हॅण्ड मेड पेपर बनवता येणे

शक्य आहे का व ते किफायतशीर आहे का याचाही अभ्यास तांत्रिक उद्योजक करू शकतात.

जंगलात गवत व पाने कुजून निर्माण होणाऱ्या मिथेनसारख्या वायूचे सर्जनशील उपयोग काय होऊ शकतात, यावरही तरुण अभियंत्यांचे लक्ष वेधणे गरजेचे आहे.

स्थानिक फळांवर, भाज्यांवर निर्जलीकरण करण्यासाठी अभियंते हे बचत गटांना, छोट्या उद्योजकांना परवडेल अशा किमतीत सोलार ड्रायर बनवून त्याचाही मोठ्या प्रमाणात व्यवसाय करू शकतात.

डोंगररांगांवरील हवेपासून वीजनिर्मिती करण्यासाठी तांत्रिक उद्योजकांनी पवनऊर्जा, पवनचक्की या उच्च तंत्रज्ञानावर आधारित उद्योगसंधींचा अभ्यास करून घेतला पाहिजे. पवन ऊर्जेवर तांत्रिक उद्योजकता प्रशिक्षण घेऊन त्यात उद्योग उभारणीला मोठा वाव आहे.

अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी किंवा अभियांत्रिकीची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र आयोजित विविध तांत्रिक उद्योजकता विकास कार्यक्रमांची माहिती करून घेऊन त्यात सक्रिय सहभाग घेऊन आपल्या तांत्रिक कौशल्याच्या जोरावर उद्योजकीय संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्नशील राहायला हवे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फतही हायटेक तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट उच्चशिक्षित अभियांत्रिकी पदवीधारकांना उद्योजकतेचे महत्त्व जाणून देऊन मुख्य उद्योजकीय प्रवाहात आणण्याचे असते. अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या युवा उद्योजकांना कर्ज प्रकरण करणे सुलभ होऊ शकते.

पहिल्या पिढीतील तांत्रिक कुशल उद्यमी तयार होण्यासाठी तांत्रिक उद्योजकता कार्यक्रमाचे महत्त्व अभियांत्रिकी महाविद्यालयांमार्फत अभियांत्रिकीचे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवता आले, तर अंतिम वर्षाचे विद्यार्थी आपले नियोजित प्रोजेक्ट निवडताना स्थानिक भागातील शेतकऱ्यांचे, फळ बागायतदारांचे, मच्छीमारांचे, दुग्ध व्यावसायिकांचे, बचत गटांचे, अन्नप्रक्रिया उद्योजकांचे प्रश्न (रियल टाईम प्रॉब्लेम) सोडवण्याच्या दृष्टीने प्रोटोटाइप किंवा पायलट स्वरूपात यंत्र, मॉडेल विकसित करण्याचा प्रयत्न करू लागतील व इथेच उद्योजकीय भान असलेले अभियंते घडत जातील.

अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या युवा उद्योजकांसाठी तांत्रिक उद्योजकता अंतर्गत असणाऱ्या उद्योगसंधी खालीलप्रमाणे -

१ फळ प्रक्रिया

२ काथ्या प्रक्रिया

३ बांबू लागवड व प्रक्रिया उद्योग

४ अन्नप्रक्रिया उद्योग

५ सांडपाणी व्यवस्थापन

६ लॉजिस्टिक्स

७ अवकाळी पावसामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रणाली विकसन

८ हवामान अंदाज यंत्र

९ सोलार एनर्जी

१० विंड एनर्जी

११ टायडल एनर्जी

१२ शाश्वत शेती

१३ वणवा मुक्ती

१४ वाळवी नियंत्रण

१५ जंगली प्राणी व वानरांपासून शेतीचे रक्षण

१६ प्लास्टिक विघटन केंद्र व इलेक्ट्रॉनिक कचरा विघटन अर्थात ई-वेस्ट सोल्यूशन

१७ ग्लोबल वॉर्मिंग

१८ इलेक्ट्रिक व्हेइकल चार्जिंग स्टेशन

१९ बोअर रिफिलिंग अँड रेन वॉटर हार्वेस्टिंग

२० परवडणारे मत्स्य पिंजरे निर्मिती

२१ AI चा वापर / कृत्रिम बुद्धिमत्ता

२२ 3D प्रिंटिंग

२३ क्रीडा साहित्य निर्मिती

२४ भूकंपापासून सुरक्षित राहतील अशी घरे बांधणी

२५ अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत व त्यावर आधारित उद्योग

सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या स्मरणार्थ १५ सप्टेंबर हा दिवस अभियंता दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येतो. सृजनशीलता, नवनिर्मिती, यांत्रिक व तांत्रिक व व्यवस्थापकीय क्षेत्रातील प्रगतीशिलता, अभियांत्रिकीतील उच्चतम गुणवत्ता यांचा ध्यास घेऊन अहोरात्र काम करून उद्योजकतेमध्ये, देशाच्या विकासामध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व अभियंता मित्रांना, अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना, अभियांत्रिकीच्या सर्व शिक्षक व प्राध्यापकांना, अभियांत्रिकीचे ज्ञान व अनुभव घेऊन उद्योग करणाऱ्या व भविष्यात उद्योग करण्याची इच्छा असणाऱ्या सर्व अभियंत्यांना अभियंता दिनाच्या कोटी कोटी शुभेच्छा.

*(या लेखाचे लेखक उद्योग प्रेरणा प्रशिक्षक असून अबिलिटा ग्लोबल ट्रेनिंग प्रा. लि.चे संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा ई-मेल* theworldneedit@gmail.com *असून भ्रमणध्वनी ९९३०५९१२४२, ९४२११८६२१२ आहे.)*

■ ■

# नमुना प्रकल्प अहवाल

## मास्टर बॅचेसची निर्मिती कार्बन ब्लॅकपासून

**ओळख :** सदरील प्रकल्प हा रिकव्हर्ड कार्बन ब्लॅकपासून मास्टर बॅचेस उत्पादित करण्याचा आहे. ही एक नवीन टेक्नॉलॉजी आहे. मास्टर बॅचेसची बाजारपेठ खूप मोठ्या प्रमाणात आहे व ती दिवसेंदिवस वाढत आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |

**लागणारा कच्चा माल :** वेगवेगळया प्रकारचा कार्बन ब्लॅक

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-५, अर्धकुशल-३, अकुशल-२

**लागणारी यंत्रसामग्री :** फुल्ली ऑटोमॅटिक मास्टर बॅचेस प्लँट

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ५,००,००,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | १०,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | ३०,००,००० |
| इतर | ५,००,००० |
| **एकूण :** | **४५,००,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | १०,००,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १०,००,००,००० |
| पक्का माल | -- |
| प्रत्यक्ष | ५०,००,००० |
| **एकूण :** | **१०,५०,००,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १२०,००,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | ६०,००,००० |
| पाणी | १०,००,००० |
| **एकूण :** | **७०,००,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-५ | २२,५०,००० |
| अर्धकुशल-३ | १५,००,००० |
| अकुशल-२ | १०,००,००० |
| **एकूण :** | **४७,५०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | १५,००,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ३,००,००० |
| **एकूण :** | **१८,००,०००** |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ५०,००,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ४,५०,००० |
| **एकूण :** | **५४,५०,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक-३ | २१,००,००० |
| वॉचमन-३ | ५,००,००० |
| **एकूण :** | **२६,००,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | १५,००,००० |
| प्रवास खर्च | ६,००,००० |
| **एकूण :** | **२१,००,०००** |
| **एकूण :** | **४७,००,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | -- |
| इतर | ५,००,००० |
| **एकूण :** | **५,००,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | -- |
| इमारत | -- |
| यंत्रसामग्री | ५,००,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | ४५,००,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | १०,००,००० |
| **एकूण :** | **५,५५,००,०००** |
| खेळते भांडवल | १०,५०,००,००० |
| **एकूण :** | **१६,०५,००,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | ४,८१,५०,००० |
| बँकेचे कर्ज ९० टक्के | ११,२३,५०,००० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १२०,००,००,००० |
| उपयुक्तिके | ७०,००,००० |
| वेतन व भत्ते | ४७,५०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | १८,००,००० |
| घसारा | ५४,५०,००० |
| प्रशासकीय खर्च | ४७,००,००० |
| विक्री खर्च | ५,००,००० |
| व्याज | १,३४,८२,००० |
| **एकूण :** | **१२३,७६,८२,०००** |
| **वार्षिक विक्री :** | **१३०,००,००,०००** |
| **वार्षिक नफा :** | **६,२४,८२,०००** |

# टाकाऊ प्लास्टिकपासून हायड्रोजन उत्पादित करण्याचा उद्योग

**ओळख :** सदरील प्रकल्प हा हायड्रोजन निर्मितीचा आहे व ही हायड्रोजनची निर्मिती वेस्ट प्लास्टिकपासूनची आहे. हे एक नवीन तंत्रज्ञान आहे. यामुळे निसर्गाचा जो वेस्ट प्लास्टिकचा प्रश्न आहे तो पण छोट्या प्रमाणात का होईना सोडवला जाऊ शकतो व येणाऱ्या काळात हायड्रोजनची बाजारपेठ पण मोठी आहे व ती दिवसेंदिवस वाढणार आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

जागा ५०,००० चौरस फूट

इमारत २०,००० चौरस फूट

**लागणारा कच्चा माल :** वेस्ट प्लास्टिक

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-३, अर्धकुशल-२, अकुशल-२

**लागणारी यंत्रसामग्री :** ज्वेलरी इलेक्ट्रिक ट्युब फॉर्मिंग मशीन, ज्वेलरी प्लास्मा, पायरोलेसिस इत्यादी.

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | २,००,००,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | ५,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | ३,००,००० |
| इतर | २,००,००० |
| **एकूण :** | **१०,००,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | २,००,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १०,००,००० |
| पक्का माल | -- |
| प्रत्यक्ष | ५,००,००० |
| **एकूण :** | **१५,००,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १२०,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | १०,००,००० |
| पाणी | २,००,००० |
| **एकूण :** | **१२,००,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-३ | १२,००,००० |
| अर्धकुशल-२ | १०,००,००० |
| अकुशल-२ | ७,००,००० |
| **एकूण :** | **२९,००,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ६,००,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | २०,००० |
| **एकूण :** | ६,२०,००० |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | २०,००,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ५०,००० |
| **एकूण :** | **२०,५०,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक-३ | २५,००,००० |
| वॉचमन-३ | ५,००,००० |
| **एकूण :** | **३०,००,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | ९,००,००० |
| प्रवास खर्च | ३,००,००० |
| **एकूण :** | **१२,००,०००** |
| **एकूण :** | **४२,००,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | -- |
| इतर | ५,००,००० |
| **एकूण :** | **५,००,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | २,००,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | १०,००,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | २,००,००० |
| **एकूण :** | **२,१२,००,०००** |
| खेळते भांडवल | २२,००,००० |
| **एकूण :** | **२,३४,००,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | ७०,००,००० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | १,६३,८०,००० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | १२०,००,००० |
| उपयुक्तिके | १२,००,००० |
| वेतन व भत्ते | २९,००,००० |
| देखभाल व दुरुस्ती | ६,२०,००० |
| घसारा | २०,५०,००० |
| प्रशासकीय खर्च | ४२,००,००० |
| विक्री खर्च | ५,००,००० |
| व्याज | १९,६५,६०० |
| **एकूण :** | **२,५४,३५,०००** |
| **वार्षिक विक्री :** | **३,३०,६५,५००** |
| **वार्षिक नफा :** | **७६,३७,५००** |



# प्रश्नपेटी

**प्रश्न : सोलर एलईडी लाईट प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**
**वैभव राऊत, यवतमाळ**

**उत्तर :** सोलर एलईडी लाईट प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.
जागा २,००० चौरस फूट
इमारत १,००० चौरस फूट
उपयुक्तितेची आवश्यकता :
वीज १० अश्वशक्ती
पाणी ५ के.एल.
मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-२, अर्धकुशल-२, अकुशल-१
या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : सेमी ऑटोमॅटिक सोलर एलईडी लाईट मेकिंग प्लँट
लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारचे व गुणवत्तेचे लाईट, सोलर पॅनसल्स, इतर
या प्रकल्पासाठी एकूण भांडवल २० ते ३० लाख रुपये लागू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १० ते १५ लाख व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ३० ते ४० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू १२ ते १५ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा १८ ते २० टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : गार्लिक ऑईल प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**
**किरण थोरात, अहमदनगर**

**उत्तर :** गार्लिक ऑईल प्रकल्पाविषयी माहिती पुढीलप्रमाणे आहे.
जागा ३,००० चौरस फूट
इमारत २,००० चौरस फूट
मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-१, अर्धकुशल-२, अकुशल-२
या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : सेमी ऑटोमॅटिक डिस्टिलेशन प्लँट
लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारच्या गुणवत्तेचे व दर्जाचे गार्लिक
या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल ३० ते ३५ लाख रुपये असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता २५ ते ३० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता १० लाख ते १५ लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २१ ते २७ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा १२ ते १७ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : परफ्युम्स तयार करण्याच्या प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**
**सागर पुराणिक, ठाणे**

**उत्तर :** परफ्युम्स तयार करण्याच्या प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.
मूलभूत सुविधांची गरज :
जागा ५,००० चौरस फूट
इमारत ३,००० चौरस फूट
उपयुक्तितेची आवश्यकता :
वीज १० अश्वशक्ती
मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-३, अर्धकुशल-२, अकुशल-१
या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : सेमी ऑटोमॅटिक परफ्युम्स मेकिंग प्लँट
लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या गुणवत्तेचे व दर्जाचे केमिकल्स व इतर
या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल २० ते २५ लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १५ ते २० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ५ ते १० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू ३२ ते ३५ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा १२ ते १५ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : बिटुमिन मॉडिफाईड प्लास्टिक प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**
**विकास नेमाने, अमरावती**

**उत्तर :** बिटुमिन मॉडिफाईड प्लास्टिक प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.
मूलभूत सुविधांची गरज :
जागा १०,००० चौरस फूट
इमारत ५,००० चौरस फूट
उपयुक्तितेची आवश्यकता :
वीज ३० अश्वशक्ती
मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-२, अर्धकुशल-२, अकुशल-१
या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : बिटुमिन मॉडिफाईड प्लास्टिक मेकिंग प्लँट
लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या गुणवत्तेचे बिटुमिन
या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल ८० ते ९० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ६० ते ७० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता २० ते २५ लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू ३५ ते ३७ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा ९ ते ११ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

*(टीप : प्रश्नपेटीसाठी प्रश्न विचारणाऱ्या वाचकांनी आपला प्रश्न मोजक्या शब्दांत मांडावा. प्रश्न एकच विचारावा, एकच प्रश्न विचारणाऱ्या वाचकांना प्राधान्याने थोडक्यात उत्तर देण्यात येईल.)*

## उद्योग, व्यापार, व्यवसायाद्वारा स्वयंरोजगार मिळविण्यासाठी सर्व काही...

**प्रस्थापित व होतकरू उद्योजकांच्या यशोगाथा, बाजारपेठ, व्यवस्थापन, दर्जा, गुणवत्ता, ग्राहकांचे मानसशास्त्र, नवीन उद्योगांच्या संधी, शोध, तंत्रज्ञान, निर्यात, उद्योजकतेच्या वाटेवर साह्य करणाऱ्या संस्था, नमुना प्रकल्प अहवाल, आपल्यातील उद्योजकतेला दिशा देणारे, राज्य शासनाच्या उद्योगासंबंधीच्या योजना इत्यादीसंदर्भात माहिती.**

**उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र**

# उद्योजक

अ-३८, एम.आय.डी.सी., रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

**E-mail :**
**Editorial** : udyojakmagazine2@gmail.com
**Subscription** : udyojaksubscription@gmail.com
**Advertisement** : udyojakadvt@gmail.com
To know more about MCED please visit our
**Portal**
www.mced.co.in

## वर्गणीदारांसाठी सूचना

*('उद्योजक' मासिकाच्या ज्या वर्गणीदारांना अंक मिळत नाहीत अथवा अनियमितता आहे अशा वर्गणीदारांनी कृपया आपल्या तक्रारी एक महिन्याच्या आत खालील भ्रमणध्वनीवर एसएमएसद्वारे नोंदवाव्यात. एक महिन्यानंतर केलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तक्रार नोंदवताना वर्गणी भरल्याचा पावती क्रमांक, दिनांक, रक्कम तसेच जो अंक मिळाला नाही त्याचा तपशील थोडक्यात कळवावा, जेणेकरून उद्योजक वितरण विभागाला आपल्या तक्रारीवर तातडीने कार्यवाही करता येईल. भ्रमणध्वनी क्र. ९४०३६८३१९६).*

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संपादक,
'उद्योजक' मासिक,
अ-३८, एमआयडीसी रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

विषय : 'उद्योजक' मासिकाचे वर्गणीदार होण्याबाबत...

महोदय,
'उद्योजक' मासिकाचा वार्षिक/द्वैवार्षिक/त्रैवार्षिक सभासद होऊ इच्छितो. सोबत वर्गणीची रक्कम डिमांड ड्राफ्ट/मनिऑर्डर रु......... 'एमसीईडी औरंगाबाद'चे नावे पाठवत आहोत. कृपया आम्हाला 'उद्योजक' मासिक पुढील पत्त्यावर नियमितपणे पाठवावे.

पूर्ण नाव (आडनाव प्रथम) ______________________

पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता ______________________

______________________

पिन कोड ______________________

कळावे,

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-

नाव ______________________

**वर्गणीचे दर**

| वर्गणी | अर्ध वार्षिक | वार्षिक | द्वैवार्षिक | त्रैवार्षिक |
|---|---|---|---|---|
| रुपये | ५००/- | ९००/- | १७००/- | २५००/- |

**जाहिरातींचे दर**

| जाहिरातीचा आकार | नियमित अंकांसाठी |
|---|---|
| मलपृष्ठ (चार रंगी) | ५०,००० |
| कव्हर क्र. २ व ३ (चार रंगी) | ३०,००० |
| आतील पाने (चार रंगी) | २५,००० |
| अर्धे पान (चार रंगी) | १५,००० |
| पाव पृष्ठ (चार रंगी) | ८,००० |

- ५% जी.एस.टी. अतिरिक्त लागेल.
- जाहिरातीचे आर्टवर्क तयार करुन पाठविणे.
- जाहिरातीचे आर्टवर्क PDF / CDR / JPEG मध्ये आवश्यक.
- संस्थेच्या प्रशिक्षित उद्योजकांना जाहिरात दरात १०% सवलत.
- जाहिराती udyojakadvt@gmail.com वर पाठवाव्यात.

**उद्योजक मासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी पुढील बारकोड स्कॅन करून वर्गदार व्हा..!**

**ऑफिसर कोड 46 टाका. वर्गणीची नोंदणी करताना काही अडचण आल्यास 9403078779 वर संपर्क साधा.**

**वर्गणी/जाहिरातीचे पेमेंट https://mced.co.in/Subscription/ या लिंकवर करावे**

कृपया पेमेंट 'एमसीईडी औरंगाबाद' (महाराष्ट्र) च्या नावे डिमांड ड्राफ्टने/मनिऑर्डरद्वारे पाठवावे अथवा 'उद्योजक' मासिकाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, रेल्वे स्टेशन शाखा, औरंगाबादच्या खाते क्र. ५२०६५८८३५९६ IFSC Code : SBIN 0020302 वर भरून त्याची सूचना तात्काळ एसएमएसद्वारे यूटीआर नंबर व उद्योजक मासिक पोस्टाद्वारे पाठविण्यासाठी सविस्तर पत्ता भ्रमणध्वनी ९४०३६८३१९६ वर कळवावा.

उद्योजक

## उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, ‘उद्योजक’ मासिक वर्गणी/जाहिरात

### संपर्काचे पत्ते

MCED

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी गेल्या दीड दशकभरापासून प्रत्येक जिल्ह्यात समाजाच्या उद्योजकीकरणाची मोहीम स्वयंसेवकाच्या निष्ठेने राबवीत आहेत. केंद्राच्या शास्त्रशुद्ध उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महाराष्ट्रात हजारो पहिल्या पिढीचे उद्योजक तयार झाले आहेत. हे लोण तळागाळापर्यंत पोहोचेल असा आम्हाला विश्वास आहे. समृद्धीकरणाचा हा विचार जनसामान्यांपर्यंत सर्वदूर पोहोचविण्यासाठी ‘उद्योजक’ मासिकही यशस्वीरीत्या उद्योजकतेविषयीचे ज्ञान प्रसार करीत आहे. केंद्राच्या कार्यक्रमाविषयी आणि उद्योजकच्या वर्गणी/जाहिरातींविषयी खालील प्रकल्प अधिकारी मित्र चर्चेसाठी सदैव उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील तरुणांनी, महिलांनी याचा फायदा जरूर घ्यावा. दहा हजार अधिक वर्गणीदार असलेले ‘उद्योजक’ कधी कधी परिस्थितीजन्य कारणांमुळे वेळेवर पोहोचत नसल्यास, वर्गणीदाराचा पत्ता बदलला असल्यास, नवीन वर्गणीदार व्हायचे असल्यास किंवा जाहिरात द्यायची असल्यास कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधून समाजाच्या उद्योजकीकरणाच्या मोहिमेला हातभार लावावा.

# महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे (एमसीईडी) राज्यातील कार्यालयांचे पत्ते

**मुंबई विभाग :** श्री.राजेश कांदळगांवकर, विभागीय अधिकारी, कोकण विभाग, श्री.आनंद विद्यागर, प्रकल्प अधिकारी, कोकण भवन, ५वा मजला, रूम क्र.५१२ सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४. ☎२७५६३८९६, २७५६४०२५, ८१८०९९७९०९, ९४०३०७८७७२. श्री.प्रदीप सावंत, क.प्र.अ. (से.पू.), मुंबई शहर/उपनगर, द्वारा विकास सेंटर, ७वा मजला, रुम नं.७०२, डॉ.सी.जी.गिडवाणी मार्ग, बसंत टॉकीजजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई-४०० ०७४, ७९७७२४२१६७. श्री.सुबोध बायस, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सी.एफ.सी.बिल्डिंग, पहिला माळा, मुलुंड चेक नाका, ठाणे (प)-४०० ६०२. ७७७४०५३०१४. श्री.आनंद विद्यागर, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, रायगड बाझारसमोर, अलिबाग, जिल्हा रायगड-४०२२०१. ९४०३०७८७७२. श्री.धम्मपाल थोरात, जि.प्र.समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत-अ, पहिला मजला, कक्ष क्र.१०३, कोळगाव, ता. जि.पालघर, ☎८६६९०५४०७८. चारुशिला धर्माधिकारी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा उद्योग संचालनालय, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२. ९४०५०५९०२०. **पुणे विभाग :** श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, श्री.एम.डी. शेळके, प्रकल्प अधिकारी, कृषी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५. ☎ ९४०३०७८७५३, २५५३७७२४/२५५२०३५९. श्री.एम.डी.शेळके, प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, सी-१८१, एच ब्लॉक, इंजिनिअरिंग ऑटो क्लस्टर परिसर, एमआयडीसी, पिंपरी चिंचवड, पुणे-४११ ०१९. ☎७३८७०२०२३५. श्री.राजशेखर शिंदे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, होटगी नाका, किनारा हॉटेलसमोर, सोलापूर-४१३००३. ☎२६०५०३३, २३२२५२६, ९४०३६८३२१. सौ.शितल पाटील, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र.ए-१३,औद्योगिक वसाहत, सातारा-४१५ ००४. ☎२४६५५५, २४४६५५, ८७८८१९०१८९. **कोल्हापूर विभाग :** श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, सौ.वनिता पाटील, क.प्र.अ. (से.पू.), प्लॉट क्र.३१५, दत्ताजी चेंबर्स, ई वॉर्ड, न्यू शाहूपुरी, मराठा रिजन्सी हॉटेलसमोर, कोल्हापूर-४१६६०१. ☎(०२३१) २६६२०७१. श्री.प्रवीण कायंदे, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजूला, महावीर गार्डनसमोर, कोल्हापूर-४१६ ६०१. ☎(०२३१) २६६६७४८.सौ.वनिता पाटील, क.प्र.अ. (से.पू.), एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली-४१६ ४१६. ☎२६७११६९, ७०५७९९४३०८. श्री.रमेश जाधव, क.प्र.अ. (से.पू.) एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बीडीओ स्टाफ क्वार्टरमागे, जेल मार्ग, रत्नागिरी. ☎२२१९८८, ९४०४९५०००४. श्री.आर.ए.गावडे, क.प्र.अ., द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, दुसरा मजला, ए ब्लॉक, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस, ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग, ☎२२१३६२, २२८७०५, ९४०३०७८७६७. **नाशिक विभाग :** श्री.आलोक मिश्रा, विभागीय अधिकारी, श्री.एस.ए.भामरे, प्रकल्प अधिकारी, श्री.मंगेश बनकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), ११, तळमजला, उद्योग भवन, त्र्यंबक मार्ग, सातपूर, नाशिक, ☎२३५२१५१, २३६३४१४, ९४०३०७८७६३, ७७२००७५९०१, ८२०८०५५०१९. आरती शेलोरकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जमनागिरी मार्ग, धुळे-४२४००१, ८७८८५५७५३०. श्री.टी.पी.जिवडे, क.प्र.अ. (से.पू.) द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, स्टेशन मार्ग, अहमदनगर महाविद्यालयाजवळ, अहमदनगर. ☎२३२०४८५,९५६१७३७७४७. श्री.दिनेश गवळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, रिंग रोड, राष्ट्रीय महामार्ग, जळगाव-४२५ ००१. ☎२२५२८३२, ७७२००७५९०१. श्री.डी.एस.ढाकणे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, खोली क्र.२८ नंदुरबार. ☎०२५६४-२१०५१०, ८८८८५१०४९९. **नागपूर विभाग :** श्री.प्रदीप इंगळे, विभागीय अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी, प्रकल्प अधिकारी, शिवानी गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), उद्योग भवन, सिव्हिल लाइन्स, उच्च न्यायालयामागे, विक्री कर कार्यालयाजवळ, नागपूर. ☎२५३७०९७, ९४०३०७८७६९ ९४०३०७८७६०. श्री.एच.आर.वाघमारे, प्र.अ., केंद्र प्रमुख, एमसीईडी उपकेंद्र, श्री. पंकज ठाकरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), हिंगणा औद्योगिक परिसर, नागपूर, मो. ९४२२२७६७०१, ७७७४०३६२३२, ८९७५५०६६३०. श्री.रोशन तायवडे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वर्धा-४४२ ००१. ☎२४३४६३, ९८३४३५२२९५. श्री. संदीप जाने, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा उद्योग भवन, ब्लॉक क्र.८, दुसरा मजला, बस स्टँडसमोर, रेल्वे स्टेशन मार्ग, चंद्रपूर, ☎ २७४४१६, ९४०३०७८७७३. कु.काजोल राठोड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सिव्हिल लाइन्स, भंडारा. ☎२५८८६७, २५२३४७१, ७६६६१३६३८९. श्री.जितेंद्र चौरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), डोरलीकर भवन, नगर परिषदेजवळ, धानोरा मार्ग, गडचिरोली. ☎२२३३६५. संगीता ढोणे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), बोपचे भवन, हॉटेल सागरसमोर, बालाघाट मार्ग, गोंदिया-४४१ ६१४, ☎२५०२७४, ८७८८६४८९६५. **छत्रपती संभाजीनगर विभाग :** श्री.डी.यु.थावरे, विभागीय अधिकारी, सौ.भारती सोसे, क.प्र.अ. (से.पू.) सौ.प्रतिभा निमकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), एमसीईडी, अ-३८, रेल्वे स्टेशन परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००१. ☎२३६१२२३. ९४०३०७८७६६, ९४०३६८३१७३, ९८८१३०४९३०. श्री.विनोद तुपे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-७, अतिरिक्त औद्योगिक वसाहत, जालना. ☎२२०२०३०६२८, ९०४९२२८८८८. श्री.दत्तात्रय क्षीरसागर, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बशीर गंज, बीड-४३१ १२२. ☎२२२२८५, ७०५७९६८१३१. श्री.पांडुरंग कांबळे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसमोर, उस्मानाबाद-४३१ ५०१. ☎२२१५०५, ८२७५०९३२२८. **नांदेड विभाग :** श्री.किशोर अंभोरे, विभागीय अधिकारी, श्री.शंकर पवार, क.प्र.अ. (से.पू.), उद्योग भवन, तळ मजला, शिवाजीनगर, नांदेड. मो. ९४०३०७८७८३, ९४०३६८३१९७. श्री.के.व्ही.राठोड, प्रकल्प अधिकारी, हॉल क्र.७४, सर्व्हे नं. ६२२, वार्ड क्र.२०, चिद्रावार नगर, शासकीय कृषी कार्यलयाजवळ, जुना पेडगाव रोड, परभणी-४३१ ४०१. ☎२३३२७५, ९४०३०७८७७३. श्री.दिपक गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-१, एमआयडीसी परिसर, लातूर-४१३ ५३७. ☎२२११००, ९४०४९५०००४. श्री. सुधीर आठवले, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, हिंगोली. ☎२२२२१८, ९७६५२९१७८५. **अमरावती विभाग :** श्री.पी.व्ही.इंगळे, विभागीय अधिकारी, श्री.पी.व्ही.इंगळे, प्रकल्प अधिकारी, श्री. राजेश सुने, क.प्र.अ. (से.पू.), श्री.नेत्रदीप चौधरी, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), टांक चेंबर्स, गाडगेनगर, व्ही.एम.व्ही.मार्ग, अमरावती-४४४ ६०२. ☎२६६०३१६, २६६५४७२. ९४०३०७८७६९, ८८५७८६९८८३, ९८२२४४१२०९. श्री.प्रसन्ना रत्नपारखी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जुने कॉटन मार्केट, अकोला-४४४ ६०२. ☎२४३५६८,० ९४०५३१५९४६. श्री.गणेश गुप्ता, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जतकर भवन, टिळकवाडी, बस स्टँड मार्ग, बुलढाणा, ☎२४२३६७/२४२६०४, ९८६००००६८१. श्री.रूपेश हिरुलकर, क.प्रकल्प अधिकारी (से.पू.), उद्योग भवन, अमरावती मार्ग, यवतमाळ. ☎२५५४१३, ८२७५०९३२३०. श्री.गौरव इंगळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), (एमसीईडी), जिल्हा उद्योग केंद्रासमोर, काटा मार्ग, शासकीय दूध डेअरीजवळ, वाशिम, मो. ९४०५५४८३२९

Rgd.No.RNI-66017/96 Udyojak September 2024
Date of Publication : 25th August 2024

For Posting under the Registration No. ABD/66/2022-2024 & Without Pre Payment of Postage of Posting WPP
License No.AR/Tech/WPP/Udyojak/AGD Dn/2021-22 Dated 08.03.2022 for the calendar year 2022 to 2024


# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP)

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

# धोरण रोजगार निर्मितीचे,
# उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

* ''नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा''
* मार्गदर्शन व गुंतवणूकीसाठी पैशांचा अभाव आहे का?
* उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही का?
* तर उद्योजक होण्याचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपीचा लाभ घ्या.

* या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख तर
* सेवा व कृषि पूरक प्रकल्पांसाठी २० लाख रूपयांपर्यंतचे कर्ज पुरवठा.
* मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे.
* तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वंयरोजगार उभारण्यासाठी आजच सीएमईजीपीचा लाभ घ्या.



**: अधिक माहिती व संपर्कासाठी :**

राज्यस्तरीय संनियंत्रण : विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
हेल्पलाईन नंबर : २२ २२०२ ३९१२.
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (संबंधित जिल्हा) जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी (संबंधित जिल्हा)
संकेतस्थळ : www.di.maharashtra.gov.in, www.maha-cmegp.gov.in, www.mced.co.in

Scan Me

**Visit us @ https://www.maha-cmegp.gov.in**



**If undelivered please return to**

**Chief Editor,**
**Udyojak Magazine,**
उद्योजक

MCED, A-38, MIDC Railway Station Area,
**Chhatrapati Sambhajinagar-431005.**
Portal : www.mced.co.in


**To,**

Published & Printed by Santosh Borde on behalf of Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), Printed at M/s.Printwell International Pvt.Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar-431 006. Published from MCED, A-38, MIDC Railway Station Area, Chhatrapati Sambhajinagar-431 005. **Chief Editor : B.T. Yeshwante**